CMYK

सोलापूर
# तरुण भारत
प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
https://dainiktarunbharat.com / https://epaper.dainiktarunbharat.com

सातारा | रविवार, ५ मे २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ३८ वे अंक १८४ | पाने १६ | किंमत रु. ६/-




## ▶▶ महत्त्वाचे...

### नितीन गडकरी यांच्या आज जिल्ह्यात दोन सभा

**सोलापूर :** केंद्रीय रस्ते वाहतुक मंत्री नितीन गडकरी हे आज सोलापूर दौऱ्यावर असून माढा लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार खा. रणजितसिंह निंबाळकर यांच्यासाठी गडकरी यांची टेंभुर्णी येथे सकाळी ११.३० वाजता जाहीर सभा होणार आहे. तर सोलापूर लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार आ. राम सातपुते यांच्या प्रचारासाठी अक्कलकोट येथे दुपारी ३.३० वाजता एसटी स्टँडसमोरील मैदानात सभा होणार आहे.

### देशातील ५७१ शहरांत आज नीट परीक्षा

**नवी दिल्ली :** वैद्यकीय प्रवेश परीक्षा नीट ही उद्या ५ मे रोजी देशभरातील तब्बल ५७१ शहरांमध्ये घेतली जाणार आहे. ही लेखी परीक्षा आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) ही भारताबाहेरील १४ शहरांमध्ये देखील ऑफलाईन पद्धतीने या परीक्षेचे आयोजन करते. दुपारी २ ते ५.२० या वेळेत १३ भाषांमध्ये ही परीक्षा होणार आहे. यावर्षी नीट यूजी परीक्षेसाठी एकूण २३ लाख ८१ हजार ८३३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. यामध्ये १० लाखांहून अधिक विद्यार्थी आणि १३ लाखांहून अधिक विद्यार्थिनींचा समावेश आहे.

### अमित शाह बनावट व्हिडीओ प्रकरणी गुन्हेगारी कटाचे कलम

**नवी दिल्ली :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या बनावट व्हिडीओ प्रकरणातील एफआयआरमध्ये गुन्हेगारी कट रचल्याचे कलम वाढवण्यात आले, अशी माहिती दिल्ली पोलिसांनी दिली. या प्रकरणात काँग्रेसच्या समाज माध्यम चमूच्या राष्ट्रीय समन्वयकाला अटक केल्यानंतर दुसऱ्या दिवशी ही घडामोड घडली आहे. 'स्पिरीट ऑफ काँग्रेस' हे एक्स खाते हाताळणारा मूळ तेलंगणातील हैदराबादचा अरुण रेड्डी याला शुक्रवारी दिल्लीतून अटक करण्यात आली. या प्रकरणात पोलिसांनी केलेली ही पहिलीच अटक आहे.

### बंगळुरुचा सलग तिसरा विजय

**बंगळुरू :** बंगळुरू येथील चिन्नास्वामी स्टेडियमवर शनिवारी झालेल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने खझङ-२०२४ मध्ये सलग तिसरा विजय मिळवला आहे. संघाने चालू हंगामातील ५२ व्या सामन्यात गुजरात टायटन्सचा ४ विकेट्सने पराभव केला. या विजयासह बंगळुरूने प्लेऑफच्या आशा अबाधित ठेवल्या आहेत.

# सिंचन प्रकल्प, जलसंवर्धनासाठी मोठे काम करणार : नितीन गडकरी

## राम सातपुते प्रामाणिक, टक्केवारी घेणारा खासदार नाही होणार



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, ४ मे-**

देशात सगळीकडे पाणी हाच मुद्दा आहे. पाणी हीच समस्या आहे. त्यामुळे दुष्काळी भागातील शेतकऱ्यांनी जगायचे नाही का? त्याला पाणी मिळू नये का? पाण्याची ही समस्या दूर व्हावी यासाठी आम्ही पुन्हा सत्तेत आल्यानंतर सिंचन प्रकल्प आणि जलसंवर्धनासाठी सर्वोच्च प्राधान्याने मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करुन देणार असल्याचे सांगून प्रत्येक गावात पाणी पोहचवून ते समृध्द करण्याचा विश्वास देशाचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिला. राम सातपुते प्रामाणिक असून टक्केवारी घेणारा खासदार नाही होणार असे गडकरी म्हणाले.

पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारातील मैदानावर सोलापूर लोकसभा मतदारसंघातील भाजपाचे उमेदवार आ. राम सातपुते आणि माढा लोकसभा मतदारसंघातील उमेदवार खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या प्रचारासाठी शनिवारी दुपारी झालेल्या प्रचारसभेत ते बोलत होते. यावेळी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आ. समाधान आवताडे, आ. गोपीचंद पडळकर, माजी आ. प्रशांत परिचारक, माजी आ. लक्ष्मणराव ढोबळे, शिवसेनेचे नेते शिवाजीराव सावंत आदी प्रमुख नेत्यांसह महायुतीमधील घटक पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. गडकरी म्हणाले, आपणाला भविष्यात पाण्याचा एक एक थेंब डिपॉझिट केला पाहिजे. त्यासाठी महाराष्ट्र सरकार आणि भारत सरकारने सिंचन योजना आणल्या आहेत. या योजनांच्या माध्यमातून आपल्या जिल्ह्याचे सिंचन साठ टक्क्यांच्या वरती गेले पाहिजे हे प्रत्येकाने लक्षात घेतले पाहिजे. तुमच्या गावात पाणी आणल्याशिवाय आम्ही राहणार नाही. पाणी आणले तर शेतकऱ्यांचे उत्पन्न अडीच पटीने वाढणार आहे. त्यामुळे यासाठी धावणाऱ्या पाण्याला चालायला लावा, चालणाऱ्या पाण्याला थांबायला लावा आणि थांबलेल्या पाण्याला जमिनीला प्यायला लावण्यासाठी प्रयत्नदेखील सर्वांच्या सहकार्यातून झाले पाहिजेत असेही त्यांनी आवाहन केले.

(उर्वरित वृत्त पान ३ वर)

### जो करेगा जात की बात, उसको कसके पडेगी लाथ

गडकरी म्हणाले, आपण जात, पात काही मानत नाही. सर्वांना बरोबर घेऊन काम करण्याची आपली पद्धत आहे. कुणाचेही योग्य काम असेल तर आपण ते जरुर करतो. त्यामुळे आपल्याकडे जात, पात कुछ नही. सगळे लोक आपला परिवार आहे. आपण याच लोकांच्या परिवारातील आहोत. या भावनेनेच आपले काम चालते. त्यामुळे आपण नेहमी सांगतो की, जो करेगा जात की बात, उसको कसके पडेंगी लाथ असेही गडकरींनी सांगितले.

### पहिल्या पंचवीस आमदारांमध्ये यांचा समावेश

मतदारसंघात पाच वर्षांत उत्कृष्ठ काम केलेल्या आमदारांचा भाजपाकडून सर्व्हे करण्यात आला. त्यामध्ये पहिल्या पंचवीस आमदारांमध्ये आ. राम सातपुते आणि समाधान आवताडे यांचा नंबर लागला आहे. पक्षाने आदेश दिला म्हणून राम सातपुते सोलापूर मतदारसंघातून लोकसभेची निवडणूक लढवित आहेत. माळशिरस तालुक्याचे पाच वर्षांत सातपुते यांनी नंदनवन केले. जनतेच्या सेवेत २४ तास वाहून घेतलेले भाजपाचा कार्यकर्ता म्हणजे राम सातपुते असेदेखील बावनकुळे यांनी सांगितले.

# आज थंडावणार प्रचाराच्या तोफा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मे-**

येत्या ७ मे रोजी सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघासाठी तिसऱ्या टप्प्यातील मतदान होणार आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवार गेल्या पंधरा ते वीस दिवसांपासून सुरु असलेला प्रचार रविवार, ५ मे रोजी सायंकाळी ५ वाजता थांबणार आहे.

लोकशाहीचा सर्वात मोठा उत्सव सध्या सुरु असून लोकसभेच्या ५४३ जागांसाठी सात टप्प्यात निवडणुकांची प्रक्रिया सुरु आहे. सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघासाठी तिसऱ्या टप्प्यातील मतदान मंगळवार, ७ मे रोजी होणार आहे. सोलापूर लोकसभा राखीव मतदारसंघात भाजपा महायुतीचे उमेदवार आ. राम सातपुते आणि काँग्रेस महाविकास आघाडीच्या उमेदवार आ. प्रणिती शिंदे यांच्यात निखराची लढत आहे. तर माढा लोकसभा मतदारसंघात भाजपा महायुतीचे उमेदवार खा. रणजितसिंह



निंबाळकर आणि महाविकास आघाडीचे उमेदवार धैर्यशिल मोहिते-पाटील यांच्यात काटे की टक्कर आहे. या व्यतिरिक्त वंचित बहुजन आघाडीसह अनेक अपक्ष आमदार देखील दोन्ही मतदारसंघात निवडणुकीच्या रिंगणात आहेत. गेल्या पंधरा दिवसात पंतप्रधान नरेंद्र मोदी, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री अमित शहा, केंद्रीय रस्ते वाहतुक मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, माजी शिक्षण मंत्री विनोद तावडे, टी. राजा आणि काँग्रेसचे नेते राहुल गांधी, माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्यासह अनेक नेत्यांनी सोलापुरात प्रचार सभा घेतल्याने राजकीय वातावरण तापले होते. रविवारी प्रचार थांबणार असून मंगळवारी मतदान होणार आहे.

# सोलापुरात उष्माघाताने शिक्षकाचा मृत्यू?

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, ४ मे-**

वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथील शंकरलिंग हायस्कूलमधील शिक्षक सुरेश सिद्राया परशेट्टी (वय ५६) यांचा शनिवारी दुपारी उष्माघाताने मृत्यू झाल्याची चर्चा आहे.



परशेट्टी हे वळसंग येथून शनिवारी दुपारी दुचाकीवर घरी आले. पाणी पिल्यावर त्यांना अस्वस्थ वाटू लागले. तेवढ्यात काही कळण्या अगोदरच ते जमिनीवर कोसळले. त्यातच त्यांचा मृत्यू झाला. त्यांचे पार्थिव शवविच्छेदनासाठी सिव्हिल हॉस्पिटलला नेण्यात आले. शवविच्छेदन अहवालानंतरच मृत्यूचे खरे कारण समजणार आहे, अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले यांनी दिली. परशेट्टी यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. ते मूळचे केगाव बु. (ता. अक्कलकोट) येथील रहिवासी आहेत.

# केंद्राने कांदा निर्यातबंदी हटवली

**वृत्तसंस्था,**
**नवी दिल्ली, ४ मे**

लोकसभा निवडणुकीचे पहिले दोन टप्पे पार पडले असताना कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारने कांद्यावरील निर्यात बंदी उठवण्याचा निर्णय घेतला आहे.



ग्राहक व्यवहार मंत्रालयाच्या सचिव निधी खरे आणि विदेश व्यापार महासंचलनालयाचे महासंचालक संतोष सारंगी यांनी आज कृषी भवनात आयोजित पत्रपरिषदेत याबाबतची माहिती दिली. ५५० डॉलर प्रती मेट्रिक टन या भावाने कांद्याची निर्यात करता येणार आहे. यावर ४० टक्के निर्यात शुल्क आकारले जाणार आहे. त्यामुळे कांद्यांचा प्रत्यक्ष निर्यात दर ७७० डॉलर प्रती मेट्रिक टन राहणार असल्याचे निधी खरे यांनी स्पष्ट केले.

मागील वर्षी डिसेंबर महिन्यात सरकारने कांदा निर्यात बंदीची घोषणा केली होती. नंतर निर्यातबंदीला मुदतवाढही देण्यात आली होती. आज निर्यातबंदी हटवण्याची घोषणा निधी खरे यांनी केली. मात्र, निर्यातबंदी लागू असताना सरकारने भूतान, श्रीलंका, बहरीन, मॉरिशस, बांगलादेश, संयुक्त अरब अमिरात अशा सहा देशांना ९९,१५० टन कांदा निर्यात केली होती. तेव्हापासूनच कांदा निर्यातील ४० टक्के शुल्क आकारले जात आहे.

कांदा निर्यातबंदीच्या सरकारच्या निर्णयाचा शेतकरी संघटना विरोध करीत होत्या. देशात कांद्याचा पुरेसा साठा असताना सरकार निर्यातीवर प्रतिबंध घालत असल्याचा आरोप केला जात होता. तर कांद्याचे भाव नियंत्रणात ठेवण्यासाठी निर्यात बंदीचा निर्णय घेण्यात आल्याचा सरकारचा दावा होता.

### २५४ लाख मेट्रिक टन होणार उत्पादन

२०२३-२४ या वर्षात २५४.७३ लाख मेट्रिक टन कांद्याचे उत्पादन होण्याचा अंदाज आहे. मागील वर्षी हेच उत्पादन ३०२.०८ लाख टन होते. देशात कांद्याचा पुरेसा साठा असल्यामुळे निर्यातबंदी हटवण्याचा निर्णय सरकारने घेतला असल्याचे खरे यांनी सांगितले. निर्यात बंदीच्या निर्णयामुळे देशांतर्गत बाजारातील कांद्याच्या दरावर फारसा परिणाम होणार नाही. शेतकरी तसेच ग्राहक या दोघांच्या हिताकडे पाहात सरकारने हा निर्णय घेतला असल्याचे त्यांनी सांगितले.

# वायुदलाच्या ताफ्यावर दहशतवादी हल्ला

**श्रीनगर, ४ मे**

जम्मू-काश्मिरातील पूंछच्या सुरनकोट येथील वायुदलाच्या ताफ्यावर दहशतवाद्यांनी शनिवारी सायंकाळी हल्ला केला. दहशतवाद्यांनी केलेल्या गोळीबारात वायुदलाचे पाच जवान जखमी झाल्याचे वृत्त आहे. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. गोळीबार केल्यानंतर दहशतवाद्यांनी घटनास्थळावरून पळ काढला, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

सुरनकोट भागातील सनई टॉपकडे हा ताफा बसमधून जात असताना सायंकाळी शशिधरजवळ हा हल्ला झाला, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. हल्ल्याची माहिती मिळताच लष्कराच्या राष्ट्रीय रायफल्सने परिसराला वेढा घालत शोधमोहीम सुरू केली आहे. ताफ्यातील वाहने शाहतिसार जवळील वायुतळात सुरक्षितरीत्या दाखल झाल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. जखमी झालेल्या पाच जवानांपैकी दोघांची प्रकृती गंभीर आहे.

दक्षिण काश्मीरच्या अनंतनाग जिल्ह्यातील वेरीनाग परिसरात लष्करी वाहन दरीत कोसळून एका जवानाचा मृत्यू झाला, तर नऊ जण जखमी झाले. १९ राष्ट्रीय रायफल्सचे वाहन बटागुंड वेरीनाग येथे रस्त्यावरून घसरून दरीत कोसळले.




# अपहरणप्रकरणी एच.डी. रेवन्ना यांना अटक

## अग्रिम जामीन फेटाळला

**वृत्तसंस्था,**
**बंगळुरू, ४ मे**

शेकडो महिलांच्या लैंगिक छळ प्रकरणात अडकलेले माजी पंतप्रधान देवेगौडा यांचे पुत्र आणि जदएसचे नेते एच. डी. रेवन्ना यांना कर्नाटक पोलिसांच्या विशेष चौकशी पथक अर्थात् एसआयटीने शनिवारी अटक केली. एका पीडितेच्या अपहरण प्रकरणात त्यांना अटक झाली आहे.

म्हैसूर येथील एका महिलेने मागील गुरुवारी अपहरण प्रकरणी तक्रार दाखल केली होती. ती लैंगिक अत्याचारांतील पीडिता आहे. गुन्हे दाखल झाल्यानंतर पोलिसांनी रेवन्ना यांचा निकटवर्तीय सतीश बबन्ना याला अटक केली होती. त्यानंतर एसआयटीने एच. डी. रेवन्ना यांना नोटीस बजावली होती. मात्र, चौकशीसाठी हजर न झाल्याने त्यांना अटक करण्यात आली.



राजू एच. डी. नावाच्या व्यक्तीने २ मे रोजी केआरनगर पोलिस ठाण्यात अपहरणाची तक्रार दाखल केली होती. आपली आई सहा वर्षांपासून एच. डी. रेवन्नाच्या फार्महाऊसवर काम करायची. मात्र, तीन वर्षांपूर्वी तिने नोकरी सोडून गावात मजुरी सुरू केली. काही दिवसांपूर्वी सतीश नावाची ओळखीची व्यक्ती आली होती आणि त्याने आईला नेले होते. काही दिवसांनंतर तिला सोडून देण्यात आले. त्यानंतर २९ एप्रिल रोजी रात्री बळजबरीने सतीशने तिला सोबत नेले होते, असे तक्रारीत म्हटले. त्याच्या आईच्या लैंगिक छळाची व्हिडीओ क्लिप व्हायरल झाली असल्याची माहिती एकाने राजूला दिली. त्यानंतर त्याने फोन करून आईला पाठवण्यास सांगितले.

मात्र, ती आली नाही, असे राजूने सांगितले. या प्रकरणी एच. डी. रेवन्ना यांनी अग्रीम जामिनासाठी दाखल केलेला अर्ज न्यायालयाने शनिवारी फेटाळल्यानंतर त्यांना अटक करण्यात आली.

### प्रज्वल रेवन्नाविरुद्ध सीबीआय बजावणार 'ब्लू कॉर्नर नोटीस'



शेकडो महिलांवर अत्याचाराचा आरोप झाल्यानंतर फरार झालेला खासदार प्रज्वल रेवन्नाच्या विरोधात सीबीआय 'ब्लू कॉर्नर नोटीस' बजावणार असल्याची माहिती कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी आज दिली. या प्रकरणाचा तपास करीत असलेल्या एसआयटीने मला सीबीआयच्या भूमिकेबाबत कळविले आहे. मी आज एसआयटीच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली, तेव्हा मला याबाबतची माहिती देण्यात आली, असे सिद्धरामय्या म्हणाले.

**पुन्हा 'लूक आऊट' नोटीस :** दरम्यान, आमदार एच. डी. रेवन्ना आणि त्याचा मुलगा खासदार प्रज्वल रेवन्नाच्या विरोधात विशेष तपास पथक अर्थात् एसआयटीने आज पुन्हा 'लूक आऊट' नोटीस जारी केली आहे. गृहमंत्री जी. परमेश्वर यांनी याबाबतची माहिती दिली. या नोटीसनुसार रेवन्नाला आज सायंकाळपर्यंत एसआयटीसमोर हजर होण्याचा आदेश देण्यात आला आहे, असे परमेश्वर यांनी सांगितले. फरार असलेल्या रेवन्नाला अटक करण्यासाठी आमचे सरकार योग्य पावले उचलत आहे. सीबीआय आता 'ब्लू कॉर्नर नोटीस' जारी करणार असल्याने तपासाला आणखी गती मिळेल.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त




### जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडून कामगार दिन उत्साहात साजरा

**सोलापूर, दि. ४ मे-**

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, दिल्ली व महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशाप्रमाणे सोलापूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तर्फे प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष मो. सलमान आझमी व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव नरेंद्र जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली एमआयडीसीमधील दर्शन गारमेंट येथे महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार दिन साजरा करण्यात आला. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण येथील ॲड अनुराधा कदम यांनी महाराष्ट्र दिनाचे महत्व विषद करुन सांगितले. १ मे १९६० रोजी तत्कालिन पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु यांच्या हस्ते स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची मुहुर्तमेढ रोवली गेली. तसेच ॲड. श्रीमती. डी. के. देवळे यांनी जागतिक कामगार दिना निमित्त कामगारांचे हक्क आणि कर्तव्य याबद्दल कामगारामध्ये जगनजागृती केली. जगभरातील कामगार चळवळींच्या गौरवासाठी पाळण्यात येणारा दिनविशेष आहे. दरवर्षी १ मे रोजी जगभरतील ८० हून अधिक देशांमध्ये हा दिवस साजरा केला जातो. हा दिवस शिकागो मध्ये ४ मे १८८६ मध्ये घडलेल्या घटनेच्या स्मरणार्थ जगभरातील समाजवादी, कम्युनिस्ट आणि अराजकतावादी पक्ष उत्सव साजरा करतात. शिबीर यशस्वी होण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे प्र. अधिक्षक सुनिता चोपडे, विजय माळवदकर, शिवप्रसाद सुरपुरे यांनी प्रयत्न केले.

### येत्या पाच वर्षात नियोजनबद्ध विकास प्रकल्प राबविणार : सुनीलकुमार शिंदे

**सोलापूर, दि. ४ मे-**

सोलापूर ट्रान्सफॉर्म २०२४ प्लस जाहीरनामा अंतर्गत येणाऱ्या पाच वर्षात प्रत्येक वर्षी निहाय विविध प्रकल्प आणि विकास कामे राबविण्याचे नियोजन केले असल्याची माहिती सोलापूर लोकसभा राखीव मतदार संघातील अपक्ष उमेदवार सुनीलकुमार शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली. अपक्ष उमेदवार सुनीलकुमार शिंदे यांनी सोलापूर ट्रान्सफॉर्म २०२४ प्लस जाहीरनामा प्रसिद्ध केला असून यामध्ये येणाऱ्या पाच वर्षात वर्षनिहाय करण्यात येणाऱ्या विकास कामांचा प्रकल्प निहाय आढावा मांडला आहे. या अंतर्गत महत्त्वाकांक्षी योजना राबविण्यात येणार आहेत. पहिल्या वर्षी मूलभूत गरजा सुधारणा, दुसऱ्या वर्षी प्रकल्प आरंभ आणि अभ्यास, तिसऱ्या वर्षी अंमलबजावणी आणि शाश्वत मॉडेल, चौथ्या वर्षी सोलापूर जागतिक स्तरावर योग्य शहर करणे आणि पाचव्या वर्षी १०० टक्के सुधारणा करणे असा कार्यक्रम नियोजित आहे.या अंतर्गत सोलापुरात पाणीपुरवठा सुरळीत करणे, आंतरराष्ट्रीय विमानतळ सुरू करणे, सोलापुरात मेट्रो सुरु करणे यासह विविध विकास कामांचा समावेश आहे. ही विकास कामे नियोजन करून टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्यात येणार असल्याचा संकल्प यावेळी सुनीलकुमार शिंदे यांनी व्यक्त केला.या पत्रकार परिषदेत अमोल सुतार, मारुती नारायणकर , गणेश राशिनकर आदी उपस्थित होते.

### सोलापुरातील औद्योगिक न्यायालयासह पाच कार्यालय स्थलांतरास विरोध


**सोलापूर, दि. ४ मे-**

सोलापूर : सोलापुरातील कामगार औद्योगिक न्यायालय आणि पाच शासकीय कार्यालय मोहोळ तालुक्यातील मौजे लिंबी चिंचोळी येथे स्थलांतरित करण्यात येत आहे. याला कामगार संघटनेचा तीव्र विरोध असून कामगार संघटना महासंघाच्या वतीने आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा अध्यक्ष बशीर अहमद यांनी पत्रकार परिषदेत दिला आहे. सोलापुरातील मुख्यालय परिसरात असलेल्या सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय , औद्योगिक न्यायालय आणि पाच शासकीय कार्यालय सोलापूर शहरातून मौजे लिंबी चिंचोळी, तालुका मोहोळ येथे स्थलांतरित झाले असल्याचा शासन निर्णय ७ डिसेंबर २०२३ रोजी शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने घेतला आहे. सोलापूर शहरात दहा ठिकाणी जागा व इमारत उपलब्ध असताना हा निर्णय घेण्यात आला.कामगार संघटना, लेबर बार असोसिएशन यांना विश्वासात न घेता हा निर्णय घेतला आहे, असा आरोप जिल्हाध्यक्ष अहमद यांनी केला आहे. याप्रकरणी माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांना निवेदन देण्यात आले. लोकसभा निवडणूक झाल्यानंतर हा प्रश्न मार्गी लावू, असे आश्वासन त्यांनी दिले आहे. या पत्रकार परिषदेस सायबण्णा तेग्गेळी, चंद्रकांत बदलापुरे, अंगद जाधव, शंकर तुम्मा, आदी उपस्थित होते.

### मल्लिकार्जुन व हत्तुरे महाविद्यालयात महाराष्ट्र, कामगार दिन साजरा

**सोलापूर, दि. ४ मे-**

महाराष्ट्र व जागतिक कामगार दिन साजरा मजरेवाडी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री मल्लिकार्जुन हायस्कूल व रखमाबाई हत्तुरे कनिष्ठ महाविद्यालय, श्री सिद्रामप्पा हत्तुरे प्राथमिक शाळा, श्री मल्लिकार्जुन बालक मंदिर या शिक्षण संकुलात महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला.



अध्यक्षस्थानी प्राचार्य वैजिनाथ हत्तुरे होते. प्रमुख अतिथी धरेप्पा हत्तुरे, सिद्रामप्पा हत्तुरे प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक सचिन जाधव, बालक मंदिरच्या मुख्याध्यापिका संगिता हमनाबादकर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते महात्मा गांधीजींच्या प्रतिमेचे पूजन करून ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष वैजिनाथ हत्तुरे यांनी महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास शिक्षण संकुलातील बसवराज कोरे, सविता कुलकर्णी, अण्णाराव तुप्पद, गंगाराम घोडके, अनिलकुमार गावडे, रमेश दिंडोरे, लक्ष्मीकांत पनशेट्टी तसेच सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मारुती माने यांनी केले. रमेश आगवणे यांनी आभार केले.

# लोकसभा निवडणुका निष्पक्ष पार पाडा

## निवडणूक निरीक्षक मिथिलेश मिश्र, रूपाली ठाकूर यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ मे-**

माढा लोकसभा मतदारसंघात कायदा व सुव्यवस्था चोखपणे ठेवावी. सर्व संवेदनशील भागात पोलीस बंदोबस्त व्यवस्थित ठेवावा. निवडणूक कर्तव्यावर असलेल्या सर्व शासकीय यंत्रणांनी दिलेल्या प्रशिक्षणाची उजळणी व्यवस्थित करून निवडणूका निष्पक्ष, निर्भय व शांततामय वातावरणात यशस्वीपणे होण्यासाठी दिलेली जबाबदारी काटेकोरपणे पार पाडावी, असे आवाहन सोलापूर लोकसभा मतदारसंघाचे सर्वसाधारण निवडणूक निरीक्षक मिथिलेश मिश्र व माढा लोकसभा मतदारसंघाच्या सर्वसाधारण निवडणूक निरीक्षक रूपाली ठाकूर यांनी केले.



नियोजन भवन येथील सभागृहात लोकसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने आयोजित आढावा बैठकीत सर्वसाधारण निवडणूक त्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, सोलापूर शहर पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकूर, शहर पोलीस उपायुक्त विजय कबाडे, दिपाली काळे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निऱ्हाळी, निवासी उप जिल्हाधिकारी मनीषा कुंभार, उपजिल्हाधिकारी संतोष देशमुख, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांच्यासह सर्व संबंधित नोडल अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी उपस्थित होते. प्रत्येक मतदान केंद्रावर मतदारांना उष्णतेपासून बचावासाठी मंडप, पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा, मतदान केंद्राची स्वच्छता, रॅम्प, व्हीलचेयर, ओआरएसचे पाणी, रांगेच्या मध्ये खुर्च्या किंवा बेंच आदी सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. मतदारांनी दिनांक ७ मे रोजी सकाळी सात ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत घराच्या बाहेर पडून आपला मतदानाचा हक्क बजावावा व जिल्ह्यात मतदानाची टक्केवारी ७० टक्के पेक्षा जास्त जाईल यासाठी सहकार्य करावे असे आवाहनही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी केले.

**सर्वसाधारण निवडणूक निरीक्षक यांनी केलेल्या सूचना**

- पोलीस विभागाने पुढील ७२ तास अत्यंत दक्ष रहा.
- कॅश व दारू वितरण अथवा वाहतूक तात्काळ थांबवून जप्त करा.
- कोणत्याही भागात गैर कृत्य होणार नाही याची दक्षता घ्या
- पोलीस बंदोबस्त तसेच केंद्र व राज्य राखीव बलाचा फोर्स नियुक्त करा
- जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रावर पोलीस बंदोबस्त चौक ठेवा
- पोलीस कर्मचारी वारंवार केंद्राच्या बाहेर राहून मतदारांची रांग व्यवस्थित ठेवावी
- ईव्हीएम मशीन व्यवस्थितपणे त्याची हाताळणी करावी.
- कोणत्याही मतदान केंद्रावर मोबाईल घेऊन जाता येणार नाही.
- मतदान केंद्राध्यक्ष यांनी दिलेल्या सूचना पोलीस कर्मचाऱ्यांनी अंमलबजावणी करा

# मतदान व मतमोजणीच्या दिवशी मद्यविक्री बंद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ मे-**

सोलापूर, माढा व धाराशिव लोकसभा मतदार संघांमध्ये दि. ७ मे रोजी मतदान व दि. ४ जून रोजी मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहे. या कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्याच्या दृष्टीने मतदानाची वेळ संपण्यापूर्वी ४८ तास अगोदरपासून तसेच मतमोजणीच्या दिवशी जिल्ह्यातील सर्व देशी विदेशी मद्य विक्री दुकाने बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी निर्गमित केले आहेत.

सोलापूर व माढा असे दोन लोकसभा मतदारसंघ असून, जिल्हयातील बार्शी तालुक्याचा भाग धाराशिव लोकसभा मतदारसंघाला जोडण्यात आला आहे.

तसेच सोलापूर जिल्ह्याच्या लगत असलेल्या अहमदनगर जिल्ह्यातील अहमदनगर लोकसभा मतदारसंघांचा मतदानाचा दिवस दि. १३ मे रोजी असल्याने मतदारसंघाच्या सीमेलगत सोलापूर जिल्ह्यातील ५ किलोमीटर अंतराच्या आतील सर्व किरकोळ व घाऊक अनुज्ञप्त्या मतदान समाप्तीकरिता निर्धारित केलेल्या वेळेच्या ४८ तास आधीपासून म्हणजेच दि. ११ मे रोजी सायंकाळी ६ वाजेपासून दिनांक १३ मे रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत किंवा प्रत्यक्षात मतदान संपेपर्यंत तसेच मतमोजणीच्या दिवशी संपूर्ण दिवस बंद ठेवण्यात यावीत.

# संभाजी ब्रिगेडचा काँग्रेस उमेदवार आ. प्रणिती शिंदे यांना पाठिंबा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ मे-**

संभाजी ब्रिगेडचा सोलापूर लोकसभा राखीव मतदार संघातील काँग्रेसच्या उमेदवार आ. प्रणिती शिंदे यांना पाठिंबा असल्याचे महासचिव सौरभ खेडेकर यांनी आज पत्रकार परिषदेत जाहीर केले. देशाच्या दृष्टिकोनातून ही लोकसभा निवडणूक अत्यंत महत्त्वाची आहे. लोकशाहीवर घाला घालण्याच्या दिशेने वाटचाल आहे. शिवसेना ठाकरे गटाबरोबर संभाजी ब्रिगेडची युती आहे. महाविकास आघाडी अंतर्गत या लोकसभा निवडणुकीत सोलापूर मतदार संघातील काँग्रेस उमेदवार आ. प्रणिती शिंदे यांना संभाजी ब्रिगेडचा पाठिंबा आहे. शेतकऱ्यांचे, युवकांचे व इतर प्रश्न मार्गी लावण्यासाठी आवश्यक भूमिका काँग्रेसने घ्यावी, अशी अपेक्षा महासचिव सौरभ खेडेकर यांनी व्यक्त केली.



या पत्रकार परिषदेस सोमनाथ राऊत, प्रकाश ननवरे, मनोज गायकवाड, दिनेश जगदाळे आदी उपस्थित होते.

# लोकशाहीच्या उत्सवात नागरिकांनी भरघोस मतदान करावे

## सेवानिवृत्ती समारंभात मुख्याध्यापक खंडागळे यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ मे-**

देशात सध्या लोकसभा निवडणुकीच्या मतदानाची धामधूम सुरू आहे या लोकशाहीच्या उत्सवात नागरिकांनी भरघोस मतदान करून लोकशाही बळकट करावी संविधानाने दिलेला मतदानाचा पवित्र हक्क बजवावा असे प्रतिपादन आपल्याच निवृत्ती समारंभात मुख्याध्यापक मोहन खंडागळे यांनी केले.



सम्राट चौकातील रयत शिक्षण संस्था संचलित रावजी सखाराम हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचे मुख्याध्यापक मोहन खंडागळे आपल्या ३५ वर्षाच्या शैक्षणिक कारकिर्दी नंतर सेवानिवृत्त झाले त्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्यांनी मतदान करण्याचे कळकळीचे आवाहन केले व्यासपीठावर स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य केतन शहा, संस्था सदस्य प्राचार्य डॉ सुरेश ढेरे, प्राचार्य डॉ. राजेंद्र सिंह लोखंडे, माजी मुख्याध्यापक दिलीप पाटील, वसंत नागणे, मुख्याध्यापक रामचंद्र वाघमारे, चित्र महर्षी रामचंद्र हक्के आदी उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते सेवानिवृत्ती निमित्त मुख्याध्यापक खंडागळे व म्हाळप्पा ढोणे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. केतन शहा म्हणाले की, सेवानिवृत्तीनंतर सामाजिक कार्य करण्याची संधी मिळते समाजाचे ऋण फेडत असताना समाजासाठी योगदान दिले पाहिजे या भूमिकेतून सेवा कार्यास प्रारंभ केला पाहिजे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष वालवडकर यांनी केले तर सूत्रसंचलन गजानन गोरे यांनी केले पाहुण्यांचा परिचय साजेदा बागवान यांनी करून दिला. वंदना डांगे यांनी आभार मानले.

# ठार मारण्याची धमकी दिलेल्या खटल्यातून आरोपीची निर्दोष मुक्तता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ मे-**

मिळकत धारकास जातीवाचक शिवीगाळी करुन मारहाण केल्याचे आरोपातून येथील रहिवासी राम लिंगप्पा ऊर्फ बाळू अशोक चिंचोळकर , रमेश अशोक चिंचोळकर, शंतनु राजेंद्र चिंचोळकर, हेमलता राजेंद्र चिंचोळकर (सर्व रा. विजापूर रोड, सोलापूर) या सर्वांची अतिरिक्त सत्र न्यायाधिश श्रीमती. एस.आर. शिंदे यांनी सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली.

२६ एप्रिल २०१९ रोजी चिंचोळकर यांच्या शेजारील मिळकत धारक हे त्यांच्या मालकीची सोलापूर भागातील नवीन सर्व्हे नं. ३०/९ या मिळकतीवर साफसफाई, झुडपे तोडणे वगैरे काम करीत होते. त्यावेळी यातील वरील आरोपींनी मिळून तक्रारदार काम करत असलेल्या मिळकतीवर आले व त्यांना आरोपींनी जातीवाचक शिवीगाळी करुन, जिवे मारण्याची धमकी दिली म्हणून त्यांच्यावर विजापूर नाका पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल झाला. त्याचा तपास करून पोलिसांनी चौघांविरुध्द न्यायालयात आरोपपत्र दाखल केले होते. त्याची सुनावणी सोलापूर सत्र न्यायालयात झाली. त्यामध्ये सरकार पक्षाने ४ साक्षीदार तपासले. खटल्याचे चौकशीवेळी आरोपीच्या वकीलांनी घेतलेल्या उलटतपासामध्ये साक्षीदारांच्या साक्षीमध्ये विसंगती झाली. आरोपींच्या वकिलांचा युक्तीवाद विचारात घेऊन न्यायालयाने सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली. सदर प्रकरणात सरकारच्यावतीने ॲड दत्ता पवार यांनी तर आरोपीतर्फे ॲड, शशि कुलकर्णी, ॲड. पारेख, ॲड, गुरुदत्त बोरगांवकर, ॲड. रणजित चौधरी, ॲड. प्रसाद अग्निहोत्री, ॲड. प्रणव उपाध्ये यांनी काम पाहिले.



# सोलापूर-तुळजापूर महामार्गावरील फुलझाडांची हेळसांड

## पाणी कमी पडू लागल्याने झाडे कोमेजली

## सर्व्हिस रोडही लहान केल्याने वाहनधारक बेहाल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मे-**

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व वृक्ष लागवड करणारे खासगी कंत्राटदार यांच्यातील मिलीभगतमुळे सोलापूर-तुळजापूर महामार्गालगत (क्र. ५२) असलेली फुलझाडे ऐन उन्हाळ्यात पाणी कमी पडू लागल्याने वाळू लागली आहेत. ज्या ठिकाणी झाडे वाळली आहेत; त्या ठिकाणी नव्याने वृक्षलागवड होत नाही. इतकेच नाहीतर गावोगावी केलेले सर्व्हिस रोडही लहान केल्याने गावोगावच्या वाहनधारकांचे महामार्गावर येईपर्यंत मोठे हाल होवू लागले आहेत.

महामार्ग व त्या रस्त्यावरील शहरे, गावे सुंदर दिसावीत म्हणून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणने केलेल्या वृक्षलागवडीकडे खाजगी गुत्तेदारांचे दुर्लक्ष होत असल्याने अनेक झाडे कडक उन्हामुळे वाळून जावू लागली आहेत. तर या गुत्तेदारांनी महामार्गावर अनेक ठिकाणी वृक्षलागवडच केल्याचे दिसून येत नाही. यामुळे हा परिसर ओसाड दिसत आहे. गावोगावच्या सर्व्हिस रोडवर भरपूर स्पेस असतानाही या ठिकाणीही एकही रोपवाटिका लावल्याचे दिसून येत नाही. इतकेच कायतर सुरूवातीला लावलेल्या वृक्षांकडेही संबंधित गुत्तेदार दुर्लक्ष करीत असल्याने त्यातील बरीच रोपटी वाळून जात आहेत. लावलेल्या रोपांची निकषांनुसार काळजी न घेतल्याने, कागदावरील देखरेखीमुळे या सुंदर रस्त्याचे वैभव धुळीला मिळत आहे.



सोलापूर ते तुळजापूर महामार्गावरील जवळपास ४५ किलोमिटर अंतरात या महामार्गावर मध्यभागी व दुतर्फा हजारो रोपे लावण्यात आली आहेत. सदर कंत्राट कोट्यवधींचे असल्याचे सांगण्यात येते. ही रोपे निकषांनुसार लागवड करतांना रोपांची उंची दोन मीटर अर्थात सुमारे साडेसहा फूट असायला हवी. म्हणजे सुमारे तीन वर्षांपूर्वी रस्त्याच्या दुतर्फा लागवड केलेल्या रोपांची उंची आता १५ ते २० फूट असायला हवी होती, मात्र प्रत्यक्षात यातील अनेक झाडे अजूनही जमिनीवर रेंगाळतांना दिसतात. रस्त्याच्या मधोमध व दुतर्फा सुमारे २० टक्के झाडे गायब झालेली आहेत. अर्थात कंत्राट संपेपर्यंत बाद रोपे लावणे कंत्राटदाराला अनिवार्य आहे. मात्र बाद रोपे लावल्याचे प्रत्यक्षात दिसत नाही. आता कडक उन्हाळा असल्याने या रोपांचे जतन करण्यासाठी त्या झाडांना मुबलक पाणी देण्याची जबाबदारी संबंधित गुत्तेदाराची असून, त्यांनी त्या झाडांना भरपूर पाणी दिल्यास ही फुलझाडे जतन होतील.

**शासन निकषांना केराची टोपली**

शासनाने ठरवून दिलेल्या निकषांनुसार झाडांच्या लागवडीवेळी खड्ड्यात काळी माती, कंपोस्ट खत, शेण खत टाकण्याची तरतूद आहे. मात्र सदर रोपे लावताना काळी माती काही ठिकाणी टाकण्यात आल्याचे दिसून आले. मात्र आवश्यक ती खते टाकतांना दिसून आले नसल्याचे परिसरातील शेतकऱ्यांनी सांगितले. उन्हाळ्यात वेळोवेळी आवश्यक तितका पाणी पुरवठा न केल्याने बरीच झाडे जळून गेली आहेत. यामुळे या महामार्गावरील रोपट्यांकडे संबंधित यंत्रणेने तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी जाणकार वाहनधारकांनी दै. तरूण भारतशी बोलताना व्यक्त केली.

**सुरक्षा जाळ्याही गायब!**

या महामार्गावरील दुतर्फा झाडांना बऱ्याच ठिकाणी सुरक्षा जाळी, ट्री गार्ड बसवलेले नाही. काही ठिकाणी बसविण्यात आलेल्या जाळ्या गुराख्यांनी वगैरे काढल्या आहेत. यामुळे रस्त्याच्या बाजूला लावलेल्या मोठ्या वृक्षांना अजून काही दिवस या तारांच्या जाळ्यांची नितांत गरज आहे.

# महामार्गावरील झाडे जगवण्याची शेवटची संधी

## पुढच्या वर्षी संपणार कॉन्ट्रॅक्ट

**तभा वृत्तसेवा । सहयोग प्र.जावळे**
**कन्नड, दि ४ मे -**

धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील वृक्ष लागवड व देखरेख निगा राखण्याची कंपनीचा करार २५ मार्च २०२५ मध्ये संपुष्टात येत असून येणाऱ्या पावसाळ्यात झाडे जगवली व वाढवली नाही तर भविष्यात हा महामार्ग कायमस्वरूपी ओसाड राहणार हे नक्की आहे.




धुळे सोलापूर महामार्गावर भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने दिलीप बिल्डकॉन लिमिटेड या खाजगी कंपनीला वृक्षारोपण करण्याचे कंत्राट दिले,या खासगी कंत्राटदाराने सन २०२१ साली तेलवाडी ते करोडी दरम्यान ५५ किलोमिटर अंतरात ५८,१४३ झाडांची लागवड केली त्यात रस्ताच्या मध्यभागी २२५१४ शोभिवंत झाडांची लागवड केली तर रस्ताच्याकडेला ३५६२९ वृक्षलागवड केली. गेल्या तीन वर्षात या खाजगी कंपनीने रस्त्या लगतच्या झाडांची देखरेख व निगा राखण्यात अक्षम्य दुर्लक्ष केल्याने तसेच देखरेख व निगा केवळ कागदावर केल्यामुळे निम्या पेक्षा अधिक रोपे बाद झाले.



सुरक्षा जाळी न बसवल्यामुळे सदर रोपे नष्ट झाले.गेल्या तीन वर्षात झाडांची उंची १५ ते २० फूट व्हायला हवी होती तेथे आता हे रोपे जमिनीलगत रेंगाळलेले आहेत. गेल्या तीन वर्षात कंपनीने झाडांच्या देखरेखी बाबत दुर्लक्ष केले.कंपनी करत असलेल्या दुर्लक्षाकडे महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी जाणूनबुजून कानाडोळा केला.खाजगी कंपनी व महामार्ग प्राधिकरण यांच्यातील लागेबांधे आता लपून राहिलेले नाही.मात्र त्यामुळे हा रस्ता ओसाड झाला आहे. आता येणाऱ्या कमी कालावधीत कंपनीने बाद झाडे लावणे अपेक्षित आहे.जे झाडे आधीपासून जिवंत आहेत त्यांना पाणी देण्याचे प्रमाण या उन्हाळ्यात वाढवणे गरजेचे आहे ,त्यांची निगा राखून सर्वच झाडांना सुरक्षा जाळी बसवणे अपेक्षित आहे. कंपनी कार्यरत असताना हा महामार्ग ओसाड झाला,कंपनीचा कंत्राट संपल्यानंतर पुढे या झाडांची निगा कोण राखेल हा मुख्य प्रश्न आहे.



कंपनी कार्यरत असे पर्यंत कोणत्याही परिस्थितीत या महामार्गालगत जुने वैभव पुन्हा झाले पाहिजे,या भूमिकेतून जनआंदोलन उभारणार असल्याचा निर्धार या परिसरातील नागरिकांनी केला असून त्याबाबत सविस्तर माहिती पुढील भागात बघुया.. **क्रमशः**

## सिंचन प्रकल्प, जलसंवर्धनासाठी...

पान १ वरून...

देशाचा विकास करावयाचा आहे. या देशाला सुखी, समृद्ध आणि संपन्न बनावयाचे आहे. देशातील शेतकरी, शेतमजुराला समृद्ध, संपन्न करावयाचे आहे. शेतकऱ्यांच्या तरुण मुलांच्या हाताला काम द्यावयाचे आहे. त्यासाठी स्मार्ट शहरे नाहीत तर स्मार्ट व्हिलेज झाली पाहिजेत हे आपले स्वप्न आहे. पहिल्या स्मार्ट व्हिलेजच्या कामाला मी सुरुवातदेखील केली आहे. शेतकरी, शेतमजुरांची मोठ्या शहरात गेलेली मुले-मुली पुन्हा परत आपल्या गावाकडे येतील. सर्व सुखसोयींनीयुक्त अशा स्वत:च्या गावातच ते वास्तव्य करतील हे स्वप्न आता फार दूर नाही असेदेखील त्यांनी सांगितले. पण तो दिवस जर आणयाचा असेल तर खऱ्या अर्थाने देशात योग्य सरकार आणि योग्य नेतृत्व निवडले पाहिजे. त्यासाठी देशात पुन्हा एकदा भाजपा आणि मित्रपक्षाची सत्ता आणावी लागणार आहे. देशाच्या पंतप्रधानपदी पुन्हा एकदा नरेंद्र मोदींना बसवावे लागणार आहे. भाजपाच्या प्रत्येक खासदाराला निवडून द्यावे लागणार आहे. सोलापूर लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढविणाऱ्या भाजपाच्या आ. राम सातपुते आणि माढ्यातून निवडणुकीच्या रिंगणात असणाऱ्या खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकरांना मोठ्या मताधिक्यांनी विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले.

भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, मत हे कर्ज रुपाने घेतले पाहिजे. पाच वर्षांत जनतेची सेवा करुन ते व्याजासह नागरिकांना कामाच्या रुपाने परत केले पाहिजे. त्यामुळे मतांचे घेतलेले कर्ज व्याजासह परत करणारे भाजपाचे उमेदवार म्हणून राम सातपुते आणि रणजितसिंह नाईक-निंबाळकर हे निश्चितच लोकसभेत सोलापूर आणि माढा मतदारसंघाचे प्रतिनिधी म्हणून उत्कृष्ठ काम करतील याची आपणाला खात्री असल्याचा विश्वासदेखील त्यांनी व्यक्त केला. काँग्रेसच्या काळात ८६ लाख कोटी रुपये या जनतेचे भ्रष्टाचारामध्ये गेले आहेत. त्या उलट मोदींच्या दहा वर्षांच्या काळात एक रुपयांचादेखील भ्रष्टाचार झाला नाही. काँग्रेसने कित्येक वर्षे सत्ता भोगली. फक्त दहा वर्षे भाजपाने काम केले आणि देशात मोठे परिवर्तन झाल्याचेदेखील बाव्वनकुळे यांनी सांगितले. त्यामुळे यावेळीदेखील सोलापूर मतदारसंघातून राम सातपुते यांना आणि माढा मतदारसंघातून रणजितसिंह नाईक-निंबाळकरांना मत देवून मोठ्या मताधिक्यांने विजयी करण्याचे त्यांनी आवाहन केले.

यावेळी माजी आ. प्रशांत परिचारक यांनी पंढरपूर आणि मंगळवेढा तालुक्याच्या विविध भागातील समस्यांचा केंद्रीय मंत्री गडकरी आणि प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांच्या पुढे उहापोह करुन दुष्काळात होरपळणाऱ्या या दोन्ही तालुक्यातील शेतकऱ्यांना दिलासा द्यावा असे आवाहन केले. शांताराम कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. प्रशांत परिचारकांनी आभार मानले.

### मीही विद्यार्थी परिषदेचा प्रॉडक्ट

राम सातपुतेंना विजयी करण्यासाठी त्यांना मतदान करण्याचे आवाहन करताना गडकरी यांनी सांगितले की, मी जसा विद्यार्थी परिषदेचा प्रॉडक्ट आहे. विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातूनच मी राजकारणात आलो आहे. तसाच राम सातपुते हेदेखील विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून राजकारणात आले आहेत. ते टक्केवारी घेणारा खासदार नाहीत तर ते काम करणारे खासदार होतील असा विश्वासदेखील गडकरी यांनी व्यक्त केला.

# तीनवेळा पराभूत होऊनही शिंदे घराण्यांकडून निवडणूक प्रतिष्ठेची : आ. सुभाष देशमुख

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. ४ मे.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश महासत्ताकडे वाटचाल करीत आहे. पायाभूत सुविधांचा चौफेर विकास करून देशाला स्वावलंबी बनविल्याने जगाचे लक्ष भारताकडे लागले आहे. समाजातील सर्व घटकांना विविध योजनांचा लाभ देऊन त्यांच्या प्रगतीसाठी प्रयत्न केला आहे. तरूणांच्या रोजगारनिर्मितीसाठी एमआयडीसी करण्यास कटिबध्द असुन मि नी बाजार समिती करण्याचा संकल्प आहे. सातपुते उपरा म्हणून विरोधकांकडून जनतेची दिशाभूल करण्यात येत आहे. मात्र दक्षिणच्या मतदारांनी तीन वेळा शिंदे घराण्याला नाकारल्यानंतरही निवडणुक प्रतिष्ठेची करून सामान्य कार्यकर्त्याचा उपरा म्हणून अपमान करण्यात येत आहे. म्हणून मतदारांनी प्रणिती शिंदे यांना पराभूत करून शिंदे घराण्यांला चौथा झटका दिल्यानंतर गरीबांची टिंगल करणार नाहीत. म्हणून विकसित देशाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी भाजपाला विजयी करण्याचे आवाहन आमदार सुभाष देशमुख यांनी केले. मंद्रुप येथील प्रचारसभेत ते बोलत होते. यावेळी आमदार राम सातपुते, प्रदेश उपाध्यक्ष विकास भेंडे, हणमंत कुलकर्णी, अप्पासाहेब पाटील वडकबाळकर, हेमंत स्वामी, मळसिध्द मुगळे, गौरीशंकर मेंडगुदले, विश्वनाथ हिरेमठ, यतीन शहा, शिवपुत्र जोडमोटे, शिवानंद लोभे, नितीन रणखांबे, दयानंद ख्याडे, अंबिका पाटील, संगप्पा केरके, संदिप टेळे, प्रशांत कडते, शिवराज कालदे आदि उपस्थित होते .



यावेळी सातपुते म्हणाले की, सुशिलकुमार शिंदे मुख्यमंत्री झाल्यानंतर विकास केला नाही. मतदारांना पाणी उपलब्ध करून दिला नाही. काँग्रेसने राम अस्तित्वावर प्रश्न उपस्थित करून हिंदुंच्या भावना दुखावल्या आहेत. राममंदिराच्या रक्षणासाठी व वैभवशाली इतिहास जोपासण्यासाठी निवडणुक महत्वाची आहे. मतदारांनी हिंदु व भगव्यांला आतंकवाद म्हणणार्यांना धडा शिकविण्यासाठी भाजपाला विजयी करावे. सत्तर वर्षे देश लुटुन दक्षिण तालुक्याला विकासापासुन वंचित ठेवणार्यांना धडा शिकवा. सर्व राज्यांनी टाकुन दिलेला एनटीपीसी प्रकल्प आणून विकासाच्या गप्पा मारण्यात येत आहे. सोलापूरमध्ये विकासगंगा आणण्यासाठी भाजपाचा विजयी करण्याचे आवाहन सातपुते यांनी केला. प्रास्ताविक मळसिध्द मुगळे यांनी केला. सुत्रसंचालन शिवपुत्र जोडमोटे यांनी केला.

## संजय राऊत यांच्याविरुद्ध दाखल गुन्ह्याचा तपास तात्काळ करावा : निलम गोऱ्हे

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई दि.४ मे-**

लोकसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत सत्ताधारी भाजपा व एकनाथ शिंदे गटावर रोज प्रचार सभा व पत्रकार परिषदेतून जोरदार हल्ला चढविणाऱ्या उद्धव ठाकरे गटाचे नेते खा. संजय राऊत यांच्यासमोर अडचणी वाढल्या आहेत. त्यांच्या विरोधात स्वप्ना पाटकर यांनी दिलेल्या तक्रारीचा तपास विशेष पथक स्थापन करून करावा तात्काळ करावा, अशी मागणी शिंदे गटाच्या नित्या व विधान परिषदेतील उपसभापती डॉ नीलम गोऱ्हे यांनी केले आहे. त्याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले असल्याची माहिती नीलम गोऱ्हे यांनी शनिवारी पत्रकारांना दिली

गोऱ्हे म्हणाल्या, स्वप्ना पाटकर यांच्याकडून संजय राजाराम राऊत यांच्या कडून त्यांचा छळ होत आहे व जीविताला धोका आहे मला मिळाले आहे. माहिम पोलीस ठाण्यात याबाबात २०१३ मध्ये एफआयआर २३९/२०१३,वाकोला पोलीस दाखल आहेत. स्टार सुरक्षा गुप्तहेर यांच्या मार्फत पाठलाग, राऊत यांचे ई मेल व मेसेजेस , प्रकरणात आरोपी व्यंकटेश उप्पर हे फरार आहेत. एफआयआर ३७५/२०१८ ह्या गुन्ह्यांचा तपास अद्याप प्रलंबित आहे. तसेच पाटकर यांचे समुपदेशनाचे काम बंद पाडण्यात आले आहे व चित्रपट प्रकल्प थांबविण्यात आला आहे असून या बाबी गंभीर असल्याने प्रकरणात वरिष्ठ अधिकारी व विशेष तपास पथक नेमुन चौकशी करण्यात यावी व पिडीतेला अधिक पोलीस संरक्षण पुरविण्यात यावे, अशी विनंती केली असल्याचे सांगितले.

## मोदींच्या विकसित भारत संकल्प पूर्तीसाठी संजयकाकांना विजयी करा

### नितिन गडकरी यांचे आवाहन

**वृत्तसंस्था,**
**सांगली, दि. ४ मे -**

केंद्रीय मंत्री श्री नितीनजी गडकरी यांनी सांगली जिल्ह्यातील जत येथे सांगली लोकसभा मतदारसंघाचे भाजप-महायुतीचे उमेदवार संजयकाका पाटील यांच्या प्रचारार्थ आयोजित जाहीर सभेला आज संबोधित केले.

मागील १० वर्षांत सांगली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सिंचनाची आणि विजेची कामे झाली आहेत. दुष्काळी भागांत सिंचनासाठी कोट्यवधीचा निधी देण्यात आला. केंद्र सरकारच्या अनेक योजनांचा शेतकरी तसेच महिला, युवा व इतर वर्गातील लोकांना लाभ मिळाला असल्याचे त्यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारताच्या संकल्पपूर्तीसाठी संजयकाका पाटील यांना या वेळीही बहुमतांनी विजयी करण्याचे आवाहन श्री गडकरीजी यांनी या वेळी उपस्थित जनतेला केले.




## कल्याण लोकसभा मतदारसंघात ४ अर्ज अवैध

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**डोंबिवली, दि. ४ मे-**

कल्याण लोकसभा मतदारसंघासाठी दाखल झालेल्या उमेदवारी अर्जांची छाननी ४ उमेदवार अवैध ठरले असून ३० उमेदवार वैध ठरले आहेत, अशी माहिती या निवडणूक निर्णय अधिकारी सुषमा सातपुते यांनी दिली. उमेदवारी अर्ज माघार घेण्याची मुदत ६ मे रोजी दुपारी तीन पर्यंत आहे. या मतदारसंघात एकूण ३४ उमेदवारांनी आपले अर्ज दाखल केले होते. या सर्व नामनिर्देशन अर्जाची शनिवारी छाननी करण्यात आली.

## पाचव्या टप्प्यातील निवडणूकीत 301 उमेदवारांचे अर्ज वैध

**तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ४ मे :**

राज्यातील लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या पाचव्या टप्प्यातील मतदान २० मे रोजी होणार आहे. यासाठी राज्यातील १३ लोकसभा मतदारसंघात उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या काल शेवटच्या दिवसापर्यंत एकूण ३९७ उमेदवारांचे ५१२ अर्ज दाखल झाले होते. आज या अर्जांची छाननी केल्यानंतर एकूण ३०१ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले असल्याची माहिती, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत देण्यात आली.

पाचव्या टप्प्यातील उमेदवारी अर्जांची छाननी केल्यानंतर धुळे लोकसभा मतदारसंघात २२, दिंडोरी - १५ , नाशिक - ३६, पालघर - १३, भिवंडी - ३६, कल्याण - ३०, ठाणे - २५, मुंबई उत्तर - २१, मुंबई उत्तर पश्चिम - २३, मुंबई उत्तर पूर्व - २० ,मुंबई उत्तर मध्य - २८, मुंबई दक्षिण मध्य - १५, आणि मुंबई दक्षिण - १७ असे एकूण ३०१ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत.

## ओपिनियन व एक्झिट पोलला निवडणूक कालावधीत प्रतिबंध

**तभा वृत्तसेव । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि४ मे :**

भारत निवडणूक आयोगामार्फत लोकसभा निवडणूकीच्पाया पार्श्वभूमीवर आयोगाने निवडणूक कालावधीत निवडणूक अंदाज (ओपिनियन पोल तसेच एक्झिट पोल) दर्शविण्यावर प्रतिबंध केला आहे.




महाराष्ट्रात एकूण पाच टप्प्यांमध्ये निवडणुका होत असून, याअनुषंगाने १६ मार्चपासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. राज्यात १९ एप्रिल रोजी सकाळी सात वाजेपासून १ जून सायंकाळी ६:३० वाजेपर्यंतच्या कालावधीत एक्झिट पोल साठी प्रतिबंध लागू राहणार आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक टप्प्यातील मतदान संपण्याच्या आधी ४८ तासाच्या कालावधीत ओपिनियन पोल अथवा अन्य मतदान सर्वेक्षणाच्या परिणामांच्या प्रकाशन अथवा प्रसारणावर प्रतिबंध असेल, असे निवडणूक आयोगाने अधिसूचनेद्वारे स्पष्ट केले आहे.

# मुंबईत चालला 'मराठी कार्ड'चा बोलबाला

## 'मविआ'कडून सर्व सहा तर महायुतीकडून चार मराठी उमेदवार

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि.४ मे-**

देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत यावेळी मराठी कार्ड महत्त्वाचे ठरले आहे. लोकसभेच्या निवडणुकीसाठी दोन्ही प्रमुख आघाड्याकडून मराठी उमेदवारावर भर देण्यात आला आहे. महाविकास आघाडीने सर्व ६ व महायुतीने ४ जागांवर उमेदवार दिले आहेत.

युतीकडून भाजपाचे दोन उमेदवार वगळता सर्वजण मराठी उमेदवार असल्याने संसदेत मुंबईतून मराठीचाच आवाज गुंजणार आहे.

मेट्रो पोलिटन महानगर असलेल्या मुंबईतील सर्व ६ जागांवर महाराष्ट्रातील अखेरच्या म्हणजे पाचव्या टप्प्यात २० मे रोजी मतदान होणार आहे. त्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी तीन मे पर्यंत अखेरची मुदत होती. त्यामुळे सर्व इच्छुकांचे नामनिर्देश पत्र शुक्रवार पर्यंत मुंबई शहर व उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल करण्यात आले आहेत त्यामध्ये महाविकास आघाडी व महायुतीकडून एकही अल्पसंख्यांक समाजातील उमेदवार देण्यात आलेला नाही. मात्र वंचित बहुजन विकास आघाडी व अन्य अपक्ष उमेदवारांमध्ये अल्पसंख्यांक समाजातील उमेदवार आहेत.

मविआचे सर्वच्या सर्व ६ उमेदवार मराठीच आहेत. त्यामध्ये शिवसेना उद्धव ठाकरे गटाकडून दक्षिण मुंबईतून अरविंद सावंत, दक्षिण मध्य मुंबईतून अनिल देसाई, उत्तर पूर्व मुंबईतून संजय दिना पाटील, तर उत्तर पश्चिम मुंबईतून अमोल कीर्तिकर यांना उमेदवारी देण्यात आली आगे. हे सर्व मराठी उमेदवार आहेत. तर काँग्रेसने उत्तर मध्य मुंबईतून वर्षा गायकवाड आणि उत्तर मुंबईतून भूषण पाटील यांना उमेदवारी दिली आहे.

मुंबईत महायुतीत जागा व जागावाटपासाठी जोरदार रस्सीखेच झाली. त्यामुळे अखेरच्या दोन दिवसांपर्यत उमेदवारांची नांवे जाहीर करण्यात आली नव्हती. दक्षिण मुंबईसाठी भाजपा आग्रही होती त्यासाठी विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर व मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी आपल्या प्रमाण परीने प्रचार सुरू केला होता मात्र अखेरीस गेल्या निवडणुकीप्रमाणेच 'फिफ्टी-फिफ्टी' चा फॉर्मुला निश्चित करण्यात आला. शिंदे गट व भाजपा प्रत्येकी ३ जागा लढवत आहे. त्यामध्ये भाजपाने विद्यमान तिन्ही खासदारांचा पत्ता कट केला. गोपाळ शेट्टी ऐवजी उत्तर मुंबईतून केंद्रीय मंत्री पियूष गोयल आणि मनोज कोटक यांच्या ऐवजी उत्तर पूर्व मुंबईतून आ. मिहीर कोटेचा ही २ अमराठी तर उत्तर मध्य मुंबईतून पुनम महाजन यांच्या जागेवर ड. उज्ज्वल निकम यांना मैदानात उतरवले आहे. एकनाथ शिंदे गटाने दक्षिण मुंबईतून आ.यामिनी जाधव, दक्षिण मध्य मुंबईतून विद्यमान खासदार राहुल शेवाळे आणि उत्तर पश्चिम मुंबईतून आ .रवींद्र वायकर या मराठी उमेदवारांना तिकीट दिली आहेत.

मुंबईत कुणाचा सामना कुणाशी होणार, याचं चित्र देखील स्पष्ट झालंय. दक्षिण, दक्षिण मध्य आणि उत्तर पश्चिम या ३ मतदारसंघात शिवसेना विरुद्ध शिवसेना म्हणजे मशाल विरुद्ध धनुष्यबाण असा सामना रंगणार आहे.

उत्तर पूर्वमध्ये शिवसेनेची मशाल विरुद्ध भाजपचं कमळ अशी टक्कर होईल. उत्तर मध्य आणि उत्तर मुंबईत भाजपचं कमळ विरुद्ध काँग्रेसचा हात अशी चुरशीची लढत होणार आहे यामध्ये कोण बाजी मारेल ,याची निश्चिती २० मे रोजी मतदानात होईल आणि त्याची स्पष्टता लक्षात येण्यासाठी निकालाच्या दिवसापर्यंत म्हणजे ४ जूनपर्यंत प्रतीक्षा करावी लागणार आहे.

# विखे-पाटलांसमोर गड राखण्याचे आव्हान

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**अहमदनगर,दि.४ मे-**

कधीकाळी सहकार क्षेत्राची पंढरी समजली जाणाऱ्या अहमदनगरने राज्याला अनेक बडे नेते दिले आहेत. त्यामुळे येथील राजकीय लढाईची राज्यभर चर्चा होत असते. अहमदनगर लोकसभा मतदारसंघात यंदा देखील लक्षवेधी लढत आहे. महायुतीचे उमेदवार व भाजपाचे खा.सुजय विखे आणि महाविकास आघाडीतील शरद पवार गटाचे उमेदवार आ.निलेश लंके यांच्यात लढत होत आहे. मात्र, ही लढाई केवळ विखे विरुद्ध लंके अशी नसून ही लढाई शरद पवार विरुद्ध विखे कुटुंब अशी झाली आहे.

सामान्य कार्यकर्ता म्हणून ओळखले जाणारे लंके व त्यांच्या पाठीराख्यांकडून या निवडणुकीला पक्षीय स्वरूपापेक्षा जनशक्ती विरुद्ध धनशक्ती असे स्वरूप देण्यावर भर देत आहे. त्यामुळे विखेंच्या विजयाचे गणित सोपे नसल्याचे चित्र आहे.

पारनेरचे आमदार निलेश लंके यांचे विखे कुटुंबासोबतचे राजकीय वैर सर्वश्रुत आहे. त्यामुळे ते पुतण्या अजित पवाराच्या गटात होते तरीही लोकसभेत त्यांना त्यांच्या हाती 'तुतारी' द्यायची, असा चंग शरद पवार यांनी खूप आधीपासून केला होता. त्याबाबत पद्धतशीरपणे खेळी करीत त्यांनी अजित पवार व विखे-पाटील यांच्याबरोबर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही मात दिली असल्याची चर्चा राजकीय जाणकारातून व्यक्त केली जात होती.

अहमदनगरमधील राजकीय समीकरणं पाहता काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात, संग्राम जगताप समर्थकांचा विरोध आणि लंकेंना असलेला पाठिंबा यामुळे यावेळी विखेंना गड कायम राखण्यासाठी मोठी कसरत करावी लागणार हे जवळपास स्पष्ट आहे.







**रणसंग्राम लोकसभेचा ; लक्षवेधी लढत**

**अहमदनगर मतदारसंघ**

विखे विरुद्ध पवार हा संघर्ष आजचा नाही, तर सुजय विखेंचे आजोबा दिवंगत माजी केंद्रीय मंत्री बाळासाहेब विखे-पासूनचा आहे पवारांनी वेळोवेळी विखेंना शह देण्यासाठी नगरच्या राजकारणात विशेष लक्ष घातलेले पाहायला मिळते. त्यांच्यामुळेच मोठया विखे- पाटलांनी काहीकाळ शिवसेनेत व्यतित केले होते. तर २०१९ मध्ये काँग्रेस आघाडीमधून नगरची जागा सोडण्यास नकार दिल्यानेच त्यांच्या पुत्र व नातवाला हातात कमळ घेणे भाग पाडले होते. त्यांचा तो निर्णय सत्ताकारणाच्या दृष्टीने योग्य ठरला होता. भाजपाने दोन वेळा खासदार असलेल्या दिलीप गांधी यांच्या बद्दलची मतदारातील नाराजी ओळखून सुजय विखे-पाटील यांना उमेदवारी दिली आणि ते मोठ्या मताधिक्याने विजयी झाले. यावेळी मात्र लंकेबरोबरच भाजमधील अंतर्गत कलहाशी सामना करावा लागत आहे.

**खा. सुजय विखे यांच्या सकारात्मक बाजू**

- पाच वर्षांच्या कार्यकाळात मतदारसंघात केलेली विकासकामे
- भाजपाच्या श्रेष्ठीबरोबरच शिंदेची शिवसेना व अजित पवार गटाचा प्रचारात सक्रिय सहभाग
- विखे -पाटील परिवाराला मानणारा मोठा वर्ग

**नकारात्मक बाजू**

- महाविकास आघाडीकडून जनशक्ती विरुद्ध धनशक्ती असे देण्यात आलेले स्वरूप
- भाजपा अंतर्गत नाराजी व गटबाजी
- विरोधकावर खालच्या स्तरावर केलेली वक्तव्ये

**आ. निलेश लंके यांच्या सकारात्मक बाजू**

- सामान्य, हाडाचा कार्यकर्ता म्हणून जनसामान्यातील प्रतिमा
- कोविड काळात केलेले मदतकार्य
- शरद पवार व उद्धव ठाकरे यांना मिळणाऱ्या सहानुभूतीचा फायदा

**नकारात्मक बाजू**

- महायुतीच्या उमेदवाराच्या तुलनेत प्रचार यंत्रणातील कमतरता
- अजित पवार गटांकडून होणारा कडवा विरोध
- वारंवारच्या पक्षांतरबद्दल केला जात असलेला अप्रचार

अहमदनगर लोकसभा मतदारसंघात शेवगाव, राहुरी, पारनेर, अहमदनगर शहर, श्रीगोंदा आणि कर्जत जामखेड असे सहा विधानसभा आहेत. यापैकी ४ राष्ट्रवादी काँग्रेसचे तर २ भाजपचे आमदार आहेत. मात्र येथे विखे पाटील यांना भाजपमधील अंतर्गत गटबाजीचा फटका बसू शकतो. विखे कोणत्याही पक्षात असोत, निवडणूक सार्वत्रिक असो की सहकारातील, विखे विरुद्ध इतर सारे हे चित्र नेहमीच असते. परंतु यंदा विखे विरोध अधिक संघटीत झाला आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत रोहित पवार यांच्याकडून झालेल्या पराभवाचे खापर राम शिंदे यांनी विखे कुटुंबियांवर फोडले होते. तर भाजपचे युवा नेते विवेक कोल्हे यांनी देखील मागील काही काळात स्थानिक निवडणुकांमध्ये उघडपणे विखे कुटुंबासमोर आव्हान उभं केले आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राम शिंदे आणि कोल्हे कुटुंबियांची समजूत काढीत त्यांना विखेंच्या प्रचाराची जबाबदारी सोपवली.मात्र त्यांची मनापासून नाराजी दूर झाली का? हा एक प्रश्नच आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, अजित पवार हे देखील सुजय विखे यांच्यासाठी मैदानात उतरले आहेत, ही सुजय विखेंची जमेची बाजू आहे.

निलेश लंकेंची ओळख सर्वसामन्यांमध्ये मिसळून काम करणारा नेता अशी आहे. कोरोना काळात त्यांनी केलेल्या कामांचे राज्यभरात कौतुक झाले होते. आपल्या मतदारसंघातील नागरिकांनासाठी कोरोना महामारीत कोविड सेंटरमध्ये ठाण मांडून होते.

अहमदनगर मतदारसंघात विखे-शरद पवारांची प्रतीष्ठा पण. पक्षफुटी आणि गटातटाचं राजकारण याचा फटका कुणाला बसणार यावर विजयाचे समीकरण अवलंबून आहे. अहमदनगरमधील राजकीय सगेसोयऱ्यांची ताकद आणि पाठिंबा हा देखील तितकाच महत्त्वाचा आहे.

अहमदनगर मतदारसंघात १९ लाख ८१ हजार ८६६ मतदार आहेत. या ठिकाणी वंचित बहुजन आघाडी व ओबीसी बहुजन पार्टीची युती झाली असून दिलीप खेडकर हे उमेदवार आहेत. ते कुणाची मते घेतात? यावर देखील विजयी उमेदवाराचे गणित अवलंबून राहणार आहे.



जनहितार्थ जारी

पंढरीच्या विठू माऊलीच्या दर्शना इतकेच पवित्र अशा मतदानाचा हक्क नक्की बजावा



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# गंधवतीचा अक्षय्य सोहळा

असं म्हणतात की, 'क्षय होत नाही वा होऊ नये अशी इच्छा असते ते म्हणजे अक्षय...!' या अर्थाने मराठी पंचांगाप्रमाणे वैशाख महिन्यातील शुद्ध तृतीयेला साजरा होणारा अक्षय्य तृतीयेचा दिवस महत्त्वपूर्ण म्हणायला हवा. या दिवसाला भारतात निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळी नावे आहेत. आज आपण त्याचा फारसा ऊहापोह करायला नको, पण एक धावता धांडोळा घ्यायचा झाला तर बंगालमध्ये अक्षय्य तृतीयेला 'वसुबारस' मानून गाय-गोऱ्याचे कौतुक केले जाते. आपल्याकडे ग्रामीण भागात अक्षय्य तृतीयेला 'आखिती' म्हणतात. 'आखिती' हा देशी भाषेतला उच्चार आहे. वर्षातील साडेतीन मुहूर्त सर्वात शुभ मानले जातात. 'अक्षय्य तृतीया' हा त्यापैकी एक आहे. काही ठिकाणी तो अर्धा मुहूर्त मानला जातो तर काही ठिकाणी एक पूर्ण मुहूर्त मानला जातो. या परमशुभ दिवशी कोणतेही शुभकार्य करण्यास हरकत नसते. कारण ते यशस्वी होणार याची खात्री असते.

दुसरी कल्पना अशी की, काही जण अक्षय्य तृतीयेच्या दिवशी त्रेतायुगाचा प्रारंभ झाल्याचे मानतात तर काही जण हा सत्ययुगाचा प्रारंभ मानतात. ओडिशामध्ये या दिवशी 'चंदनयात्रा' सजते. या दिवशी चंदनाच्या लेपाने अभ्यंगस्नान केले जाते. काही ठिकाणी या दिवशी मदनमोहनाची मूर्ती पालखीतून मिरवून तिची पूजा संपन्न होते. आपल्याकडे या दिवशी परशुरामाचा जन्म झाला असे मानतात आणि त्या निमित्ताने चिपळूणला मोठी यात्रा भरते. वेगवेगळ्या ठिकाणी या दिवसाचे वेगवेगळे पारंपरिक महत्त्व समोर येते. हा वैष्णव संप्रदायाकडे कलणारा दिवस मानला जातो.

मे महिन्याच्या सुरुवातीच्या काळात येणारा हा दिवस... या काळात रखरखीत ऊन असते. बोलीभाषेत या तापणाऱ्या दिवसांना 'वैशाख वणवा' असेही म्हणतात. रानात वणवा लागावा तसा सूर्य तापत असतो. सध्या आपण याचाही अनुभव घेत आहोत. तेव्हा रखरखीत उन्हाळ्याचे हे दिवस. संपूर्ण सृष्टी रसरसलेली, तापलेली असते; याच वेळी वसंत ऋतूची पालवीही फुटत असते. सृष्टीचे हे मोठे मजेशीर कौतुक आहे. एकीकडे भाजून काढणारे ऊन, झाडांची पाने शिशिरात आधीच गळून गेलेली असतात. नंतर ऐन चैत्रात उन्हाचा तडाखा वाढतो तेव्हा मात्र कोवळी पालवी फुटायला लागते. काही झाडांना मोहर लगडतो. आंबा, शेवगा बहरतो. म्हणजेच एकीकडे काही गोष्टी नाहीशा होत असतात तर दुसरीकडे नवी सृष्टी निर्माण होण्याच्या कोवळ्या खुणाही याच काळात दिसत असतात. म्हणूनच हा 'वसंतोत्सव' मानला जातो. हा काळ संपूर्ण उत्तरेत आणि बंगालमध्ये 'वसंतोत्सव' म्हणूनच साजरा केला जातो. तिथे या ऋतूमध्ये राधाकृष्ण क्रीडा खूप मोठ्या प्रमाणावर रंगतात आणि खेळल्या जातात. कृष्ण ही विष्णू संप्रदायातील देवता आहे, हे येथे उल्लेखनीय.

दुसरीकडे या काळात रानात धूळपेरणी (उन्हाळ्यातील पेरणी) केली जाते. विशेषत: अक्षय्य तृतीयेला वेलभाज्यांची टोकणी केली जाते. म्हणजेच लहान लहान पिशव्यांमध्ये बीजे भरून टोकणी करतात आणि त्याला थोडे पाणी घालतात. पुढे ही रोपे फुटत असतानाच पावसाळा सुरू होतो. वळिवाचा एखाद-दुसरा पाऊस पडून गेला की, ही बीजे मुळे धरू लागतात आणि त्याला अंकुरही फुटू लागतात. म्हणजे झाडांना पालवी फुटत असते, मोहर येत असतो तर बीजे टोकणीतून अंकुरही फुटत असतात. एकीकडे ही निर्मिती होत असते तर दुसरीकडे उष्णतेमुळे जमीन भाजून संहारही होत असतो. म्हणजेच संहार आणि सर्जन या एकाच नाण्याच्या दोन बाजू आपल्याला सृष्टिचक्रातील या काळात बघायला मिळतात. या सगळ्या वसंत आगमनाच्या खुणा असतात.

याच चैत्र-वैशाखाच्या काळात उत्तरेत आणि बंगालमध्ये 'दोलोत्सव' पार पडतात. त्यामध्ये अन्नपूर्णा देवीला पाळण्यात घालून झोके दिले जातात. 'दोलोत्सव' साजरा करत तिला झुलवले जाते. आपल्याकडे जुन्या परंपरेनुसार अन्नपूर्णा देवीची डोलाऱ्यामध्ये स्थापना करून पूजा केली जाते. त्या निमित्ताने हळदी-कुंकवाचा समारंभ केला जातो. त्यावेळी उन्हाळ्यात आवश्यक असणारा आणि सृष्टीने आपल्याला आपसूक दिलेला आहार सेवन केला जातो. या काळात एकीकडे भूमीतील पाणी नाहीसे होते खरे; फळे मात्र रसदार येत असतात. मग हळदी-कुंकवाच्या निमित्ताने बरोबरीच्या मित्र-मैत्रिणींना काकडी, कलिंगड, टरबूज आदी रसदार फळांचे वाटप केले जाते. थंडगार पन्हे दिले जाते. पारंपरिक धर्म वा कर्मकांड

**डॉ. तारा भवाळकर**
लेखिका ज्येष्ठ अभ्यासक आहेत

मानणारी मंडळी या काळात ब्राह्मणाला दक्षिणा, घडा तसेच शीतपेय देतात. अशा वेगवेगळ्या मार्गांनी हा रंगोत्सव साजरा होतो. तो 'रसरंग' या सुंदर नावाने ओळखला जातो.

आणखी एक गंमत म्हणजे या काळात येणारी सगळी फुले अतिशय सुगंधी असतात. म्हणजे उन्हाळा कडक तितका मोगरा, चाफा यासारख्या फुलांचा गंध मादक... म्हणजेच एकीकडे निसर्ग पाणी आटवतो, पण फळांमध्ये पाणी येते. झाडे सुकतात, पण नवी पालवी येते. दुसरीकडे सृष्टीमध्ये नानाविध गंध दरवळतात. म्हणजेच जणू पृथ्वीतून सगळे गंध फुलांमध्ये उतरत असतात आणि त्यानंतरच पाऊस येतो. वळिवाचा पाऊस पडल्यानंतर या तापलेल्या मातीतून गंध दरवळतो. जणू या मृद्गंधाच्या आधारे सृष्टी गंधोत्सव साजरा करत असते. पाने, फुले आणि मातीमधून हा गंधोत्सव साजरा होतो. म्हणूनच अशा मातीला, जमिनीला आपण 'गंधवती' म्हणतो. थोडक्यात, हा निसर्गाशी बांधलेला एक उत्सव आहे. पण हाच नव्हे, तर आपल्याकडचे सगळेच उत्सव निसर्गाशी बांधलेले आहेत. निसर्ग बदलतो तसे माणसाचे जगणे बदलत असते. मग कधी आपण त्याला देवाधर्माचे, रूढी-परंपराचे अधिष्ठान देतो आणि एखादी देवता त्याची अधिष्ठात्री असल्याचे मानतो.

एकंदरच क्षय झाला असे वाटत असतानाच पुन्हा उसळून नवी निर्मिती होते, असा हा अक्षय्य तृतीयेचा, संहार आणि सर्जन यांच्या संधिकाळाचा हा काळ. सुप्रसिद्ध लेखक पु. ल. देशपांडे यांचे आजोबा ऋग्वेदी यांच्या 'आर्यांच्या सनांचा इतिहास' या पुस्तकात सर्व सण सामाजिक उत्सव आहेत, परंतु त्यांना धार्मिक अधिष्ठानही दिले गेले, असे म्हटले आहे. सख्यांनी, प्रियकर-प्रेयसीने एकमेकांच्या संगतीत राहणे आणि सगळ्या साधनांद्वारे मनातील प्रेमभाव वृद्धिंगत करणे याला ते एक प्रकारचा 'प्रणयोत्सव' म्हणतात. राधा-कृष्णाची गीत, सर्जनाची गीते रंगणे हा त्याचाच एक भाग आहे. या अर्थी हा सुफलनाचा काळ असतो. या काळात फलन होण्याची लक्षणे दिसतात. आपण त्याला सामाजिक विधिविधानांचे अधिष्ठान देतो. म्हणजेच त्याला धर्माचे, सामाजिकतेचे, प्रणयाचे अधिष्ठान देतो. त्यामुळेच आपण ग्रामीण भागात गेलो तर या काळात प्रणयाची गाणीही रंगताना दिसतात. विशेषत: लावण्यांमधून हा प्रणयरंग मोठ्या प्रमाणात व्यक्त होताना दिसतो.




निसर्गातील संहार आणि सर्जन याच्या सीमारेषेवरचे असे उत्सव जगाच्या पाठीवरील जवळपास सगळ्या संस्कृतींमध्ये निरनिराळ्या नावांनी साजरे होतात. उदाहरणार्थ, ख्रिश्चन लोकांमध्ये साजरा होणारा 'ईस्टर' नामक सणही एक प्रकारे वसंतोत्सवच असतो. थोडक्यात, हा भारतीय परंपरेतील 'व्हॅलेंटाईन सिझन' असतो, असे मला गमतीने म्हणावेसे वाटते. सृष्टीतील तसेच मानवी जीवनातील नवसर्जन सात्त्विक पद्धतीने होण्यासाठी रसरंगांची बरसात करणारा हा काळ आहे. तो अक्षय टिकावा, त्यातील प्रेमभाव, सर्जनभाव, निर्माणभाव अक्षय राहावा आणि आपणही जगावे व लोकांना जगू द्यावे हीच भावना यात दिसते. म्हणून पाण्याचे दुर्भिक्ष्य असताना ब्राह्मणाला शीतपेयाचे दान द्यावे, असे म्हटले जाते. दुसरीकडे लोकजीवनात ग्रामीण तसेच शहरी भागात याच काळात पाणपोया सुरू होतात. जनावरांच्या पाण्याची व्यवस्था केली जाते. सर्वसामान्य माणसेही पक्ष्यांसाठी दारात छोटे घडे भरून ठेवतात. परळामध्ये पाणी ओतून ठेवतात. कारण 'जगा आणि जगू द्या' हे सूत्र आपण मानतो. पाणी आणि माती याशिवाय कोणाचेही जगणे अपूर्ण आहे. म्हणून माणूस, प्राणी, पक्षी आणि प्रणय या सगळ्यांची सांगड घालणारा हा काळ महत्त्वाचा आहे.

अर्थात सृष्टिचक्राने आपली अखंडता कायम राखणे ठरवले असले, तरी बऱ्याचदा माणूस स्वार्थासाठी, विकासाच्या नावाने हे सृष्टिचक्र भकास करू पाहतो. याचे अतिशय उग्र रूप सध्या आपण सगळेच अनुभवत आहोत. सृष्टिचक्रात नको ती ढवळाढवळ केल्यामुळे पर्जन्यमान, उष्णतामान, वनस्पती निर्मिती, पीक-पाणी या सगळ्यांवर विपरीत परिणाम होताना दिसत आहे. आता या सगळ्याला सावरण्याचे काम मनुष्यच करणार आहे. मात्र, माणसाने ते लवकर केले नाही तर सृष्टीच्या या अनमोल देणगीअभावी माणूस भिकारी होईल, वंचित होईल आणि पुढच्या पिढ्या कदाचित गर्तेतही जाऊ शकतील. म्हणूनच पुढील पिढ्यांचा विचार करून तरी माणसाने सावध होऊन निसर्गाचा समतोल टिकवण्यासाठी कार्यरत होणे गरजेचे आहे. विशेषत: पाणी, वनस्पती आणि वातावरणाचे रक्षण करणे अत्यंत गरजेचे आहे, हे इथे आवर्जून सांगावेसे वाटते. कारण हे सगळे घटक अक्षय राहिले तरच अक्षय्य तृतीयेला अर्थ आहे. अन्यथा सगळेच निरर्थक होईल.

# अक्षय राहाव्यात सत्प्रवृत्ती

आपल्याकडे साडेतीन मुहूर्त अत्यंत शुभ मानले जातात. 'अक्षय्य तृतीया' हा त्यापैकी एक. या दिवशी कोणतेही चांगले काम करण्याचा प्रारंभ करावा, असे म्हटले जाते. असे विशेष महत्त्व असल्यामुळेच या दिवशी लग्न, मुंज वा खास पूजा केल्या जातात. थोडक्यात, या दिवशी एखादे चांगले कृत्य घडावे अशी आपली इच्छा असते. अक्षय म्हणजे ज्याला क्षय नाही असा... या अर्थाने अक्षय सुख मिळावे अशी प्रत्येकाची इच्छा असते. कोणालाच दु:ख नको असते. म्हणूनच अक्षय सुखाची कामना करत हा दिवस साजरा होतो. मात्र, स्वत:साठीच नव्हे तर प्रत्येकासाठी ही कामना करावी, असे म्हणावेसे वाटते. हा केवळ आपल्यापुरते पाहण्याचा काळ नाही, याची जाणीव प्रत्येकाने ठेवायला हवी.

***सर्वांसी सुख लाभावे, जशी आरोग्यसंपदा***
***कल्याण व्हावे सर्वांचे, कोणी दु:खी असू नये***

असे आपल्याला शाळेत शिकवले गेले आहे. डबा खाण्यापूर्वी सर्वांनी एकत्र म्हणायची ही प्रार्थना होती. आमच्याच नव्हे, तर सगळ्यांनीच ही वा या अर्थाची प्रार्थना म्हटली असेल.

***सर्वे भवन्तु सुखिनः सर्वे सन्तु निरामयाः ।***
***सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद्दुःखभाग्भवेत्।***

असेही आपण म्हणतो. ज्ञानेश्वरांनीही 'सुखिया झाला...' असे म्हटले आहे. अशा प्रकारे सर्व चांगल्या गोष्टी अक्षय राहण्याची कामना करणारी अक्षय्य तृतीया आहे. तिचे महत्त्व जाणून या दिवशी सगळ्यांनीच चांगली कामे करण्याचा संकल्प करणे गरजेचे आहे. समाजहिताची, समाजस्वास्थ्याची, समाजकल्याणाची कामे करणे ही आजची सगळ्यात मोठी गरज आहे. आजही जातिभेद नष्ट होण्याचा विषय ऐरणीवर येणे गरजेचे आहे. त्यासाठी सगळ्यांनी एकत्र येत प्रयत्न करू या. हा कनिष्ठ, तो उच्च हा भेद आता तरी संपायला हवा. नाही म्हणायला आता तो कमी होतो आहे. पूर्वीपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर वा त्यांच्यासारख्या समाजसुधारकांनी त्यासाठी अथक प्रयत्न केले. पण हा भेद अद्याप समूळ नष्ट झालेला नाही, ही खंत आहे. गावागावांमध्ये अजूनही जातिभेदाला प्रोत्साहन देणाऱ्या, भेदाभेदाची मुळे जपणाऱ्या घटना वा कृती आपण पाहतो. एखाद्याला वरून पाणी देणे, तांब्याला स्पर्श न करू देणे असे प्रकार पाहायला मिळतात. ते नक्कीच खुपणारे आहे. त्यामुळे यंदाची अक्षय्य तृतीया साजरी करताना हा भेदाभेद नष्ट करण्याच्या चांगल्या कामाला आपल्या सोसायटीपासूनच सुरुवात करायला हवी. सोसायटीतील सदस्यांनी कथित खालच्या व्यक्तीला पाणी दिले, आपण घरी खातो ते खायला दिले, घरात प्रवेश दिला तर बघता बघता भेदाच्या भिंती गळून पडतील. माझ्याबद्दल बोलायचे तर, सोसायटीतील गुरख्याला आमच्याकडे मुक्त प्रवेश असतो. सुरुवातीला त्याला विशेष वाटायचे. मात्र, मला वा मुलींना हे खूप स्वाभाविक वाटायचे. या संस्कारातच मी मुलींना तसेच विद्यार्थ्यांना घडवले. त्यामुळेच मुलींच्याही घरात आता कोणतेही भेदभाव पाळले जात नाहीत.

सध्या विविधांगाने दु:ख आयुष्यात प्रवेश करतात. ती टाळण्यासाठी आधी आदर्श समाज घडणे गरजेचे आहे. ते साधण्यासाठी बरेच उपाय योजता येतील. उदाहरणार्थ एक सुस्थापित, आपल्या गरजा व्यवस्थित भागवू शकणारे कुटुंब एखादे गरीब कुटुंब नक्कीच दत्तक घेऊ शकते. माझ्या मते, ही सध्याच्या भारतातील सर्वोत्तम परिस्थिती होईल. सधन कुटुंबाने एखाद्या गरजू कुटुंबाचा भार घेतला तर बघता बघता अनेक प्रश्न निकामी निघतील. शेवटी दातृत्व सगळ्यांमध्ये नसते. खरे तर अनेकांची आपल्यापुरते बघण्याचीच वृत्ती असते. मात्र, ती सोडली वा कधी तरी ती सोडण्याची सक्ती केली तर समाज निश्चितच एका वेगळ्या वळणावरून प्रवास करू लागेल.

पूर्वी अनेक घरांनी असे आदर्श घालून दिले आहेत. काळाच्या पुढे चालणारी वा स्वत:आधी समाजाचा विचार करणारी अशी अनेक घरे मी पाहिली आहेत. कित्येक घरांमध्ये आधी घरात काम करणाऱ्या सेवकवर्गाला आधी पोशाख केला जात असे आणि त्यानंतर घरातील मुलांसाठी खरेदी होत असे. या संस्कारांमधून समोर आलेले लोक आजही हे संस्कार निगुतीने जपतात. कारण ते चिरंजीवी असतात. आपल्या आईवडिलांना असे वागताना पाहणारी मुले पुढील आयुष्यात त्याच संस्कार आणि शिकवणीची धुरा वाहतात. म्हणूनच आजच्या पालकांनी मुलांवर असेच संस्कार करणे गरजेचे आहे. एकीकडे सद्भावना अक्षय्य राहायला हव्यात तर दुसरीकडे गुलामगिरीच्या मानसिकतेचा क्षय व्हायला हवा. बायकांकडे बघण्याच्या वाईट दृष्टीचा क्षय व्हायला हवा. सगळी संपत्ती आपल्याकडेच हवी, या मतलबी वृत्तीचा क्षय व्हायला हवा. एखाद्याकडे वाटण्याची क्षमता नसली तर ती येनकेनप्रकारेण आणायला हवी, असे वाटते.

**डॉ. विजया वाड**
ज्येष्ठ लेखिका

एकीकडे हा संपूर्ण उत्सव सामाजिक अंगाने महत्त्वाचा असतो तर दुसरीकडे उन्हाळा सुसह्य करण्यासाठी तसंच निसर्ग संवर्धनासाठीही महत्त्वपूर्ण असा असतो. पाणवठे हे सृष्टीमधील प्राणकेंद्र आहेत. पाण्याशिवाय जीवन शक्य नाही, सजीवांचं अस्तित्व शक्य नाही. म्हणूनच या दिवशी कुंभामध्ये जल घालून त्याची पूजा करतात आणि हे पाणी सगळ्यांनी प्यायचं आहे, अशी सामुदायिक भावना निर्माण करतात. याचा सरळ अर्थ म्हणजे पाण्यावर आधी सृष्टीतील सर्व प्राण्यांचा हक्क असून त्यानंतर माणसाचा हक्क आहे. आपण नेहमी वाचतो अथवा पाहतो की, जंगलातले प्राणी मानवी वसाहतींकडे येऊ पाहात आहेत. कारण पाणवठे उजाड झाले आहेत. असे असताना प्राण्यांची तहान कशी भागणार, हा साधा प्रश्न आहे. आजही गावागावांत अक्षय्य तृतीयेच्या दिवशी सामुदायिक पाणपोया घातल्या जातात. पहिला पाऊस पडेपर्यंत पाणपोया सुरू ठेवायच्या असतात. सगळ्या लोकांना पाणी मिळायला हवे. यात्रेकरू, वाटसरूंना पाणी मिळावे ही त्यामागील भावना असते. ठरावीक लोक पाणी पुरवण्याची जबाबदारी घेतात. पाण्याच्या स्वच्छतेची काळजी घेतली जाते. कारण पाणी हे जीवन आहे तसेच तो सृष्टीमध्ये नवरस निर्माण करणारा घटक आहे. म्हणूनच शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्याची दक्षता घेतली गेली तर आरोग्याचा प्रश्न सुटेल. पर्यावरण संतुलन साधले जाईल. लोकांना पाण्याची किंमत कळेल. अक्षय्य तृतीयेच्या निमित्ताने हाती घेतले जाणारे असे सगळे उपक्रम उपयुक्त ठरतील.

पाण्याबरोबरच सृष्टीची पूजा करताना आंबा या फळाचा नैवेद्य दाखवण्याची प्रथा आहे. आंब्याला 'अमृतवृक्ष' म्हणतात. हे केवळ रसापुरते फळ नाही तर तो तपश्चर्येचा वृक्ष आहे. ज्ञानाच्या संवादाचा वृक्ष आहे. पूर्वीच्या गुरुकुलातल्या चर्चा याच आम्रवृक्षाखाली होत असत. आजही मंगल कार्यात आंब्याच्या डहाळीचे प्रथम पूजन होते. आंब्याचे तोरण बांधल्याशिवाय मंगल कार्य पुढे जात नाही. या साऱ्या गोष्टीचा अर्थ एकच. आपण ज्या झाडाची फळे खातो ते आपण हयातीत लावलेच पाहिजे. पूर्वी गुरुकुलात हा नियमच होता. झाड लावल्याशिवाय तुम्हाला फळ खायचा अधिकार नाही, असे मानले जात असे. ही भावना आपल्या जगण्यातही महत्त्वाची आहे. या दिवशीचा नैवेद्य सामुदायिक असतो. तो प्रसाद म्हणून सगळ्यांना द्यायचा असतो. सृष्टीच्या पूजेला सगळ्यांना बोलवायचे असते. या सगळ्या प्रथा-परंपरांमधून आपण व्यापक होण्याचा संदेश मिळतो. संकुचितपणा नाहीसा करणे आणि व्यापक मनाने वर्तमानाला सामोरं जाणं म्हणजे अक्षय्य तृतीया होय.

थोडक्यात, नकारात्मक गोष्टींचा त्याग करून सगळ्यांना उदात्त प्रेरणेने घेऊन पुढे जाणे म्हणजे ही तृतीया साजरी करणे. 'मी माझ्यापुरते' न पाहता हा 'मी' 'आम्ही' कसा होईल, याचा विचार या दिवशी करायचा असतो. अक्षय्य तृतीया हा चैत्र गौरीच्या हळदी-कुंकवाच्या समाप्तीचा दिवस असतो. चैत्र शुद्ध तृतीया ते वैशाख शुद्ध तृतीया या काळात चैत्रगौरीचे हळदी-कुंकू केले जाते. यालाही एक विशिष्ट सामाजिक हेतू आहे. सर्व थरातल्या स्त्रियांनी एकत्र यावे, विचारांची देवाणघेवाण व्हावी, स्त्रियांना ज्ञानसंपन्न करावे यासाठी गौरीचे पूजन करतात. गौरी म्हणजे पार्वती आणि गौरी म्हणजेच लक्ष्मी. पार्वतीमध्ये तप आहे तर लक्ष्मीमध्ये ऐश्वर्य आहे. या दोन मूल्यांशिवाय माणसाचे व्यक्तिमत्त्व समृद्ध होत नाही, हेच यातून सुचवायचे आहे.

अक्षय्य तृतीयेच्या सणाच्या निमित्ताने मानवी जीवनाचा प्रवास तपातून झाला पाहिजे आणि त्या तपाला ऐश्वर्याची फळे लागली पाहिजेत, हा विचार दिसतो. म्हणूनच या मुहूर्तावर सोने खरेदी करतात. या मुहूर्तावर सोने खरेदी शुभ समजली जाते. अर्थात सोने खरेदी करणे म्हणजे प्रत्यक्ष दुकानात जाऊन सोने खरेदी करणे असा अर्थ नाही तर कष्टातून आपले ऐश्वर्य वाढवण्यालाही जीवनाचे सोने करणे म्हणतात. आपल्याला साध्य करायचे आहे ते मनापासून करत, सतत सकारात्मक वृत्तीने पुढे जाणे हा अक्षय्य तृतीयेचा खरा ठेवा आहे. ही भावना जाणून घेतली तरच आपल्याला या सणाचे महत्त्व सहज लक्षात येईल.

# रविवारची पत्रे

## शिक्षण क्षेत्राचे बाजारीकरण

इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या शुल्कात भरमसाट वाढ झाली आहे. नर्सरी ते दहावीपर्यंतच्या शिकवणी शुल्कासह पाठ्यपुस्तके, गणवेश व इतर शैक्षणिक साहित्यांचा खर्च लाखोंच्या घरात पोहोचला आहे. शासकीय शाळांमध्ये शिक्षण व इतर सोयी-सुविधा मिळत नसल्याने पाल्यांना शिकवावे तरी कसे, अशी चिंता पालकांकडून व्यक्त केली जात आहे. इंग्रजी माध्यमांच्या खाजगी शाळा विनाअनुदानित किंवा स्वयंअर्थसहाय्यता तत्त्वावर चालविल्या जातात. त्यामुळे वार्षिक होणारा खर्च विद्यार्थ्यांकडून वसूल केला जातो. बहुतेक शाळांचे शुल्क पाहिल्यास त्या नफा कमावण्याच्या उद्देशानेच सुरू झाल्या असल्याचे स्पष्ट जाणवते. इंग्रजी माध्यमांची शाळा सुरू करणे हा व्यवसाय झाल्याचे मानले जाते. शिकवणी शुल्काच्या नावाखाली घेण्यात येणाऱ्या अंदाजे खर्चात अशी वाढ झाली आहे- नर्सरी ४० हजार, केजी १- ३७ हजार, केजी २ ते पहिली ४५ हजार, चौथी ते पाचवी ५५ हजार, सहावी-सातवी ६५ हजार, आठवी-नववी ७५ हजार तर दहावीचे शिकवणी शुल्क ८५ हजारापर्यंत पोहोचले आहे. नर्सरी पासून दहावीपर्यंतचे शिक्षण शुल्क, पाठ्यपुस्तके, गणवेश व इतर साहित्य असा चार ते पाच लाखांपर्यंत खर्च एका पाल्यावर होत आहे. १३ वर्षांत पालकांना लाखो रुपये शुल्क भरावे लागत असल्याचे निदर्शनास येते. प्रत्येकच पालकाला एवढी मोठी रक्कम जमविणे शक्य नसल्याने व सरकारी शाळा बंद होत असल्याने मुलांना शिकवावे तरी कसे? या विवंचनेत पालक आहेत. दर्जेदार शिक्षणाच्या नावाखाली शिक्षण क्षेत्रात चांगलीच चमकोगिरी वाढली असून या मृगजळाच्या मागे धावत असताना सर्वसामान्य पालकांची आर्थिक ओढाताण होत आहे. समाजाचा सर्वांगीण विकास व्हायचा असेल तर शिक्षण हे महत्त्वाचे आहे आणि त्यातून भारतात शाळा सुरू झाल्या. त्यानंतर हळूहळू ग्रामीण भागांतही शिक्षणाची सुरुवात झाली. गावातील अनेक विद्यार्थी शिक्षण घेऊ लागले. विशेष म्हणजे, त्या काळात जिल्हा परिषद शाळेतून शिक्षण घेऊन अनेकांनी उच्च पदावर जाऊन नावलौकिक मिळविले. परंतु, मागील २० ते २५ वर्षांपासून पवित्र अशा शिक्षण क्षेत्राचे व्यापारीकरण सुरू झाले. त्यामुळेच शिक्षण म्हणजे पैसा आणि पैसा म्हणजे शिक्षण हे समीकरण रूढ झाले. टक्केवारीचा बागुलबुवा उभा केला गेला आणि यातूनच शाळेच्या आकर्षक इमारती, विविध अभ्यासक्रम निर्माण केले गेले. अत्याधुनिक साधने, आकर्षक पृष्ठे असलेली पुस्तके, महागडा गणवेश, वर्षभर सर्वांगीण विकासाच्या नावावर सुरू असलेले उपक्रम, त्यात होणारी लाखो रुपयांची उलाढाल यामुळे सामान्य पालक हैराण झाले आहे. परंतु, हे सर्व करूनही आज शिक्षणाचा दर्जा सुधारला आहे काय? हा संशोधनाचा विषय आहे. आज दोन ते तीन किलो वजनाचे दप्तर घेऊन जाणारा 'येस', 'नो मॅम', 'हाय', 'गुड मॉर्निंग' म्हणणारा विद्यार्थी कुठे जात आहे? याचा विचार प्रत्येकाने करणे गरजेचे आहे. दुसरीकडे उच्चवर्गीय पालक आपले स्टेटस सांभाळण्यासाठी पाल्यांना मोठमोठ्या महागड्या शाळेत पाठवून लाखो रुपये खर्च करीत आहेत.

**अरुण कराळे**/९०९६३२६२७२

## कामगार विमा; एक जीवनदायी योजना

आपल्या भारत देशात संघटित क्षेत्रातील कामगारांसाठी राज्य कामगार विमा योजना आणि त्याचे लाभ हा एक मोठा महत्त्व असणारा विषय आहे. कारखान्यात काम करणारे, नोकरी करणारे, एखाद्या संस्थेमध्ये किंवा निमशासकीय किंवा खाजगी व्यवसायात काम करणारे लोक यांचा समावेश आपल्याला कामगाराच्या व्याख्येत करता येईल. ही कामगार मंडळी देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये परिश्रमाने उत्पादनाच्या आणि उत्पन्नाच्या रूपाने आपले योगदान देत असतात. कारखान्यात किंवा संस्थेमध्ये काम काम करताना बऱ्याचदा जिवावर उदार होऊन कामगारांना काम करावे लागते.



कामगारांच्या जिवाला काही इजा झाली, धोका संभवला, तर तो त्याचा उपचार कसा करणार? उपचाराचा खर्च कोण वहन करणार? कारखानदार तर केवळ नफा कमाविण्यावर भर देत असतात. तसेच कारखान्यात काम करीत असताना त्याला त्याच व्यवसायाशी निगडित असलेला जर कुठला आजार जडला तर त्याने आपला स्वत:चा उपचार कोठे करावा? म्हणून आपल्या देशात कामगाराच्या हिताचे कायदे करण्यात आले. त्यात राज्य कामगार विमा योजना या मोठ्या योजनेचा समावेश होता. कामगारांचे हित जोपासणे त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे, कामगारांच्या परिवारालासुद्धा या योजनेचा पूर्ण लाभ मिळावा, म्हणून विशेष तरतुदी केलेल्या आहेत. महिला कामगारांसाठी बाळंतपणाची सुटी आणि बाळंतपण करण्यासाठी लागणाऱ्या सर्व सुविधा पुरवणे तसेच जन्मलेल्या बाळाच्या लसीकरणापासून तर तो समजदार होईपर्यंत त्याच्या आरोग्याची काळजी राज्य कामगार विमा योजना अंतर्गत असलेले सेवा दवाखाने घेत असतात. 'कामगार राज्य विमा अधिनियम १९४८' या कायद्याचा व्यापक विचार एका अशा सामाजिक विमा योजना स्वीकारल्या जाण्यासंदर्भात होत्या; ज्यात आजार, प्रसूती, स्थायी-अस्थायी शारीरिक अपंगत्व आणि ज्यामुळे मजुराच्या मजुरीची हानी आणि कौशल्य क्षमतेचा नाश तसेच नोकरीवर दुर्घटनेमुळे मृत्यू आणि यासारख्या आकस्मिक दुर्घटनांपासून कामगारांना सुरक्षा प्रदान करेल. हाच अधिनियम कामगार आणि त्याच्या कुटुंबीयांच्या योग्य आणि चांगल्या उपचाराची जबाबदारी स्वीकारतो. कामगारांच्या वेतनातून अल्प राशी मासिक अंशदान म्हणून कापण्यात येते आणि कारखानदार सामाजिक सुरक्षेसाठी म्हणून या कामगारांसाठी एक राशी जमा करीत असतात. जमा होणाऱ्या याच एकत्रित रकमेतून राज्य कामगार विमा योजनेचे सर्व लाभ विमेदारांना पुरविले जातात. आज देशभर जवळपास सर्व राज्यांमध्ये राज्य कामगार विमा योजना रुग्णालय आणि सेवा दवाखाने आहेत. अगदी साध्या सर्दी-तापापासून तर जीर्ण आणि दुर्धर आजारापर्यंत सर्व प्रकारांचे उपचार कोणतेही नवीन शुल्क न आकारता करण्यात येतात. भारतीय कामगारांसाठी राज्य कामगार विमा योजना ही सरकारी योजना एक जीवनदायी योजना आहे, असेच म्हणावे लागेल.

**डॉ. हर्षवर्धन कांबळे**/९८२२५९३७५७

## टी-२० विश्वचषकासाठी पराभूत मुंबई संघातील चार खेळाडू

अमेरिका व वेस्ट इंडीजमध्ये खेळल्या जाणाऱ्या टी-२० विश्वचषकासाठी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने तात्पुरता भारतीय संघ जाहीर केला आहे. अंतिम संघ सादर करण्याची अंतिम मुदत २५ मे आहे; त्यामुळे या संघात बदल होऊ शकतो. विश्वचषकासाठीचा भारतीय संघ असा : रोहित शर्मा (कर्णधार), हार्दिक पांड्या (उपकर्णधार), यशस्वी जयस्वाल, विराट कोहली, सूर्यकुमार यादव, ऋषभ पंत (यष्टिरक्षक), संजू सॅमसन (यष्टिरक्षक), शिवम दुबे, रवींद्र जडेजा, अक्षर पटेल, कुलदीप यादव, यझुवेंद चहल, अर्शदीप सिंग, जसप्रीत बुमराह, मोहम्मद शिराज. राखीव खेळाडू : शुभमन गिल, रिंकूसिंग, खलील अहमद व आवेश खान. भारतात आयपीएल २०२४ चे टी-२० क्रिकेट सामने सुरू आहेत. या सामन्यांमध्ये मुंबई इंडियन्सचा नुकताच आठवा पराभव झालेला आहे. या मुंबई इंडियन्स संघातील रोहित शर्मा, हार्दिक पांड्या, सूर्यकुमार यादव व जसप्रीत बुमराह या चार खेळाडूंची होणाऱ्या विश्वचषक स्पर्धेमध्ये निवड झाली आहे. लखनौ येथे झालेल्या लखनौ विरुद्ध मुंबई इंडियन्स या टी-२० सामन्यात रोहित शर्मा (४), सूर्यकुमार यादव (१०), हार्दिक पांड्या (०) अशा धावा काढून बाद झाले आहेत तसेच जसप्रीत बुमराहचा पण फलंदाजी व गोलंदाजीत प्रभाव नव्हता. भारतीय संघाचा अनुभवी कर्णधार रोहित शर्मा याला मुंबई इंडियन्स संघात कर्णधार न करता हार्दिक पांड्याला कर्णधार कसे केले, हे अनाकलनीय आहे. कदाचित या कारणाने तर मुंबई इंडियन्स संघ आयपीएलच्या गुणतालिकेत दहापैकी नवव्या स्थानावर आहे. सध्या सुरू असलेल्या आयपीएल टी-२० सामन्यांमध्ये गोलंदाजांपेक्षा फलंदाजांना जास्त वाव असल्याचे दिसते. सर्व फलंदाज चौकार किंवा षटकार मारण्याच्या प्रयत्नात असतात. षटकार मारताना तो कधी षटकार होतो तर कधी चौकार! थोडक्यात चेंडू उंच मारण्याकडे सर्व फलंदाजांचा कल दिसतो. त्यातही जे अ भारतीय खेळाडू आहेत त्यांचे षटकार बरोबर बॉण्ड्री लाईनच्या बाहेर पडतात. भारतीय फलंदाजांना लवकरात लवकर षटकार व चौकार मारून सामन्यात जास्तीत जास्त धावा करण्याचा मोह आवरता येत नसल्याचे दिसते. हे रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव व हार्दिक पांड्या यांच्या फलंदाजीवरून स्पष्ट दिसून आले. टी-२० सामन्यांमध्ये फलंदाजाने सुरुवातीला दोन-तीन षटके शांतपणे, संयमाने, कौशल्याने व जबाबदारीने खेळणे आवश्यक आहे. नंतर चेंडूवर नजर पक्की झाल्यानंतर चौकार अथवा षटकार मारण्यास हरकत नाही. सध्या सुरू असलेले आयपीएलचे सामने हे पुढे होणाऱ्या विश्वचषक स्पर्धेसाठी निवड चाचणी आहे, असे समजावे. या आयपीएल सामन्यांमध्ये जे खेळाडू उत्तम कामगिरी करतील, त्यांची निवड व्हावी, असे वाटते. सध्याच्या डिजिटल सोयीमुळे प्रत्येक खेळाडूच्या कामगिरीचा अहवाल आपल्याजवळ उपलब्ध आहे. अंतिम निवड यादीमध्ये कोणतेही राजकारण, आरक्षण अथवा अवैध प्रकार होता कामा नये तरच विश्वचषक स्पर्धेमध्ये भारत विश्व विजेता होऊ शकतो.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

## मतदाराची कर्तव्ये

दैनिक तरुण भारतच्या २८ एप्रिल 'रविवारची पत्रे' या सदरात आलेल्या अनंत मधुकर मुंजे यांचे 'राजकीय पक्षांचाही जबाबदारी आहेच' विचार वाचले. त्यांचे मत समर्पक वाटले. सरकारी यंत्रणा आणि राजकीय पक्षांसोबतच मतदाराचे पण काही कर्तव्य आहेत, ते त्यानेही पाळलेच



पाहिजे. कुठल्याही निवडणूक प्रक्रियेची सुरुवात लोकसभा, विधानसभा निवडणूक जाहीर झाल्याबरोबरच सुरू होते. जसे निवडणूक आयोगाकडून मतदार याद्या अद्ययावत करणे, त्या प्रकाशित करणे, मतदारांना आवाहन करणे आणि फायनल मतदार याद्या जाहीर करून प्रकाशित करणे. या सर्व प्रक्रियेत तीन-चार महिन्यांचा कालावधी नक्कीच लागतो. मतदात्याचे हे कर्तव्यच आहे की, फायनल मतदार याद्या जाहीर झाल्याबरोबर त्याने आपले व आपल्या परिवाराचे नाव मतदार यादीत आहे की नाही हे, तपासून घ्यायला हवे. निवडणूक आयोगाने या याद्या त्यांच्या वेबसाईटवर उपलब्ध करून दिलेल्या असतात व सांप्रत सर्व नागरिक स्मार्ट फोन वापरतात. केव्हाही, कधीही आणि कुठेही याद्या तपासता येतात. ज्यांच्या जवळ स्मार्टफोन नसतील त्यांनी आपल्या पसंतीच्या राजकीय पक्षाच्या कार्यालयात संपर्क साधून आपले व आपल्या परिवाराचे नाव कुठल्या यादीत आहे, हे सुनिश्चित करून घ्यायला हरकत नाही. मतदाराच्या घरातील एखादा सदस्य जर मतदानाच्या दिवशी त्या तारखेला मतदानासाठी काही कारणास्तव उपस्थित राहू शकणार नसेल तर त्यासाठी निवडणूक आयोगाने काय सोयी केलेल्या आहेत त्या सोयींचा लाभ अवश्य घ्यावा. जसे वैयक्तिक कारणाने अथवा सरकारी कामाने जर त्यादिवशी गावाबाहेर राहणे अपरिहार्य असेल तर पोस्टल बॅलट अथवा ऑनलाईन मतदान करण्यासाठी निवडणूक आयोगाने दिलेले फार्म ६, फार्म ७ भरून घ्यावे. मतदाराचे हे कर्तव्यच आहे की, मतदानाच्या तारखेच्या सात दिवस आधीच त्याने हे सुनिश्चित करून घ्यायला हवे की त्याच्या घरी असणारा एखादा दिव्यांग वा वरिष्ठ नागरिक; जो मतदानासाठी मतदान केंद्रापर्यंत जाऊ शकत नसेल, अशांसाठी निवडणूक आयोगाने दिलेल्या नियम व सोयींचा लाभ घ्यावा. मतदान जसा हक्क आहे तसेच मतदाराचे हे कर्तव्य पण आहे. आपले व आपल्या परिवाराचे एकही मत वाया जाणार नाही, याची सर्वांनी काळजी घ्यावयाची आहे.

**शेखर दारव्हेकर**/९५६१२०२०८४

## मुनिवर्य दधिची ऋषींचे देहदान, अवयवदान!

महापुण्याचे कर्म देहदान व अवयवदान या मानवी शरीराच्या संबंधित श्रेष्ठदान संकल्पांसंबंधी 'पुराण' या धार्मिक, पौराणिक ग्रंथातील साहित्यात उल्लेख आढळतो. त्यात देव आणि दानव (राक्षस) हे एकमेकांच्या अस्तित्वासाठी क्रियाशील होते व त्यांच्यात चढाओढ लागून होती. त्यांच्यात आपापसात युद्ध होत असत; ज्यात देवांचा पराजय निश्चित होता. राक्षसांचे अधिपती वृत्रासुराचे विभिन्न स्तरांवरील अत्याचार वाढत होते. देवांमध्ये प्रचंड दहशत निर्माण झाली होती. यातून मुक्ती मिळावी म्हणून त्यांनी विभिन्न स्तरावर प्रयत्न करून पाहिला, परंतु ते अपयशी ठरले. त्यांनी इंद्रदेवाकडे धाव घेतली. देवेंद्रही काळजीत पडले. संकटातून मुक्ती पाहिजे असेल तर वृत्रासुराचे अस्तित्व नष्ट करणे हाच एकमेव मार्ग होय. योग मुनिवर्य दधिची ऋषींच्या पाठीच्या मणक्यांद्वारा निर्मित वज्र व इतर विभिन्न अस्थींपासून अस्त्रांची निर्मिती करून वृत्रासुराचा वध होऊ शकतो, हेच त्याच्या मरणाचे रहस्य असल्याचे कळल्यावर इंद्रदेवांनी दधिची ऋषींचा शोध घेण्याची सर्व देवांना आज्ञा केली. सर्व देव शोधकामी लागले. अविरत प्रयत्नांपश्चात त्यांच्या शोधमोहिमेची इतिश्री झाली. दधिची ऋषी एका वृक्षाच्या छायेत दृढ तपश्चर्येत मग्न होते. त्यांनी नेत्र उघडून समोर पाहिले तर तेथे एवढ्या मोठ्या संख्येत हात जोडलेल्या सर्व देवांची उपस्थिती पाहून ते अचंबित झाले. येण्याचे प्रयोजन विचारले. देवतांनी येण्याच्या कारणाचे स्पष्टीकरण केले. प्रस्तुत मागणी एका चांगल्या कारणास्तव असल्यामुळे व त्याद्वारे सर्व देवतांना एका महान संकटातून मुक्ती प्राप्त होणार असल्यामुळे दधिची ऋषींनी प्रस्तुत मागणीला समर्थन दिले. मात्र एक मोठी समस्या निर्माण झाली; ती म्हणजे जीवित अवस्थेत त्यांच्या पाठीचा मणका, कणा व इतर अस्थी वज्र व इतर अस्त्र निर्मितीसाठी त्यांचा देह कसा काय दान करणार? त्यासाठी त्यांचा श्वासोच्छ्वास खंडित करणे अपरिहार्य होते. म्हणजेच 'मरणोत्तर देहदान' हाच एकमेव पर्याय. ही बाब ध्यानात येताच दधिची ऋषींनी योगाद्वारे श्वासोच्छ्वास खंडित करून देहत्याग केला. म्हणजेच त्यांनी देवतांना स्वत:चे देह दान केले.

प्रस्तुत पार्थिवातील मणका व इतर आवश्यक अस्थी विभक्त करून त्यांच्या माध्यमातून गांडीव, पिनाक, सारंग इ. अस्त्रे तयार केली गेली. दधिची ऋषींनी त्यांच्या अस्थींच्या रूपात अवयवदान केले. प्रस्तुत निर्मित अस्त्रांद्वारे देवादिकांनी वृत्रासुरादी दानवांशी युद्ध करून त्यांचा विनाश केला. तसेच कर्णाने त्याची कवच कुंडले काढून दिल्यास त्याच्यावर मृत्यू ओढवणार हे माहीत असूनदेखील कर्णाने स्वत:ची कवच कुंडले दान करून मृत्यू गाठला. बुद्धिदेवता श्रीगजाननाने गजराजाचे मस्तक धारण करणे हेदेखिल अवयवदानातील प्रत्यारोपणाचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. पुराणात उल्लेखित मुनिवर्य दधिची ऋषींचे देहदान व अवयवदान हे अखिल विश्वातील पहिले ज्ञात महान दानकर्म होय!

**रमेश सातपुते**/९४२१७०५३८१

रविवारची पत्रे व वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनानुसार चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे मतदान जनजागृती मोहीम

**सोलापूर, दि. ४ मे-**

जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी वर्ग, सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज वअग्रिकलचरचे पदाधिकारी, संलग्न विविध व्यापारी, उद्योजक, कारखानदार संघटना मतदानात वाढ होण्यासाठी मोहीम प्रभावीपणे राबविण्याचे आवाहन केले. जिल्हाधिकाऱ्यांनी केलेल्या आवाहनानुसार ही मोहीम प्रभावीपणे राबवून मतदान टक्केवारीत वाढ होण्यासाठी आपले योगदान म्हणून आपापल्या आस्थापना, उद्योग, कारखाने व नागरिकांनी मंगळवार दिनांक ७ मे रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत स्वतः मतदार व त्यांच्या परिवारातील सदस्य, परिचित आदी नी मतदान करून आपले कर्तव्य पार पाडावे हे आवाहन जनजागरण मोहिमेअंतर्गत मतदारांना आवाहन करण्या बाबतचे डिजिटल फ्लेक्स बॅनर शहरातील विविध भागातील ऑटोरिक्षा मागे, आजोबा गणपती मंदिर, सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्स, सोलापूर जिल्हा यंत्रमागधारक संघ, बिट्रा पॉवरलूम सेंटर, अनेक दुकानात, पेट्रोल पंप येथे लावण्याची मोहीम सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अ‍ॅन्ड अग्रिकलचरचे अध्यक्ष राजू राठी, सचिव धवल शहा, संचालक संजय कंदले सुकुमार चंकेश्वरा, दयासागर सालुटगी, विश्वनाथ मेलगिरी, बिट्रा पॉवरलुम सेंटरचे प्रमुख अमर पाटील, विकास जैन यांनी राबविली.



### प्रगतीच्या नादात पर्यावरणाकडे आपले अक्षम्य दुर्लक्ष; दीपक आर्वे यांची खंत

**सोलापूर, दि. ४ मे-**

वृक्षवल्ली आम्हा सोयरे म्हणजे संतांनीदेखील आपल्याला पुराण काळापासून वृक्षाचे महत्व सांगितलेले आहे. आज मानवाने प्रचंड प्रगती केलेली आहे. परंतु प्रगती करण्याच्या नादात आपले पर्यावरणाकड अक्षम्य दुर्लक्ष झालेले आहे अशी खंत निवृत्त पोलीस उपायुक्त दीपक आर्वे यांनी व्यक्त केली. वीरशैव लिंगायत प्रतिष्ठानतर्फे महात्मा बसवेश्वर जयंतीचे औचित्य साधून आयोजित बसव सप्ताहाचा शुभारंभ शुक्रवारी वृक्षारोपणाने करण्यात आला. गणपती घाटावर आयोजित या वृक्षारोपण समारंभाच्या अध्यक्षस्थानी दीपक आर्वे हे होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गणपती घाट परिसरात विविध वृक्षांचे रोपण करण्यात आले. वृक्ष संवर्धन ही काळाची गरज असून आगामी काळात प्रतिष्ठान तर्फे वृक्षारोपण ही चळवळ बनवू असे मत उत्सव समिती अध्यक्ष अप्पासाहेब मनगुळी यांनी व्यक्त केले. याप्रसंगी महेंद्र सोमशेट्टी ,लोणावत, जनार्धन जक्कन, उत्सव अध्यक्ष आपासाहेब मनगुळी,कार्याध्यक्ष शशिकांत बिराजदार,प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजशेखर विजापुरे, सचिन कुलकर्णी, सुनील शरणार्थी, जयंत गुमडेल, बडदाल,अनिल वजिरकर, प्रशांत लींगशेट्टी,राचप्पा अरळीमार, बंकापुरे , मंगेश स्वामी, उमेश वर्दा उपस्थित होते. मल्लेश पुरवंत यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### विवाहितेचा छळ; पाच जणांवर गुन्हा

**सोलापूर, दि. ४ मे-**


लग्नातील मानपानावरून विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह पाचजणांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत श्रृती मुकेश शिंदे (वय २८, रा. दिशा रेसिडेन्सी, ए विंग, दर्बी क्लॉथ सेंटरमागे, रेल्वे लाईन, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती मुकेश शिंदे, सासू विजयमाला शिंदे, सासरे भिमसेन शिंदे, दीर शहाजी शिंदे, जाऊ सीमा शहाजी शिंदे (रा. १०१ सी विंग, पंगज आसमान सोसायटी, संत नगर, लोहगाव, पुणे) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. श्रृती व मुकेश यांचा विवाह फेब्रुवारी २०२२ मध्ये झाला असून लग्नानंतर श्रृती या सासरी नांदत असताना पती मुकेश व त्याच्या घरातील लोकांनी लग्नात मानपान केला नाही तसेच श्रृती यांच्या दिसण्यावरून त्यांचा शारीरीक व मानसिक छळ केला. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार इनामदार पुढील तपास करीत आहेत.

### मतदानादिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर

**सोलापूर, दि.४ मे-**

सोलापूर व माढा लोकसभा मतदार संघासाठी दि. ७ मे रोजी मतदान होणार आहे. निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी राज्य शासनाने अधिसूचनेद्वारे दिनांक ७ मे रोजी या मतदानाच्या दिवशी संबंधित मतदारसंघात सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आलेली आहे. तसेच राज्याच्या सीमेलगत असलेल्या राज्यांमधील जे मतदार, महाराष्ट्र राज्यातील सीमा लगतच्या जिल्हयांमध्ये कार्यरत आहेत, तथापि, त्यांची नावे सीमेलगतच्या राज्याच्या मतदारयादीमध्ये समाविष्ट आहेत, असे अपर जिल्हा दंडाधिकारी मनिषा कुंभार यांनी कळविले आहे.

### दिलीप भडंगे यांचे निधन



**सोलापूर, दि.४ मे-**

भडंगे गल्ली येथील रहिवासी दिलीप किसनराव भडंगे उर्फ पप्पा काका (वय ७९) यांचे शनिवार, ४ मे रोजी दुपारी ३ वाजता निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सुना व नातवंडे असा परिवार आहे.

### गणपती घोडके यांचे निधन



**सोलापूर, दि.४ मे-**

हालचिंचोळी (ता. अक्कलकोट) येथील रहिवासी सिद्धरत्न पदयात्रा मंडळाचे संयोजक गणपती रेवप्पा घोडके यांचे ४ मे रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७० वर्षे होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.


# दक्षिणमध्ये ३ लाख ५६ हजार मतदार बजावणार हक्क

## सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी विठ्ठल उदमले यांची माहिती; ४ हजार ३२४ कर्मचाऱ्यांची नेमणूक

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि.४ मे-**

सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघात अकरा नवीन मतदान केंद्र तयार झाल्याने एकूण ३५७ मतदान केंद्रावरून तीन लाख ५६ हजार २७ मतदार मतदान करणार आहेत. यासाठी प्रशासनाकडून सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांसह ४३२४ कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आल्याची माहिती सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी विठ्ठल उदमले यांनी तालुका प्रशासनाकडून आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत दिली .

सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघ हा सोलापूर शहारासह दक्षिण आणि उत्तर सोलापूर तालुक्यात विखुरलेला आहे. यापूर्वी ३४६ मतदान केंद्र होते. त्यात आता नवीन आकरा मतदान केंद्राची भर पडलेली आहेत. यात एक लाख ८४ हजार ८२४ पुरूष मतदार असून एक लाख ७१ हजार १६७ महिला मतदारांची संख्या आहे. आणि अन्य ३६ मतदार आहेत. तर सैनिक मतदारांची संख्या ही २४४ आहेत. यांचे मतदान हे प्रॉक्सी मतदार म्हणून यंदा प्रथमच मतदान होणार असून घरातील पत्नी, भाऊ किंवा मुलगा यापैकी ज्याला सैनिक मतदारांकडून प्राधिकृत केला असेल अशांकडून मतदान करून घेण्यात येणार आहे. अशा मतदाराच्या मधल्या बोटाला शाई लावण्यात येईल. तर शहारातील सैफुल येथील सोनी आणि जुळे सोलापूरातील वसुंधरा महाविद्यालयात महिला मतदान केंद्र असणार आहेत. येथील केंद्रावर मतदान केंद्राध्यक्षा पासून शिपायापर्यंत सर्व महिला कर्मचारी असणार आहेत. याशिवाय केंद्राबाहेरील बंदोबस्तासाठी महिला मतदारांचे मतदान वाढावे म्हणून हे पिंक बुथ करण्यात आला आहे. तर PWD ही एक नवीन मतदान केंद्राची संकल्पना असून या केंद्रातील अधिकारी कर्मचारी हे दिव्यांग असणार आहेत. हे केंद्र विजापूर रोड वरील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत आहे. आणि तसेच वि. गु. शिवदारे महाविद्यालय व भारती विद्यापीठ येथे आदर्श मतदान केंद्र असणार आहे. मतदारासाठी सोयी सुविधा येथे उपलब्ध करून देण्यात आला आहे. एखादा सेल्फी पॉंईट सारखे हे मतदान केंद्र तयार केलेला आहे. युथ मतदान केंद्र असणार आहे.



येथे नेमणुकीस असलेले सर्व कर्मचारी हे नवनियुक्त अधिकारी कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली असून या कर्मचाऱ्यांना ड्रेस कोड असणार आहे. नवजीवन इंग्लिश स्कूल आणि पंचशील विद्यालय येथे हे युथ मतदान केंद्र आहेत. तर विविध २१ मतदान केंद्रावर पडदाशीन केंद्र आहेत. येथे बुरखाधारी महिला मतदारांची ओळख पटवण्यासाठी महिला कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आल्याचेही उदमले व अतिरिक्त सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी किरण जमदाडे यांनी सांगितले.

पाच पेक्षा जास्त मतदान केंद्र जेथे आहेत. तेथे कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची मतदान स्वयंसेवक म्हणून नेमणूक केली असून त्यांना पांढऱ्या रंगाचे बुथ क्रमांक लिहिलेला टी शर्ट देण्यात आला आहे. आणि जेथे मतदारांची गर्दी होण्याची शक्यता आहे. अशा ठिकाणी मतदारांसाठी सावली आणि पाण्याची देखील सोय करण्यात आली आहे. वयस्कर आणि दिव्यांग असलेल्या १७० मतदार पैकी १५४ जणांचे मतदान झालेले आहे. यासाठी २६ जणांचे पथक नेमण्यात आला होता. आणि मतदारसंघात ९९ जणांचे पोस्टल मतदार आहेत. त्यापैकी ८८ जणांचे मतपत्रिका प्राप्त झालेले असून ११ मतपत्रिका अद्याप उपलब्ध व्हायचे असल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच मतदानाची सरासरी प्रमाण वाढवण्यासाठी ज्या ज्या गोष्टी करता येईल ते सर्व सोय करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी महसूल नायब तहसीलदार गायकवाड, निवासी नायब तहसीलदार आर. बी. भंडारे आणि निवडणूक नायब तहसीलदार विठ्ठल जाधव उपस्थित होते.

### मतदान कर्मचाऱ्यांचे ज्या-त्या केंद्रावर मतदान

सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघात निवडणूक कर्मचारी म्हणून ज्यांची नेमणूक करण्यात आली आहे. अशा २०३१( ईडीसी) कर्मचाऱ्यांचे मतदान हे कार्यरत असलेल्या ज्या त्या मतदान केंद्रावरच मतदान करता येणार आहे. मतदान कसे करायचे याचे प्रशिक्षण संबंधित कर्मचाऱ्यांना देण्यात आला आहे.

**-विठ्ठल उदमले, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी**

### राज्य राखीव पोलीस बल येथून साहित्य वाटप

सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातील निवडणूक कर्मचाऱ्यांना विजापूर रोड येथील राज्य राखीव पोलिस बल गट क्रमांक दहा येथे सकाळी आठ वाजता बोलावण्यात आले असून येथूनच सर्व साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे. रूट नुसार वाहन आणि कर्मचारी मतदान केंद्रावर दुपार पर्यंत पोहोचणार आहेत.

**-किरण जमदाडे, अतिरिक्त सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी**



## राष्ट्ररत्न फाउंडेशनतर्फे श्रमगौरवमूर्तींचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ मे-**

राष्ट्ररत्न सोशल फाउंडेशन सोलापूर संस्थेच्यावतीने १ मे रोजी महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनानिमित्ताने श्रमगौरवमूर्तीचा सन्मान आणि सहयोग शिधावाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला डॉ. मल्लिकार्जुन तरनळ्ळी हे अध्यक्ष म्हणून, तर प्रमुख अतिथी म्हणून निवृत्त पीएसआय अनिल उकरंडे हे होते. मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले, प्रास्ताविक संस्थापिका अध्यक्षा प्रांजली मोहीकर यांनी केले.

सिद्धार्थ भडकुंबे व उपस्थित व सदस्यांनी महाराष्ट्र गीत सादर केले. यानंतर विविध क्षेत्रात मोलमजुरी करणारे पण अतिशय गरीब आणि गरजू असलेल्यास सहा जणांचा श्रमगौरव मूर्ती म्हणून सन्मान करण्यात आला व शिधा वाटप करण्यात आले. या उपक्रमासाठी सहयोग दातार अश्विनी कुंभार, धनंजय माने, सुहास भोसले, गोरख शेठ चौधरी, प्रा. प्रेमचंद मेने, ज्योती मेने, शैलेश मोहीकर, प्रांजली मोहीकर यांनी सहकार्य केले. ९६ किलो जमा झालेल्या धान्यात गहू, ज्वारी, रवा, साखर, तसेच जीवनावश्यक वस्तू, खाद्यतेल, गुळाची ढेप, आंघोळीचे साबण कपड्याचे साबण, खोबरेल तेलाची बाटली, दूध ब्रश टूथपेस्ट डोक्याला बांधायचे मोठे गमचे इत्यादी सर्व वस्तू भागण्णा कोळी, मनोहर माने, ज्ञानदेव वाघमारे, रवी वीर, श्री शिवाजी राजगुरू, अनिल बोराडे यांना देण्यात आल्या. यावेळी सुहास भोसले, उकरंडे, ज्योती मेने आदींनी मनोगते व्यक्त केली.

कार्यक्रमाला महाएनजीओ फेडरेशनचे सोलापूर जिल्हा समन्वयक मनोज देवकर, सामाजिक कार्यकर्ते तांबोळी चाचा, आकाश कनकी, डॉ. आशालता जगताप, लेखिका माया बदनोरे, निकम, श्री व सौ अग्निहोत्री, राजेश्वर पाटील उपस्थित होते. जिंदगी की यही रीत है हार के बाद भी जीत है या सुंदर गाण्याने कार्यक्रमाची सांगता झाली. सूत्रसंचालन सिद्धार्थ भडकुंबे, सुहास भोसले यांनी केले. आभार प्रदर्शन सुहास भोसले यांनी मानले. यावेळी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पोलिसांच्या हद्दपारीचा आदेश वैध; ३२ गुन्हेगारांच्या याचिका फेटाळल्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मे-**

सोलापूर शहर पोलिसांनी दिलेला हद्दपारीचा आदेश वैध ठरवित काँग्रेस, एमआयएम पक्षाशी संबंधित ३२ गुन्हेगारांच्या याचिका जिल्हा व सत्र न्यायाधीश योगेश राणे यांनी फेटाळल्या. त्यामुळे या ३२ जणांना आता निवडणुकीच्या कालावधीत सोलापूर शहरातून बाहेर जावे लागणार आहे.

याचिका फेटाळलेल्यांची नावे पुढीलप्रमाणे : अजहर उर्फ गोल्डन खाजाभाई रामपुरे, रियाज अहमद इब्राहीम हुंडेकरी, मोहसिन गुलाब मैंदर्गी उर्फ बागवान, मैनोद्दीन महमंदरफिक हत्तुरे, वाहीद अब्दुल गफूर बिजापुरे, इलियास अब्दुलकरीम हुंडेकरी उर्फ समीर उर्फ इलियास इब्राहीम हुंडेकरी, गाजी सादीक जहागीरदार, वाजीद अब्दुलरजाक सालार, आसिफ उर्फ असिम अब्दुलरशिद तुळजापुरे, इफ्तेकार अब्दुलरशिद तुळजापुरे, कामरूल इस्लाम सलाउद्दीन शेख, मोहसिन सलीम उर्फ मोहम्मद सलीम नदाफ, अलीमोद्दीन उर्फ अलीम इब्राहीम कुरेशी, इब्राहीम खाजा उर्फ खाजाभाई कुरेशी, अल्ताफ अब्दुलसत्तार कुरेशी, मतीन रफीक महमंदरफिक शेख, महमंद सिद्दीकी उर्फ सिद्दीकी महंमदसलीम उर्फ सलीम शेख उर्फ उस्ताद, तौफिक इस्माईल शेख, सुहेल अब्दुल्ला कुरेशी, इरफान महिबूब शेख, तौफिक बाबूमियॉं हत्तुरे, अंबादास सायबण्णा करगुळे, गौस खाजा दाऊद नालबंद, आरीफ जिलानी नालबंद, मौनोद्दीन मोजास उर्फ महंमद मोअझाम नाईकवाडी, अबूबकार जाहगींर नाईकवाडी, तौसिफ शाहीन नाईकवाडी उर्फ सईद, शाहनावक मोजेस उर्फ मोहमंद मोअझाम नाईकवाडी उर्फ सईद, उमेर उर्फ उमर नासीर उर्फ मोहमंद नासीर नाईकवाडी उर्फ सईद, अबूरिहान उर्फ अबूरेहान रियाज नाईकवाडी उर्फ सईद, मकबुल उर्फ हाजी मकबुल मोजास उर्फ मोअझाम नाईकवाडी उर्फ सईद.



लोकसभा सार्वत्रिक निवडणूक प्रक्रियेच्या अनुषंगाने गुन्हेगारी कृत्ये व त्यांच्या कारवायांमुळे शांतता भंग होवून कायदा व सुव्यवस्था प्रश्न निर्माण होवू नये म्हणून शहर पोलिस आयुक्तालयातील सहायक पोलिस आयुक्त विभाग १ आणि विभाग २ यांनी तथा विशेष कार्यकारी दंडाधिकारी सोलापूर यांनी काँग्रेस, एमआयएम पक्षाशी संबंधित असलेल्या व गुन्हे दाखल असलेल्या ३२ कार्यकर्त्यांना २७ एप्रिल ते ७ मे २०२४ या कालावधीत सोलापूर शहरात राहण्यास बंदी केली आहे. याबाबतचे आदेश या ३२ जणांना देण्यात आलेले आहेत.

या आदेशाविरूद्ध सर्वांनी न्यायालयात पुर्नयाचिका (रिव्हिजन) दाखल केली होती व सहाय्यक पोलीस आयुक्त विभाग १ आणि विभाग २ तथा विशेष कार्यकारी दंडाधिकारी सोलापूर यांच्या आदेशास स्थगिती मागितली हाती. जिल्हा व सत्र न्यायाधीश राणे यांनी २ मे पर्यंत अंतरिम स्थगिती दिली होती. याच्या सुनावणीवेळी सरकारी पक्षाच्यावतीने याचिका दाखल केलेले सर्वजण हे पोलिसांच्या रेकॉर्डवरील गुन्हेगार असून त्यांच्यावर एक किंवा त्यापेक्षा जास्त गुन्हे दाखल आहेत, तसेच या सर्वांचा मतदानाचा हक्क अबाधित ठेवत त्यांना मतदानादिवशी ९ ते १२ या वेळेत येऊन मतदानाचा हक्क बजाविता येणार असल्याचा युक्तीवाद करण्यात आला. तो मान्य करीत जिल्हा व सत्र न्यायाधीश राणे यांनी ३२ जणांच्या याचिका फेटाळल्या.

याप्रकरणी सरकारच्यावतीने अ‍ॅड. प्रदीपसिंह राजपूत यांनी तर याचिकाकर्त्यांच्यावतीने अ‍ॅड. संतोष न्हावकर, अ‍ॅड. प्रशांत नवगिरे, अ‍ॅड. जे ए दर्जी, अ‍ॅड. रियाज शेख, अ‍ॅड. अजमोद्दीन शेख, अ‍ॅड. राहुल रूपनर यांनी काम पाहिले.

## शिवदारे मंगल कार्यालयासमोरून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. ४ मे-**

शिवदारे मंगल कार्यालयासमोरून चोरट्याने ५० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत सुनिल राजेंद्र शहापूरकर (वय ४२, रा. दक्षिण कसबा, दाते गणपती, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १ मे रोजी सुनिल शहापूरकर हे त्यांच्या मित्राची दुचाकी क्र. एमएच १४ के वाय ७०३४ ही घेऊन शिवदारे मंगल कार्यालयात लग्न सोहळ्यासाठी गेले होते. शहापूरकर यांनी दुचाकी ही मंगल कार्यालयाच्या गेटच्या बाहेर असलेल्या पार्किंगमध्ये पार्क केली होती. ती दुचाकी चोरुन नेल्याचा जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

### जाहीर नोटीसीस उत्तर व हरकत

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीस उत्तराने व हरकत्तीने कळविणेत येते की, दैनिक दिव्य मराठी या वृत्तपत्रात दिनांक २८/०४/२०२४ रोजी अ‍ॅड. महादेव कृष्णात पवार यांच्या मार्फत प्रसिध्द केलेल्या जाहीर नोटीसीस उत्तर देण्यात येते की, मिळकतीचे वर्णन : डि।। व सब डि।। सोलापूर तालुका उत्तर सोलापूर पैकी मौजे सेवालाल नगर येथील गट नंबर १५५/२/ब/१, १५५/२/ब/२, १५५/२/ब/३ ही मिळकत श्री. भाऊसाहेब वामन खैरे यांचे मालकी व कब्जे वहिवाटीची होती व आहे. त्यांनी सदरची शेतजमीनी श्री. अनिल भगवान जगताप मु.पो. मार्डी, ता. उ. सोलपूर यांना बेकायदेशीररित्या विक्री करीत असल्याबाबत सदर दिनांक २८/०४/२०२४ रोजीच्या दै. दिव्य मराठी मध्ये प्रसिध्द केलेल्या जाहीर नोटीसीवरुन समजले आहे. परंतु यातील श्री. भाऊसाहेब वामन खैरे यांनी वर नमुद शेतजमीनी आमचे अशिल श्री. अंबादास सायप्पा बनसोडे यांना दिनांक २२/०२/२०२२ रोजी इसारापावती व करारपत्राद्वारे मा. नोटरी सो. यांच्या समोर इसारापावती करून दिलेली आहे. त्यानंतर आमचे अशिल व त्यांच्यामध्ये ठरल्याप्रमाणे पुढील व्यवहार पूर्ण करण्यासाठी आमचे अशिलांने त्यांच्याकडे लेखी स्वरुपातील इसारा पावती व करारपत्रानुसार व आमचे अशिलांने खरेदीव्यवहार पुर्ण करण्यासाठी चलन, खरेदीखत व तसेच उर्वरित रक्कमेची डी.डी. काढलेले असतांनासुध्दा श्री. भाऊसाहेब वामन खैरे हे सदरचा वरील मिळकतीचा पुढील व्यवहार करण्यास टाळाटाळ करीत आहेत. व परस्पर आमचे अशिलांचे संमत्तीशिवाय वरील शेतजमीन विक्री करीत आहेत त्यास आमचेअशिलांची सक्त हरकत आहेत.

तरी परंतु वरील शेतजमीनीबाबत श्री. भाऊसाहेब वामन खैर बरोबर कोणीही कसल्याही खरेदी, विक्री वगैरेचा व्यवहार करु नये. याउप्पर कोणीही वरील शेतजमीनीबाबत खरेदी विक्रीचा व्यवहार केल्यास आमचे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार आहे. कोणाचेही कसल्याही प्रकारची फसगत हौऊ नये व फसगत होवू नये म्हणून ही जाहीर नोटीसीस उत्तर व हरकत दिले असे.

ही खरेदीपुर्व जाहीर नोटीसीस उत्तर व हरकत दिली ता. ०४/०५/२०२४

**सही/-**
**अ‍ॅड. शिरीष जगताप**
**स्क्वेअर-१, सिध्देश्वर पेठ,**
**जिल्हा न्यायालय समोर,**
**सोलापूर मोबा नं.९८९०४२१३३०**
**अशिला तर्फे अ‍ॅडव्होकेट**

**मध्य रेल्वे**

सोलापूर विभागाकडून
**उच्चस्तरीय प्लॅटफॉर्म आणि इतर कामांची तरतूद**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने विभागीय रेल्वे व्यवस्थापक (वर्क्स), मध्य रेल्वे, सोलापूर, खालील कामांसाठी नामांकित फर्म/कंत्राटदारांकडून ई-निविदा आमंत्रित करतात: **निविदा सूचना क्रमांक: 15-2024-SrDENS. कामाचे नाव:** (1) एचजी स्टेशनवर उच्च स्तरीय पीएफची तरतूद. (2) AKOR स्टेशनवर उच्चस्तरीय PF ची तरतूद आणि वेटिंग हॉलचे नूतनीकरण. (3) KOR स्टेशनवर FOB साठी रॅम्पची तरतूद. **कामाची अंदाजे किंमत:** 5,48,71,825.62. **बयाणा पैसे:** 4,24,400/-. **काम पूर्ण होण्याचा कालावधी:** 12 महिने. **देखभाल कालावधी:** 06 महिने. www.Ireps.gov.in **या वेबसाईटवर उद्धृत निविदा अपलोड करण्याची शेवटची तारीख आणि वेळ: 27/05/2024 15.00** वाजेपर्यंत. **www.Ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: 27/05/2024 15.30 वाजता.** या निविदेसाठी जारी करण्यात आलेले कोणतेही बदल/शुध्दीकरण लक्षात घेण्यासाठी संभाव्य निविदाकारांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वारंवार वेबसाइटला भेट देण्याचा सल्ला दिला जातो. **वेबसाइट: www.Ireps.gov.in**

**DRM (W) सोलापूर**

**रेलवे फाटक को बंद स्थिति में पार करना मना है**

Sai/SUR/13

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

सोलापूर जिल्हातील विशेषतः बार्शी तालुका मधील तमाम लोकांस या खरेदीपूर्व जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, जिल्हा व उप जिल्हा सोलापूर पैकी, तालुका बार्शी, येथील मौजे मानेगांव येथील सोलापूर जिल्हा परिषदेच्या हद्दीतील बार्शी पंचायत समितीपैकी वैराग यांचे हद्यीतील, मौजे मानेगांव ग्रामपंचायत हददीतील गट नं. २८/१/अ येथील जिरायत व हंगामी बागायत शेतजमीनीचे एकूण क्षेत्र हेक्टर ७.९४ आर असुन यांसी आकार रु. ६.२६ पैसे इतके असुन सदर एकूण क्षेत्रापैकी, पश्चिमे कडील मधली बाजूची संपूर्ण शेतजमीन असून त्याचे क्षेत्र हेक्टर ०.४० आर असून यांसी आकार रु. ०.३२ पैसे इतके असुन यांसी चतुः सिमा येणेप्रमाणे पुर्वेसः गट नं. २८/१/अ पैकी उर्वरित जमीन व लगत गट नं. ३२ असे, पश्चिमेसः गट नं. ३३ ची जमीन व रोड लगत, दक्षिणेसः गट नं. २८/१/अ पैकी उर्वरित जमीन व वैराग ची शिव रस्ता, उत्तरेस गट नं. २८/१/अ पैकी उर्वरित जमीन. अशा वर्णनाची वर नमूद शेतजमीन ही श्री. किरण ज्ञानदेव जाधव व श्री. प्रकाश ज्ञानदेव जाधव, राहणार मु. पो. दोघेही माढा, ता. माढा, जि. सोलापूर, यांच्या स्वतंत्र मालकी व कब्जे वहिवाटीची असून सदर शेतजमीन ही त्यांनी आमचे अशील यांना कायम खुषखरेदी देण्याचे ठरवून त्यांच्याकडून इसारा रक्कम स्विकारुन इसारा पावती करारपत्र लिहून देवून कायम खुशखरेदी देण्याचा व्यवहार ठरविलेला आहे. सदर शेतजमीन ही निर्वेध व निजोखमी असल्याची व ती त्यांनी यापूर्वी कोणासही विक्री, ट्रान्सफर, गहाण, दान, टाच, लिज अथवा अन्य मार्गाने गुंतविलेली नाही अशी हमी त्यांनी आमच्या अशिलांना दिलेली आहे. तरी सदरहू शेतजमीनीवर जर कोणाचा मालकी हक्क, हितसंबंध, कब्जा, गहाण, दान, लिज, लिन, इजमेंट राईट, कोर्टाची टाच, वित्त संस्थेचा बोजा अगर इतर बँकेचा बोजा वगैरे काही असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ५ (पाच) दिवसांचे आत नोंदवाव्यात. जर वरील मुदतीत कोणाची हिला हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाही याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली तारीख : ०४/०५/२०२४

**सही/-**
**अ‍ॅड. विद्या आर. कटकधोंड (कुरुलकर)**
**बी. कॉम. (ऑनर्स), एलएल.बी.**
**अ‍ॅडव्होकेट व नोटरी भारत सरकार,**
**निवास : फ्लॅट नं. १२, हेरीटेज सेन्चुरी अपार्टमेंट,**
**गीता नगर, वालचंद कॉलेजजवळ,**
**सोलापूर - ४१३००६.**
**मो. नं. ९०११४६०६४६.**

**IDFC FIRST Bank Limited**
**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited)**
**CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai-600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

**सिक्युरिटायझेशन आणि पुनर्रचनेच्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**
**आर्थिक मालमत्तेची आणि सुरक्षा व्याज कायद्याची अंमलबजावणी. २००२**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी IDFC FIRST Bank Limited कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली (पूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्रित आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाते) यांची कर्जे खाली नमूद केलेले कर्जदार आणि सह-कर्जदार त्यांच्या संबंधित मालमत्ता गहाण ठेवून सुरक्षित केले गेले आहेत. त्यांच्याकडे आहे म्हणून संबंधित कर्ज कराराच्या अटी व शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाले आणि ते अनियमित झाले, त्यांच्या कर्जाचे वर्गीकरण करण्यात आले RBI मार्गदर्शक तत्त्वांनुसार NP म्हणून. IDFC FIRST Bank Limited (पूर्वीचे Capital First Limited) कडे त्यांच्याकडून देय रक्कम, IDFC बँक लिमिटेड मध्ये विलीन केलेले आणि सध्या IDFC फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाते) संबंधितांनुसार नमूद केले आहे खालील तक्त्यामध्ये अधिक विशेषतः वर्णन केलेल्या नोटिस जारी केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू होईल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून कराराच्या दरानुसार आकारले जातील.

| अं. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम | मालमत्तेचा पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 114432243 | मालमत्तेवर कर्ज | १. रामचंद्र गेनदेव गर्जे २. अश्विनी रामचंद्र गर्जे | 13/04/2024 | INR 8,45,037.11/- | ते सर्व तुकडा आणि G.P चे पार्सल घर क्रमांक 389, गावात वसलेले 187.17 चौरस मीटरचे मोजमापः सावरगाव, पोस्टः नोंदणी विभागात नान आणि जिल्हा : सोलापूर, उपविभाग आणि तालुका : बार्शी स्थानिक हद्दीतील गाव सावरगाव महाराष्ट्र-413404, आणि सीमा : पूर्वः गेनदेव मालमत्ता लिंबाजी गाव पश्चिम : प्रवाह उत्तर : गेनदेवची मालमत्ता लिंबाजी गाव दक्षिण : कापसी रोड |

तुम्हाला याद्वारे IDFC FIRST Bank Limited (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, एकत्रीकरण) मध्ये रक्कम भरण्याचे आवाहन केले आहे IDFC बँक लिमिटेड सह आणि सध्या IDFC फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाते) वरील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या तपशीलानुसार त्यानंतरच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत संबंधित तारखा आणि इतर खर्च, शुल्क इ. हे प्रकाशन, ज्यामध्ये अयशस्वी झाले तर, कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, अधोस्वाक्षरी करणाऱ्यांना कार्यवाही सुरू करण्यास प्रतिबंधित केले जाईल.

आयडीएफसी फर्स्ट बँकेकडे देय रक्कम वसूल करण्यासाठी येथे उल्लेख केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध सरफेसी कायदा लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक म्हणून ओळखली जाते मर्यादित). पुढे तुम्हाला उक्त कायद्याच्या कलम १३ (१३) अन्वये उक्त सुरक्षित मालमत्ता कोणत्याही प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे विक्री/लीज किंवा अन्यथा.

दिनांक : 05/05/2024
स्थळ : सोलापूर

**सही/-**
**अधिकृत अधिकारी आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड**
**(पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाते)**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### भूलथापांना बळी न पडता विकासाला साथ द्या : माजी आ. दीपकआबा साळुंखे-पाटील

**सांगोला, दि. ४ मे-**

देशाचे भवितव्य आणि देशाचा नेता ठरवण्याची ही निवडणूक आहे. या निवडणुकीत सावे येथील ग्रामस्थ कोणत्याही भूलथापांना बळी न पडता विकासाला साथ द0ेतील आणि महायुतीचा उमेदवार असलेल्या खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांना मताधिक्य देतील असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दीपकआबा साळुंखे-पाटील यांनी व्यक्त केला. महायुतीचे उमेदवार खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या प्रचारार्थ आयोजित गावभेट दौऱ्यात ते सावे येथे बोलत होते. यावेळी संग्रामसिंह जाधवर, युवासेनेचे संपर्क प्रमुख सागर पाटील, राष्ट्रवादीचे तानाजी पाटील, शाहूराजे मेटकरी, शिवाजी जावीर, दीपक ऐवळे, दीपक दिघे उपस्थित होते. दुष्काळी परिस्थितीत माण नदीला टेंभूचे पाणी सोडल्याबद्दल सावे ग्रामस्थांनी माजी आ. दीपकआबा साळुंखे-पाटील यांचे अभूतपूर्व स्वागत करत सवाद्य आणि जंगी मिरवणूक काढली.



### खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांचा मोडनिंबमध्ये होम टू होम प्रचार

**मोडनिंब, दि. ४ मे-**

मोडनिंब येथे माढा लोकसभेचे महायुतीचे उमेदवार खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. भाजपा आणि महायुतीतील सर्व घटक मित्रपक्षांच्या वतीने ग्रामदैवत श्री वेताळ साहेबांना साकडे घालून होम टू होम प्रचाराला सुरुवात करण्यात आली. यावेळी मोडनिंब परिसरातून निंबाळकर यांना मोठे मताधिक्य देण्याचा निर्धार करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष कैलास तोडकरी, मनसेचे प्रशांत गिड्डे, आरपीआयचे नागनाथ ओहोळ, शिवसेना तालुकाध्यक्ष वैभव मोरे, दत्ता सुर्वे, संतोष पाटील, राहुल पाटील, उपसरपंच अमित कोळी, चांगदेव वरवडे, सदाशिव पाटोळे, गोटू शिंदे, राहुल केदार, धनाजी लादे, रविकांत जाधव, महिला शहराध्यक्ष रोहिणी मोहिते, कुसुम जाडकर, मुरली लादे, नवनाथ मोहिते, नमोकर दोभाडा, सोमनाथ माळी, किरण खडके, गणेश सुर्वे, टिंगरे, अमोल काटकर, विशाल पाटील, प्रसाद पाटोळे, स्वप्निल ओहोळ, चंद्रकांत लोकरे, परिमल तोडकरी, मयूर वाघ, मोहसीन मुलाणी उपस्थित होते.



### बार्शीतील सुयश विद्यालयाच्या उन्हाळी शिबिराचा उत्साहात समारोप

**बार्शी, दि. ४ मे-**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करुन व शिबिरामध्ये सहभागी झालेल्या शिबिरार्थींनी आपल्या पालकांचे पाद्यपूजन करत त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त केली. तसेच शिबिरामध्ये घेण्यात आलेल्या प्रत्येक इव्हेंटचे सादरीकरण पालकांसमोर करण्यात आले. शिबिरार्थींना सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात आले. मोठ्या खेळीमेळीच्या वातावरणामध्ये या उन्हाळी शिबिराची सांगता झाली्कार्यक्रमासाठी प्रशालेचे मुख्याध्यापक सागर मंडलिक सर, शारदेय डान्स अकॅडमीचे अखिलेश लोहिया सर तसेच अग्रवाल, गणेश रोडे आदी उपस्थित होते. तसेच संस्थेचे संस्थापक शिवदास नलवडे सर.देखील यावेळी कार्यक्रमासाठी उपस्थित होते. या शिबिरामध्ये कराटे व स्केटिंगसाठी गणेश रोडे व अतुल जाधव सर यांनी मार्गदर्शन केले. योगा प्राणायाम व ध्यान यासाठी सौ. साखरे मॅडम यांनी मार्गदर्शन केले. डान्ससाठी लोहिया सर यांनी मार्गदर्शन केले. तसेच बुद्धिबळसाठी अग्रवाल सर यांनी मार्गदर्शन केले. सुंदर हस्ताक्षरसाठी मुंडे सर यांनी मार्गदर्शन केले. आर्ट क्राफ्ट या विषयासाठी श्रीमती पवार यांनी मार्गदर्शन केले तर मेहंदी आणि रांगोळीसाठी श्रीमती नांदवटे यांनी मार्गदर्शन केले.



### बार्शीत पेटल्या असंख्य मशाली

**बार्शी, दि. ४ मे-**

धाराशिव लोकसभा उमेदवार ओमराजे निंबाळकर यांच्या प्रचारार्थ बार्शी शहर काँग्रेस पक्ष व महाविकास आघाडी यांच्यावतीने शहरात विशाल अशी मशाल प्रचार रॅली काढण्यात आली. या रॅलीत असंख्य महिला हातात मशाली घेऊन सहभागी झाल्या होत्या. या रॅलीची सुरुवात माजी नगराध्यक्ष विश्वास बारबोले, माजी, उपनगराध्यक्ष कृष्णराज बारबोले, काँग्रेसचे जेष्ठ जिल्हा उपाध्यक्ष जुगलकिशोर तिवाडी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आली. बार्शीचे काँग्रेस शहराध्यक्ष विजय साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी युवक काँग्रेस शहराध्यक्ष निखिल मस्के, सरचिटणीस अजित कांबळे, महिला तालुकाध्यक्ष रंजना साळुंखे, शहराध्यक्ष सोनाली जगझाप, विष्णू अस्वदे आदी महिला व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# देशातील लोकशाही धोक्याच्या वळणावर

### माजी केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार यांची टीका

### महाविकास आघाडीचे उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या प्रचारार्थ अकलूज येथे सभा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ४ मे-**

ईडी, सीबीआय, आयसीबीसारख्या यंत्रणांच्या माध्यमातून विरोधकांवर दबाव आणायचा. त्यांना तुरुंगात टाकायचे अशा पध्दतीची हुकुमशाही सध्या देशात सुरु आहे. मोदी गॅरंटीबद्दल नेहमीच बोलतात. परंतु या देशातील लोकशाही संपविणे हीच खरी मोदींची गॅरंटी आहे, अशी टीका राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा माजी केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार यांनी केली.

माढा लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील यांचे प्रचारार्थ अकलूज येथील विजयसिंह मोहिते-पाटील क्रीडा संकुलात आयोजित सभेत ते बोलत होते. शरद पवार म्हणाले, उजनी धरणाच्या उभारणीत शंकरराव मोहिते-पाटील यांचा सिंहाचा वाटा होता. लोकांच्या हितासाठी साखर कारखाने, दूध संस्था काढल्या. प्रधानमंत्री हा देशाचा असतो. एका राज्याचा नसतो. महाराष्ट्रातील अनेक कंपन्या गुजरातला नेण्याचे काम केले. इडी, सीबीआय, सीआयबीच्या माध्यमातून विरोधी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना अडचणीत आणायचे. मुख्यमंत्री केजरीवाल, सोरेन यांना तुरुंगात



टाकले. ही हुकूमशाही आहे. या देशातील लोकशाही टिकविण्यासाठी महाविकास आघाडीला विजयी करा. आ. जयंत पाटील म्हणाले, माढ्यातील निवडणूक जनतेने हाती घेतली आहे. धैर्यशील मोहिते-पाटलांच्या उमेदवारीने भाजपाला सळो की पळो करुन सोडले आहे. कारखानदारांना धमक्या दिल्या जातात. त्यांच्यावर कारवाईचा बडगा उचलला जातोय. कारवाईच्या भीतीने नेते घरात आहेत तर जनता रस्त्यावर उतरली आहे आणि हीच जनता यंदा महाराष्ट्रात परिवर्तन घडविल्याशिवाय राहणार नाही.

धैर्यशील मोहिते पाटील म्हणाले, माढा लोकसभा मतदारसंघातील सिंचनाचा प्रश्न सोडवायचा आहे. शेतकरी पाणीदार करायचा आहे. फलटण-पंढरपूर व रत्नगिरी-कराड-पंढरपूर रेल्वे मार्ग सुरु करायचा आहे. केळी संशोधन केंद्र सुरु करायचे आहे. नीरा उजवा कालव्याचे पूर्वीप्रमाणे नियोजन करायचे आहे. सोलापूर व सातारा जिल्ह्याच्या स्वाभीमानासाठी मी रात्रंदिवस झटेन. यावेळी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, माजी मंत्री राजेश टोपे, भूषणसिंह होळकर, युवक अध्यक्ष महिबुब शेख, माजी आ. आर. जी. रुपनवर, काकासाहेब साठे, जयसिंह मोहिते-पाटील, मदनसिंह मोहिते-पाटील, डॉ. बाबासाहेब देशमुख, डॉ. अनिकेत देशमुख, नितेश कराळे, नगराध्यक्षा ॲड. मीनल साठे, विद्या शिंदे, बाळासाहेब धाईंजे, संजय पाटील-घाटणेकर, साईनाथ अभंगराव, नामदेव वाघमारे उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे आमदार स्वर्गीय हनुमंतराव डोळस यांची आज पाचवी पुण्यतिथी आहे. या निमित्ताने त्यांच्या स्मरण करत त्यांना श्रद्धांजली जयंत पाटील यांनी वाहिली. धनगर समाजाच्या वतीने शरद पवार यांना काठी, घोंगडी व पिवळा फेटा देण्यात आला.

#### मोहिते-पाटील घराण्याकडे विकासाची दृष्टी

मी शाळेत असताना माझे मोठे बंधू येथील कारखान्यावर कार्यकारी संचालक होते. त्यावेळेस मी अकलूजमध्ये येत होतो. आमचे बंधू आप्पासाहेब आणि सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील पाटील यांच्यामधल्या चर्चा मी अनेकवेळा ऐकल्या आहेत. यामध्ये फक्त विकासाच्या आणि सुधारित शेतीच्या चर्चा मोठ्या प्रमाणावर होत होत्या. मोहिते-पाटील घराण्याकडे विकासाची दृष्टी आहे. तीच दृष्टी पुढील पिढीने जपले आहे, असे शरद पवार यांनी सांगितले.

#### चंद्र-सूर्य सोडून सगळेच आश्वासन : जानकर

उत्तम जानकर म्हणाले, ७० हजार कोटी घोटाळ्यातील कावळ्याला चुना लावून बगळा करण्याचे काम भाजपाने केले आहे. त्यांनी चंद्र-सूर्य सोडून सर्वकाही देण्याचे आश्वासन मला दिले. परंतु गेल्या दहा वर्षांत त्यांनी मला इतके फसविले की माझा त्यांच्यावर विश्वास राहिला नाही म्हणून मी विमानातून उडी टाकून पवार साहेबांना भेटलो. आता माढ्याची खासदारकी पवार साहेबांच्या पायावर घालूनच थांबेन.

## एसटी तिकिट अर्ध अन् सिलेंडरचे भाव दामदुप्पट

### माजी मंत्री दिलीप सोपल : ओमराजे निंबाळकरांच्या वैराग येथील प्रचारसभेत टीका

**तभा वृत्तसेवा**
**वैराग दि ४ मे-**

महिलांना एसटीचे अर्ध तिकीट केले. पण इकडे सिलेंडरचे भाव दामदुप्पट झाले. इकडे शेतीमालाला भाव नाही तर दुसरीकडे औषधे, खते, प्रत्येक वस्तूंवर जीएसटी लावून शेतकऱ्याला वर्षाला सहा हजार रुपये दिले. म्हणजेच मोदी सरकारने शेतकऱ्यांना आवळा दिला आणि त्या बदल्यात त्यांच्याकडून भोपळा घेतला अशी खरमरीत टीका माजी मंत्री दिलीप सोपल यांनी केली.

धाराशिव लोकसभा महाविकास आघाडीचे उमेदवार ओमराजे निंबाळकर यांच्या प्रचारासाठी वैराग येथे जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी ते बोलत होते. सभेच्या अध्यक्षस्थानी माजी जिल्हा परिषद सदस्य दिनकर पाटील होते. या सभेला वैरागसह ग्रामीण भागातील तरुण कार्यकर्ते मोठ्या



संख्येने उपस्थित होते. महाविकास आघाडीचे उमेदवार ओमराजे निंबाळकर यांनी विरोधांकांचा खरपूस समाचार घेतला. त्यांनी सांगितले मला फोनवाला खासदार म्हणून हिणविले जाते. पाच वर्षात खासदाराचे कोणतेही ठोस काम नाही असे विरोधक बोलतात. पण त्यांच्या बोलण्याकडे लक्षं देऊ नका. माझे काम नाही म्हणता तर मला पाडण्यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, दोन उपमुख्यमंत्री आणि पाच आमदार प्रचारासाठी उतरले आहेत, असा टोलाही ओमराजेंनी विरोधकांना लगावला. धाराशिव जिल्ह्यावर पाटील कुटुंब ५० वर्ष राजकारण करीत होते. धाराशिव जिल्हा देशात तीन नंबरला दरिद्री जिल्हा म्हणून ओळखला जातो. पण यापूर्वीचे खासदार राहिलेले पद्मसिंह पाटील देशात श्रीमंत खासदारांच्या यादीत होते. धाराशिवचा विकास न करता त्यांनी स्वतः चा विकास केला असा आरोपही निंबाळकर यांनी केला. यावेळी माजी नगराध्यक्ष विश्वास बारबोले, मकरंद निंबाळकर, अरूण सावंत यांनी आपले विचार मांडले. किरण देशमुख, प्रविण काकडे, मनिष चव्हाण, नंदुकुमार पांढरमिसे, देवा दिंडोरे, रामकृष्ण लोखंडे, विकास जाधवर, तेजस्विनी मरोड, मनोज डुरे, मधुकर गुंड, लक्ष्मण गायकवाड, अमर निंबाळकर, किरण पाटील यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. सूत्रसंचालन समीर शेख यांनी केले.

## नीरा-देवधरच्या पाण्याच्या गॅरंटीसाठी भाजपाला मतदान करा : आ. गोरे

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ४ मे-**

दुष्काळी पट्ट्यातील गावांचा कायमस्वरूपी दुष्काळ हटविण्यासाठी नीरा-देवधर प्रकल्पाचे पाणी शेतीला मिळवून देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करणे गरजेचे आहे. यामुळे उर्वरित विकासाला गती मिळणार आहे. यासाठी भाजपाचे अधिकृत उमेदवार खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांना मतदान करण्याचे आवाहन माण-खटावचे आ. जयकुमार गोरे यांनी केले.

माढा लोकसभा मतदारसंघाचे भाजपाचे उमेदवार खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या प्रचारार्थ माळशिरस पिलीव येथील महालक्ष्मी मंदिरात विचारविनिमय बैठक झाली, यावेळी ते बोलत होते. पीएम किसान सन्मान योजना, मोफत रेशन धान्य, आयुष्यमान भारत योजना,



मुख्यमंत्री सहाय्यता निधी, बचत गट व लेक लाडली, शेतमालाला उत्पादित खर्चावर आधारित योग्य दर, रस्ते, जलसिंचन, शेतकऱ्यांच्या वीज बिलात सवलत, गोरगरिबांना मोफत घरे, उद्योगासाठी किमान कौशल्यावर आधारित १२ बलुतेदारांसाठी अनुदान कर्ज योजना यामुळे देशाची परिस्थिती बदलली आहे. भविष्यात देश सक्षम होण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींशिवाय पर्याय नाही. त्यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी खा. नाईक-निंबाळकरांना विजयी करा, असे आवाहन आ. गोरे यांनी केले. यावेळी माजी आ. रामभाऊ वडकुते, राजकुमार पाटील, के. के. पाटील, आप्पासाहेब देशमुख, भजनदास चोरमले, विठ्ठल मदने, प्रा. विठ्ठल मदने, प्रा. मयुर भैस, राहुल मदने, तुषार लवटे, संजय पाटील, लक्ष्मण पवार, निशांत बगाडे, जितेंद्र पाटील, शिवप्रसाद पुकळे, शिवराज पुकळे, अक्षय वगरे, सचिन पुकळे, सचिन भैस, रणजीत मंजार, सतीश मदने, राहुल भैस, सागर बगाडे, बाळासाहेब मदने उपस्थित होते.



## संभाजी काकडे यांचा आदर्श तरुणांनी घ्यावा


### शिवरत्न परिवार अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**भोसे, दि. ४ मे-**

पिग्मी एजंटपासून सुरुवात करून शिवरत्न दूध संस्था काढली. दररोज पाच हजार लिटर दूध संकलन वाढविले. शिवरत्न बँकेचा शुभारंभ करून संभाजी काकडे यांनी शून्यातून विश्व निर्माण केले आहे. त्यांचा आदर्श तरुण पिढीने घ्यावा, असे आवाहन आ. समाधान आवताडे यांनी केले.

भोसे (ता. मंगळवेढा) येथे शिवरत्न परिवार अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि;चे उद्घाटन केले, यावेळी ते बोलत होते. उद्घाटन नंदेश्वरचे मठाधिपती बाळकृष्ण भाऊसो लाड महाराज यांनी केले. यावेळी विठ्ठल कारखान्याचे माजी चेअरमन भगीरथ भालके, माजी उपसभापती सूर्यकांत ढोणे, दामाजीचे संचालक तानाजी काकडे, बसवराज पाटील, पंचायत समिती माजी सदस्य नितीन पाटील, महादेव जगताप, गुलाब थोरबोले, कालिदास महामुनी, विवेकानंद राऊत, सुनील थोरबोले, भारत निकम, मंगळवेढा तालुका पत्रकार संघाचे तालुका उपाध्यक्ष महेश पाटील, उपसरपंच बाळासाहेब काकडे, नानासो चोपडे, आदी उपस्थित होते.

## अक्कलकोच्या वटवृक्ष मंदिरात सोमवारपासून धार्मिक कार्यक्रम



### पुण्यतिथी उत्सव; मंगळवारी गोपाळकाला अन् अन्य विधी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ४ मे-**

अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थांची १४६ वी पुण्यतिथी सोमवारी ६ मे रोजी आहे. यानिमित्त श्री वटवृक्ष स्वामी समर्थ महाराज मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत.

धर्मसंकीर्तन महोत्सवासह अन्य कार्यक्रमांना २४ एप्रिलपासूनच सुरुवात झाली असून, सोमवारी ६ मे विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहे. मंगळवारी ७ मे रोजी गोपाळकाला आहे. पुण्यतिथी महोत्सवात स्वामींच्या नित्य उपासनेसोबतच पहाटे ४ वा. नगरप्रदक्षिणा, नित्य अनुष्ठान, धर्मसंकीर्तन, नित्य नामस्मरण, सकाळी ८ ते ११ या वेळेत विश्वस्त उज्ज्वलाताई सरदेशमुख यांच्या अधिपत्याखाली गुरुलीलामृत ग्रंथाचे सामुदायिक पारायण चालू आहे. ६ मे अखेर अखंड नामवीणा सप्ताह व दिनेश मावडीकर (पुणे) यांचे सकाळ संध्याकाळी सनई वादन, भजन सेवा, धर्मसंकीर्तनाची सांगता होणार आहे. पुण्यतिथी दिवशी पहाटे ३ वा. नगरप्रदक्षिणा व नामस्मरण, पहाटे ५ वा. काकड आरती, सकाळी ६ वाजता नामवीणा सप्ताह समाप्ती सोहळा, सकाळी ७ वा. अभिषेक, सकाळी ११.३० वा. मंदिर समिती, पुरोहित व अक्कलकोट राजघराण्याचे महानैवेद्य, आरती, दर्शन, दु. १२ ते ४ या वेळेत भाविकांना महाप्रसाद, सायंकाळी ५ ते रात्री १० या वेळेत शहरातून पालखी सोहळा, मंगळवारी ७ मे रोजी दुपारी ४ ते सायंकाळी ७ या वेळेत गोपाळकाला होणार आहे.

#### मतदान अन् उन्हामुळे भाविकांची संख्या रोडावणार

उन्हाच्या तीव्रतेमुळे आतापासूनच भाविकांची संख्या रोडावली असून, ६ मे पुण्यतिथी उत्सव आहे. मंगळवारी ७ मेला लोकसभा निवडणुकीसाठी मतदान होणार आहे. यामुळे भाविकांची संख्या रोडावण्याची भीती व्यापारी चंद्रकांत माने, रिक्षा चालक तात्या जामदार, लॉज व्यवसायिक शाम कुलकर्णी, रमेश वाले, मल्लिकार्जुन खुबा, पंडीत सरवाराम माने, गेस्ट हाऊसच पुष्पक जाधव, सत्तार शेख, हॉटेल व्यवसायिक प्रशांत गुरव, रामेश्वर पाटील, चनशेट्टी यांनी व्यक्त केली आहे.

## अवैध वाळू उपसा, पाणी टँकरचा मुद्दा मंगळवेढ्यात गाजला

### मनसेचे जिल्हा समन्वयक अध्यक्षांनी धरले महसूल प्रशासनाला धारेवर

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ४ मे-**

मंगळवेढा तहसिलमध्ये ध्वजारोहणाचा प्रशासकीय कार्यक्रम पार पडल्यानंतर चहापान कार्यक्रमादरम्यान अरळी येथील भीमा नदी पात्रातून संबंधित ठेकेदार रात्रंदिवस वाळू उपसा करीत असल्याचा व पाणी टँकरचा मुद्दा लोकप्रतिनिधी, महसूल अधिकारी, पोलीस अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मनसेचे जिल्हा समन्वयक अध्यक्ष नारायण गोवे यांनी मांडून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. प्रशासनाला धारेवर धरले.

दि.१ मे रोजी ध्वजारोहणाचा प्रशासकीय कार्यक्रम तहसील कार्यालय प्रांगणात पार पडला. दरम्यान या कार्यक्रमानंतर चहापान कार्यक्रमात



मनसेचे जिल्हा समन्वयक अध्यक्ष नारायण गोवे यांनी अरळी येथे शासकीय टेंडर घरकूल बांधकामासाठी लागणारी वाळू साठे झाले आहे. येथील ठेकेदार व महसूल प्रशासनाच्या संगनमताने गौणखनिजच्या नियमाची पायमल्ली करीत रात्रंदिवस वाळू उपसा होत असल्याने शासनाचे अधिकारीच शासनाला खड्ड्यात घालण्याचा प्रयत्न कशा पध्दतीने करतात हे अरळी येथील घटनेचा गोवे यांनी भांडाफोड केला. लोकप्रतिनिधी समाधान आवताडे यांच्या



समोर पोटतिडकीने तो मुद्दा मांडला. वाळू उपसा घटनेचे शुटींग करुन पुरावे सादर करण्याच्या सूचना आ. आवताडे यांनी यावेळी दिल्या. याबाबत आमदारांनी तहसिलदारांना याचा जाब विचारल्यावर त्यांनी स्पेशल पथक नेमून चौकशी केली जाईल, असे सांगितले. बेसुमार वाळू उपसा न थांबल्यास निवडणुकीनंतर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा गोवे यांनी दिला. यावेळी आ. समाधान आवताडे, प्रांताधिकारी अमित माळी, उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रांत गायकवाड, तहसीलदार मदन जाधव, पोलीस निरीक्षक रणजीत माने, निवासी नायब तहसीलदार प्रकाश सगर, निवासी नायब तहसीलदार चंद्रकांत हेडगिरे, ॲड. रमेश जोशी, ॲड. डी. सी. जाधव, मारुती वाकडे, दिलीप जाधव, चंद्रकांत पवार, शिवाजीराव पवार, खंडू खंदारे उपस्थित होते.

#### तहसीलदारांवर गुन्हा दाखल करा

आंधळगावच्या ग्रामस्थांनी पाणीपुरवठ्यासाठी टँकरची मागणी केल्यानंतर तहसिलदारांनी शासकीय कामात अडथळा आणल्याचा गुन्हा दाखल करण्याचा दम ग्रामस्थांना दिला होता. यावेळी तात्काळ पोलीसही घटनास्थळी बोलावून घेतले होते. हा मुद्दाही चर्चेला आला असून यावेळी गोवे यांनी तहसिलदारांवर गुन्हा दाखल झालाच पाहिजे असा आग्रह आ.आवताडे यांच्यासमोर मांडला.

## संक्षिप्त वृत्त



### चुंगीत दुपारगुडे परिवारातर्फे बौद्ध समाजातील महिलांना ५१ हजारांच्या साड्यांचे वाटप

**अक्कलकोट, दि. ४ मे-**

अक्कलकोट तालुक्यातील चुंगी येथील सामाजिक कार्यकर्ते तुकाराम दुपारगुडे व त्यांच्या पत्नी सुनीता दुपारगुडे यांनी सामाजिक बांधिलकी जपत चुगी येथील बौद्ध समाजातील महिलांना ५१ हजारांच्या साड्यांचे वाटप केले. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महापुरुषांच्या संयुक्त जयंतीनिमित्त हा उपक्रम दुपारगुडे परिवाराच्या वतीने घेण्यात आला. तुकाराम दुपारगुडे यांच्या पत्नी सामाजिक बाधिलकी जपण्यासाठी सुनिता दुपारगुडे यांच्या वतीने ५१ हजाराच्या पांढऱ्या रंगाची प्रत्येक घरी साडी वाटप करण्यात आले. या उपक्रम ाबद्दल तुकाराम दुपारगुडे व सुनिता दुपारगुडे यांचा चुंगी येथील बौद्ध समाज बांधवांकडून सत्कार करण्यात आला. याप्रसंगी राम खंडाळे, नानाभाऊ काजळे, हुचप्पा थोरे, मेजर ज्ञानदेव खंडाळे, बोदला गायकवाड, इंद्रजीत वाघमारे, अरुण गायकवाड, दैवत थोरे, नरसिंग खंडाळे, शिवाजी गायकवाड, महादेव थोरे, ज्ञानेश्वर थोरे, मेजर अनिल कांबळे, अशोक थोरे, दीपक गायकवाड, सुरेश गायकवाड, जीवन थोरे, काशिनाथ गायकवाड, मुकेश खंडाळे, सचिन थोरे, सदाशिव थोरे, अनंत कांबळे, श्रावण थोरे, चंद्रकांत थोरे, नामदेव थोरे, दामोदर थोरे, तुकाराम शिंदे, भागवत गजधाने, गजेंद्र खंडाळे उपस्थित होते.




### माळशिरस विधानसभा मतदारसंघांमध्ये मतदानाची जय्यत तयारी, नियोजन पूर्ण

**अकलूज, दि. ४ मे-**

४३ लोकसभा मतदारसंघांमध्ये २५४ माळशिरस (अ. जा.) विधानसभा मतदारसंघामध्ये तिसऱ्या टप्प्यात ७ मे २०२४ रोजी म तदान होणार असून प्रशासनाने मतदानाची जय्यत तयारी केली आहे. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी विजया पांगारकर यांच्या मार्गदर्शनाखाली मतदानाची तयारी पूर्ण झालेली आहे. माळशिरस मतदार संघामध्ये ३३८ मतदान केंद्रे असून सर्व मतदान केंद्रावर दिव्यांग मतदारांकरिता रॅम्प , दिव्यांग खुर्ची हिरकणी कक्ष, स्त्री आणि पुरुषांसाठी शौचालय सुविधा, लाईटची सोय, पाण्याची सोय इत्यादी मूलभूत सुविधा पूर्ण करण्यात आले असून कर्मचाऱ्यांकरता फर्निचर ची सोय करण्यात आली आहे. सर्व मतदान केंद्रावरची स्वच्छता करण्यात आलेली असून अतिशय चांगल्या वातावरणात मतदान प्रक्रिया राबवण्याची जय्यत तयारी प्रशासनाने केलेली असून ७ मे २०२४ रोजी सर्व मतदारांनी आपला मतदानाचा हक्क जास्तीत जास्त प्रमाणात बजावण्यात यावा असे आवाहन नोडल अधिकारी तथा सहाय्यक गट विकास अधिकारी यांनी केलेले आहे.

### बसखाली चिरडून चिमुकलीचा मृत्यू

**अक्कलकोट, दि. ४ मे-**

अक्कलकोट पंचायत समितीसमोर अडीच वर्षाच्या चिमुकल्या मुलीच्या डोक्यावरून एसटी बसच्या मागचे चाक गेल्याने डोक्याचे



पूर्ण भाग चेंदामेंदा होऊन जागीच तिचा मृत्यू झाला. अंगावर काटा आणणाऱ्या घटनेमुळे अक्कलकोट हादरुन गेले. झारा जुबेर पठाण (वय २, रा. कालिकानगर, अक्कलकोट) असे त्या मयत मुलीचे नाव आहे. फिर्यादी व तिचा भाऊ साद पठाण (रा. समता नगर, अक्कलकोट) हे दुचाकीवरून अक्कलकोटकडून सोलापूरकडे जाणाऱ्या बस (क्र. एम. एच. १४/ के. क्यू. ०८२९) या बसने दुचाकी (क्र. एम. एच. १३/ डी. के. १३९६) ला जोरदार धक्का दिल्याने दुचाकीवर असलेली चिमुकली खाली पडली. त्या चिमुकलीच्या डोक्यावरून एसटीचे मागील चाक गेले. त्यात चिमुकलीचा जागीच मृत्यू झाला. याबाबत अककलकोट उत्तर पोलीस ठाण्यात एसटी बसचालक अमोगसिध्द ख्याडे (रा. मंद्रुप, ता. दक्षिण सोलापूर, हल्ली खासबाग) यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अमीरखान युसुफ पठाण यांनी फिर्याद दिली आहे.

### स्कॉलरशिप परीक्षेत उपळे दुमाला जिल्हा परिषद प्राथमिक मुलींच्या शाळेचे यश

**बार्शी दि. ४ मे-**

महाराष्ट्रामध्ये घेण्यात आलेल्या स्कॉलरशिप परीक्षेमध्ये उपळे दुमाला येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुली या शाळेच्या विद्यार्थिनींनी घवघवीत यश संपादन केले आहे. पात्र विद्यार्थिनी खालीलप्रमाणे:- साक्षी सतीश गायकवाड- २५६, श्रावणी सचिन बुरगुटे- २४२, आदिती यशवंत चव्हाण- १७०, गीतांजली बाळासाहेब जुनवनकर- १६४, सिद्धी सुदर्शन जाधव- १६२, राजकन्या उमेश बुरगुटे- १६०, श्रावणी नागनाथ शेरकर- १५०, हुमेरा ताहेर बागवान- १५०, गायत्री गणेश झोंबाडे- १४२. यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शक शिक्षिका शितल चंद्रकांत उलभगत यांचे म ार्गदर्शन लाभले तर त्यांना मदत करणारे शाळेतील मुख्याध्यापिका छाया कुंभार, सांगुळे, भडकवाड, गुळवे यांचे वेळोवेळी सहकार्य लाभले. या मिळालेल्या यशामुळे बार्शी पंचायत समिती शिक्षण विभागाचे गटशिक्षणाधिकारी सुहास गुरव, विस्तार अधिकारी चौधरी, केंद्रप्रमुख धोत्रे, उपळे मुले शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकवृंद, सरपंच पल्लवी महानवर, उपसरपंच नितीन बुरगुटे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष शितल पासले, उपाध्यक्ष राहुल खपाले, शालेय व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य व उपळे दुमाला येथील सर्व ग्रामस्थ यांनी विद्यार्थ्यांचे व पालकांचे मार्गदर्शक शिक्षकांचे आणि सर्व स्टाफचे अभिनंदन केले.

# पोलिसांची शिष्टाई; दोन आंदोलने स्थगित

## लोकसभा निवडणूक काळात आंदोलन करण्यास निर्बंध अन् पोलिसांकडून तक्रारदारांना हमी

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ४ मे-**

मंगळवेढा येथे दि. १ मे महाराष्ट्र दिनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हा समन्वयक नारायण गोवे यांनी व सोनाली गडेकर या दोघांनी प्रांताधिकारी कार्यालय व पोलिस ठाण्यासमोर आंदोलन करण्यास परवानगी मागितली होती. दरम्यान लोकसभा सार्वजनिक निवडणुकीच्या अनुषंगाने आंदोलन करण्यास निर्बंध असल्याने या दोघांना उपोषणापासून परावृत्त करण्यास मंगळवेढा पोलिसांना यश आले आहे.

तहसीलदार मदन जाधव यांनी आंधळगाव येथे टँकरची मागणी करणाऱ्या ग्रामस्थांना शासकिय कामात अडथळा आणल्याबाबत गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली होती. यावर महाराष्ट्र नवनिम ाण सेनेचे जिल्हा समन्वयक नारायण गोवे यांनी जनतेवर गुन्हा दाखल करण्याची दमबाजी करणाऱ्या तहसीलदारांवरच गुन्हा दाखल करावा या मागणीसाठी प्रांत कार्यालयासमोर दि. १ मे रोजी उपोषण करण्याचा लेखी इशारा जिल्हाधिकारी व पोलिस प्रशासनास दिला होता. मंगळवेढा ही संतांची भूमी असून दुष्काळात येथील दामाजीपंतांनी गोरगरीबांना धान्य वाटण्याचे मोठे कार्य केले असताना याच भूमीत एक तहसीलदार जनतेच्या घशाला पाण्याची कोरड पडत असताना, पाण्यासाठी टाहो फोडणाऱ्या नागरिकांना गुन्हा दाखल करण्याची भाषा करीत असल्याने येथील खुर्चीवर राहण्याचा त्यांना लोकशाहीत अधिकार नसल्याचे गोवे यांचे म्हणणे असून कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी या गांभिर्यपूर्वक घटनेचा विचार करून त्यांच्यावर तात्काळ कारवाई करावी अन्यथा त्यांना दामाजी नगरीतील जनता कदापि माफ करणार नसल्याचा इशारा त्यांनी दिला आहे. दरम्यान, तहसीलदारांवर कारवाई न झाल्यास लोकसभा निवडणुकीनंतर पुन्हा आंदोलन करणार असल्याचे सांगितले.

दुसऱ्या घटनेत सोनाली सुहास गडेकर (मंगळवेढा) यांनी पोलीस अधिक्षकांकडे तक्रारी अर्ज करून तपासिक अंमलदार तथा पोलिस हवालदार श्रीमंत पवार यांनी गुन्हा दाखल होऊन तीन महिन्यांचा कालावधी लोटला असताना गुन्ह्यातील वाहन अद्यापही जप्त केले नसल्याने मला निराधार महिलेला मंगळवेढा पोलिसांकडून न्याय मिळत नसल्याने दि.१ मे महाराष्ट्र दिनी पोलिस ठाण्यासमोर आंदोलन करण्याची परवानगी मागितली होती. सहाय्यक पोलिस निरिक्षक बापूसोा पिंगळे व पोलिस हवालदार दिगंबर गेजगे यांनी सदर महिलेचे मन परिवर्तन केल्याने म तदानापर्यंत आंदोलन तूर्त स्थगित करण्यात आले आहे. फिर्यादी सोनाली गडेकर यांनी दि.२५ जानेवारी रोजी भादवि कलम ४०६ नुसार आरोपी किरण जाधव (रा. सिध्देवाडी) याच्याविरूध्द गुन्हा दाखल केला असून पोलिस हवालदार पवार यांनी फिर्यादीच्या बाजूने काम न पाहता या गुन्ह्यात आरोपीला मदत केली असल्याचा आरोप आहे. अटकपूर्व जामीन मिळण्यापूर्वी गुन्हा दाखल झाल्यानंतर दि. ५, ६, ७ फेब्रुवारी रोजी आरोपी मंगळवेढा पोलिस ठाण्यात असतानाही त्याला अटक केली नाही. जामीन मिळावा या हेतूने आरोपीस मदत करण्यात आली आहे.

### सीसीटीव्ही फुटेज तपासण्याची गरज

घटना घडल्या दिवशीचे पोलिस ठाण्यातील सीसीटीव्ही फुटेज चेक केल्यानंतर दुधाचे दुध व पाण्याचे पाणी होणार आहे. तपासिक अंमलदार पवार यांनी तपासाच्या कर्तव्यात कुचराई केल्याने त्यांना सेवेतून निलंबित करावे अशी त्यांनी अर्जात मागणी केली आहे. अटकपूर्व जामीन आरोपीस मिळाला की वाहनास असा सवालही त्यांनी करून वाहन गेली तीन महिने जप्त केले जात नसल्यामुळे या तपासावरच शंका व्यक्त केली जात असून कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरिक्षक सुनिल फुलारी यांनी या कामी लक्ष घालून एका विधवा, निराधार महिलेला न्याय मिळवून द्यावा अशी मागणी त्यांनी केली आहे.

# लोकशाही संवर्धन, बचावासाठी कौल द्या

## खा. चंद्रकांत हंडोरे : कंदलगाव येथे आ. प्रणिती शिंदे यांच्या प्रचारार्थ जाहीर सभा

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. ४ मे-**



देशाची राज्यघटना बदलण्यासाठी दोन तृतीयांश बहुमताची गरज आहे म्हणून भाजपाकडून अब की बार चारशे पार घोषणा देण्यात येत आहे. भाजपाचा लोकशाही धोक्यात आणून राज्यघटना बदलण्याचा डाव असून त्यासाठी चारशे खासदार निवडून आणण्याचा खटाटोप सुरु आहे. मोदी सरकार आश्वासन देऊन फसवित आहेत म्हणून लोकशही संवर्धनासाठी काँग्रेसला विजयी करण्याचे आवाहन खा. चंद्रकांत हंडोरे यांनी केले.

कंदलगाव येथील काँग्रेसच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांच्या प्रचारार्थ जाहीर सभेत ते बोलत होते. यावेळी काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे, जिल्हा संघटक रमेश हसापुरे, अखिल भारतीय किसान सभेचे जिल्हाध्यक्ष शिवानंद झळके, काँग्रेस तालुका उपाध्यक्ष मोतीलाल राठोड, भारत जाधव, युवक काँग्रेस प्रदेश सचिव अनंत म्हेत्रे, एनएसयुआय जिल्हाध्यक्ष वाघेश म्हेत्रे, मुंजप्पा कोले, मायप्पा व्हनमाने, रारसाहेब व्हनमाने, आनंद कोले, भारत जाधव, शाम व्हनमाने, अकोल्याचे रमेश आसबे, मनगोळीचे सरपंच संजय गायकवाड, निंबर्गीचे सरपंच श्रीदीप हसापुरे, लवंगीचे सरपंच संगमेश बगले, आनंद कुमार अंत्रोळीकर, उपसरपंच सद्दाम सय्यद, शिवशंकर सोने, डॉ. महादेव जोकारे, संजय कोले, सुधाकर जोकारे, विष्णू जोकारे उपस्थित होते.

खा. हंडोरे पुढे म्हणाले की, लोकशाही व संविधान वाचविण्यासाठी व हुकुमशाही नष्ट करण्याची लढाई आहे. भाजपाकडून काँग्रेसवर आरोप करून बदनाम करण्याचा प्रयत्न होत आहे. सत्ता मिळविण्यासाठी मोदींनी जनतेची दिशाभूल करून शेतकऱ्यांच्या खात्यावर १५ लाख रूपये, बेरोजगारांना नोकरी, शेतकऱ्यांच्या मालाला हमीभावाची आश्वासने दिली. मात्र दहा वर्षात मोदींनी दिलेल्या गॅरंटीचे काय झाले? मोदी सरकारकडून गरीबांची लूट करून उद्योगपतींना सांभाळण्याचे काम सुरू आहे. अन्यायकारक कायदे करुन शेतकरी, कामगार व श्रमिकांना देशोधडीला लावण्याचा प्रकिर सुरू आहे. शेतकऱ्यांच्या मालावर जीएसटी लावून वसूल केलेले पैसेच शेतकरी सन्माननिधी म्हणून डेऊन फसवणूक सुरू आहे.

विकसित भारताचा स्वप्न पूर्ण करताना खेडेगावातील सामान्य शेतकऱ्यांवर अन्याय करण्यात येत आहे. भाजपाकडून सर्वधर्मसमभावाची राज्यघटना मोडीत काढून जातीयवादी घटना आणण्याचा प्रयत्न होत आहे. विदर्भात झालेल्या निवडणुकीत भाजपाविरोधात जनमानसांची लाट असून काँग्रेसचे अधिक खासदार निवडून येणार आहेत. सूडबुध्दीने मुख्यमंत्र्यांना तुरूंगात टाकण्याचा प्रकार सुरु आहे. भाजपा सत्तेवर आल्यास धनगर, मराठा, ओबीसी व अल्पसंख्यांकाचे आरक्षण धोक्यात येणार आहे, म्हणून आरक्षण सुरक्षित ठेवण्यासाठी काँग्रेसला विजयी करण्याचे आवाहन हंडोरे यांनी केला.

### सोलापूरचा विकास खुंटला

काँग्रेसकडून सामान्य कार्यकर्त्याला न्याय देण्याचा प्रयत्न होत आहे . भाजपाच्या दोन अकार्यक्षम खासदारांमुळे मतदारसंघाचा दहा वर्षांपासून विकास खुंटला आहे. गुन्ह्याचे प्रमाण वाढल्याने कायदा सुव्यवस्था प्रश्न होत आहे. प्रणिती शिंदे या महाराष्ट्रात रणरागिणी म्हणून ओळखल्या जात असल्याने मतदारसंघातील शेतकऱ्यांसह इतर घटकांचे प्रश्न सोडविण्यासाठी काँग्रेसला मतदान करण्याचे आवाहन काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे यांनी केला.



# माळशिरसच्या नगराध्यक्षा ताई वावरे यांचा मार्ग मोकळा

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. ४ मे-**

माळशिरस नगरपंचायतीचे विद्यमान नगराध्यक्ष शिवाजीराव देशमुख यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर निवडणूक जाहीर झाली असून या निवडणुकीत ताई सचिन वावरे यांचा एकमेव अर्ज दाखल झाला असून तो अर्ज वैध झाल्याने त्यांची निवड बिनविरोध होणार हे निश्चित झाले आहे.

माळशिरस नगरपंचायतीचे नगराध्यक्ष शिवाजीराव देशमुख यांनी राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या नगराध्यक्षपदाची निवडणूक ८ मे रोजी होणार आहे. या नगरअध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी वार्ड क्रमांक दोनमधून बिनविरोध निवडून आलेल्या नगरसेविका ताई सचिन वावरे यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची निवड बिनविरोध होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यांच्या अर्जावर सूचक म्हणून नगरसेवक रघुनाथ चव्हाण यांनी तर अनुमोदक म्हणून नगरसेवक कैलास वामन यांच्या सह्या आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी वीणा पवार यांच्याकडे ताई सचिन वावरे यांनी अर्ज दाखल केला. यावेळी माळशिरसचे माजी सरपंच तुकाराम देशमुख, नगरसेवक रघुनाथ चव्हाण, कैलास वामन, प्रवीण केमकर, सचिन वावरे आदी उपस्थित होते. ताई वावरे या तुकाराम देशमुख गटाच्या नगरसेविका असून माजी नगराध्यक्ष डॉ. अप्पासाहेब देशमुख यांच्या म ावस बहीण आहेत. त्यामुळे दोन्ही गटाकडून त्यांना समर्थन मिळाली आहे.

# तुळजापुरातून अर्चना पाटील यांना मताधिक्य देणार : सुनील चव्हाण

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. ४ मे-**



काँग्रेसमधून भारतीय जनता पक्षात आलेले सुनील चव्हाण यांनी धाराशिव लोकसभा मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवार अर्चनाताई पाटील यांना तुळजापूर तालुक्यातून लीड मि ळवून देणार असल्याचा विश्वास व्यक्त केला आहे.

विविध प्रचार यंत्रणेच्या म ाध्यमातून त्यांनी आपल्या तुळजापूर तालुक्यातील प्रत्येक गावातील प्रमुख कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन, हायटेक प्रचार यंत्रणा राबविण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे सुनील चव्हाण हे प्रचारात आता ॲक्टिव्ह मोडमध्ये आले आहेत. दररोज कार्यकर्त्यांच्या बैठका, फोनद्वारे निरोप, रॅली, पदयात्रा काढून ते प्रचाराची धुरा सांभाळत आहेत. सुनील चव्हाण हे तुळजाभवानी साखर कारखान्याचे चेअरमन आहेत. तसेच ते माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांचे सुपुत्र आहेत. चव्हाण कुटुंबाचे तुळजापूर तालुक्यात फार मोठे प्राबल्य असून, नुकताच त्यांनी भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केला असून त्यांच्या प्रवेशाने तुळजापूर तालुक्यात अर्चना पाटील यांचे पारडे जड झाले आहे. विद्यमान आमदार राणा पाटील व युवा नेते सुनील चव्हाण यांच्या संयुक्त प्रचाराच्या झंझावातामुळे महायुतीला निश्चित लीड मिळणार असल्याची चर्चा सुरु आहे.

# चुंगीत भीम संदेश मंडळातर्फे भीम, शिव, फुले, बसव यांची संयुक्त जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ४ मे-**



चुंगी येथे भीम संदेश तरुण मंडळातर्फे भीम-शिव-फुले-बसव यांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली.

अध्यक्षस्थानी संस्थापक मुख्याध्यापक महादेव माने होते. यावेळी राजसाहेब चव्हाण, संदिप मडिखांबे, अविनाश मडिखांबे, अजय मुकणार, अनिल गायकवाड, दत्ता थोरे, सुरेश माने आदी उपस्थित होते. जयंती उत्सव मंडळाचे संयुक्त अध्यक्ष तुकाराम दुपारगुडे व विनोद थोरे यांच्या नेतृत्वाखाली हा सोहळा झाला. याप्रसंगी मच्छिंद्रनाथ भोसले यांचे व्याख्यान झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महापुरुषांच्या प्रतिमांची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. याप्रसंगी राम खंडाळे, नानाभाऊ काजळे, हुचप्पा थोरे, मेजर ज्ञानदेव खंडाळे, बोदला गायकवाड, इंद्रजीत वाघमारे, अरुण गायकवाड, दैवत थोरे, नरसिंग खंडाळे, शिवाजी गायकवाड, म हादेव थोरे, ज्ञानेश्वर थोरे, मेजर अनिल कांबळे, अशोक थोरे, दीपक गायकवाड, सुरेश गायकवाड, जीवन थोरे, काशिनाथ गायकवाड, मुकेश खंडाळे, सचिन थोरे, सदाशिव थोरे, अनंत कांबळे, श्रावण थोरे, विजय थोरे , चंद्रकांत थोरे, नामदेव थोरे, दामोदर थोरे, तुकाराम शिंदे, भागवत गजधाने, गजेंद्र खंडाळे, बाजीराव गजधाने, शेखर दुपारगुडे आदी उपस्थित होते.

# खासदार, आमदारला निवडून दिले तरीही आम्ही गद्दार

## महाविकास आघाडीचे उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील

## प्रचारसभेदरम्यान व्यक्त केली खंत, विकास कामांवर ठेवले बोट

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ४ मे-**

२०१९ ला कोणताही स्वार्थ न ठेवता आम्ही पंधरा दिवसांत एक खासदार दिला. एका रात्रीत एक आमदार दिला. जिल्हा परिषद दिली. तीन नगरपालिका दिल्या. तरीही आम्ही गद्दार कसे? असा प्रश्न माढा लोकसभेचे महाविकास आघाडी, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी उपस्थित केला.

माढा लोकसभा मतदारसंघाचा तीनवेळा झंझावती प्रचार दौरा केल्यानंतर मोहिते-पाटील बोलताना म्हणाले, नेते कुठेही असू द्यात. आज जनता आम च्या पाठीशी आहे आणि जनतेनेच ही निवडणूक हातात घेतली आहे. आम चा विजय निश्चित आहे. २०१९ ला पश्चिम महाराष्ट्रासह मराठवाड्यातील सहा जिल्हे व ३१ दुष्काळी तालुक्यातील शेतीला कृष्णा-भीमा स्थिरीकरणाच्या माध्यमातून पाणी मिळावे यासाठी आम्ही भाजपात प्रवेश केला. यामध्ये आमचा कोणताही वैयक्तिक स्वार्थ नव्हता. पक्षाने लोकसभेला दिलेल्या उम ेदवाराला एक लाख १६ हजार मतांचे मताधिक्य देवून विजयी केले. अटीतटीच्या लढतीत एका रात्रीत नवख्या सातपुतेंना आमदार केले. जिल्हा परिषदेत भाजपाची सत्ता आणली. तीन नगरपालिका व माळशिरस पंचायत समितीत भाजपाची सत्ता आणली. तरीही आम्ही गद्दार कसे? ज्यांना खासदार म्हणून निवडून दिले त्यांना त्यांच्या तालुक्यात एक ग्रामपंचायतसुध्दा आणता आली नाही आणि माढा लोकसभेतील नगरपालिकांच्या निवडणुकीसाठी साधा उमेदवारही मिळाला नाही. तरीही ते निष्ठावंत आणि आम्ही गद्दार? वारे न्याय.



नीरा-देवधर धरणाविषयी बोलताना मोहिते-पाटील म्हणाले, या धरणासाठी विजयदादा व रामराजेंनी १९८४ पासून प्रयत्न केले. जमिनीचे अधिग्रहण करुन घेतले. मध्यंतरी १५-२० वर्षे विदर्भाचा अनुशेष भरुन काढण्यासाठी राज्यपालांनी पश्चिम महाराष्ट्रातील योजनांना स्टे दिला. त्यामुळे निधी मिळाला नाही म्हणून ही योजना रखडली. आता हा स्टे उठला आहे. नीधी आला आहे. त्यामुळे नीरा-देवधर योजना सुरु झाली. शरद पवार, विजयदादा, रामराजे यांनी कधी श्रेयासाठी काम केले नाही. परंतु अलीकडे काम न करता पाणीदार, जलनायक अशा बिरुदावली लावून फिरणारे वाढले आहेत असे म्हणत खा. नाईक-निंबाळकर व आ. गोरे यांच्यावर त्यांनी जोरदार टीका केली. लोणंद-पंढरपूर रेल्वेचा प्रश्न सोडविला म्हणणाऱ्या खासदारांनी पुणे-फलटण रेल्वेच्या गेटवर साधा गेटमन नेमला नाही. रेल्वेचा ड्रायव्हरच गेट उघडतो व बंद करतो अशी सध्या शोकांतिका आहे असे सांगून केंद्राच्या अनेक योजना आहेत. त्यातीलच एक अंध-अपंग लोकांसाठी योजना होती. आपण माळशिरस तालुक्यात १०० टक्के ती यशस्वी केली. लोकांना लाभ मिळवून दिला. परंतु सातारा जिल्ह्यात खासदारांना योजनाच माहित झाली नाही. प्रशासनाने ती राबविल्यावर त्यांना कळले.

### आमच्यावर संस्कार आहेत

हे आज खालच्या पातळीवर जाऊन आमच्यावर टीका करतात. आम्हालाही जशास तसे उत्तर देता येते. परंतु आमच्या घरावर सहकार महर्षींचे संस्कार आहेत. पवार व विजयदादांनी सांगितले आहे की आपण पातळी सोडून बोलायचे नाही म्हणून आम्ही गप्प आहे. जनता आता दुधखुळी राहिली नाही. येत्या सात तारखेला मतदानाच्या माध्यमातून ती माढा लोकसभेत नक्कीच परिवर्तन घडवेल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी अमित आळंगे

**खजिनदारपदी विनयकुमार कटारे, सहसचिवपदी ॲड. निदा सैफन**



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ मे**

सोलापूर बार असोसिएशनच्या निवडणुकीत विधी सेवा पॅनलकडून अध्यक्षपदासाठी उभे असलेले ॲड. अमित आळगे यांनी ८५१ मते घेऊन विधी व्यासपीठ पॅनलचे ॲड.एस.व्ही. उजळंबे यांचा पराभव करीत विजय संपादन केला. विधी सेवा पॅनेलचे ॲड. विनयकुमार कटारे यांनी खजिनदारपदासाठी, सहसचिवपदासाठी ॲड. निदा सैफन या निवडून आल्या. विधी व्यासपीठचे ॲड. व्ही. पी. शिंदे हे उपाध्यक्ष म्हणून तर ॲड. मनोज पामूल हे सचिव म्हणून विजयी झाले.

सोलापूर बार असोसिएशनच्या निवडणुकीसाठी झालेल्या मतदानाची मोजणी शुक्रवारी जिल्हा न्यायालयातील ग्रंथालयात पार पडली. पहिल्या फेरीत मीरा प्रसाद यांना ४४ तर निदा सैफन यांना ४२ मते होती. १५ व्या फेरीअखेर मीरा प्रसाद यांना ६०९ तर निदा सैफन यांना ६२८ मते मिळाली होती. या निवडणुकीत ॲड. राजेंद्र फताटे यांच्या पॅनेलचा पराभव झाला. मावळते अध्यक्ष तथा निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. सुरेश



गायकवाड यांच्यासह त्यांच्या टीमने निवडणुकीचे कामकाज पाहिले. सोलापूर बार निवडणुकीत तीन पॅनल उभे होते. विधी सेवा पॅनल आणि विधी व्यासपीठ पॅनलकडून दिग्गज वकिलांनी आपली ताकद लावली होती. अगदी कमी वयात अध्यक्षपदी विराजमान होणारे अमित आळंगे हे पहिलेच वकील आहेत. शुक्रवारी रात्री निवडणुकीचा निकाल जाहीर होताच विधी सेवा पॅनलच्या वकिलांनी जल्लोष साजरा केला. अमित आळंगे यांच्या पॅनलसाठी ॲड. संतोष न्हावकर, ॲड. व्ही. एस. आळंगे, ॲड. विद्यावंत पांढरे, ॲड. रमेश कणबसकर, ॲड. संजीव सदाफुले, ॲड. आर. ए. बागवान, ॲड. अशोक जालादी, ॲड. एस. एस. पुजारी यांनी परिश्रम घेतले.

### नूतन पदाधिकाऱ्यांना मिळालेली मते

विधी सेवा पॅनलचे विजयी उमेदवार अध्यक्ष : ॲड. अमित आळंगे (८५१), सहसचिव : ॲड. निदा सैफन (६७७), खजिनदार : ॲड. विनयकुमार कटारे (६४३), विधी व्यासपीठ पॅनलचे विजयी उमेदवार उपाध्यक्ष : ॲड. व्ही. पी. शिंदे (६७१), सचिव ॲड. मनोज पामूल (७५४).

# वृध्द प्रवाशी महिलेचे चार लाखांचे दागिने लंपास

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मे-**

एस टी बसमधून प्रवास करणाऱ्या वृध्द महिलेचे ४ लाख रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरट्याने चोरून नेले.

याबाबत सुनंदा शिवाजी म्हेत्रे (वय ६२, सध्या रा. ता. सांगोला, जि. सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सांगोला पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३ मे रोजी दुपारी सुनंदा म्हेत्रे या सोलापूर ते आटपाडी या एसटी बसमधून प्रवास करीत होत्या. एसटी बस महुद गावाजवळ आली असता म्हेत्रे यांच्याकडील राखाडी रंगाची पर्स व त्यातील दागिने, मोबाईल असा ४ लाख रुपये किंमतीचा ऐवज चोरट्याने चोरून नेला. चोरट्याने म्हेत्रे यांच्या पर्समधील ५० ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण, २० ग्रॅम वजनाचे लॉकेट, २० ग्रॅम वजनाचे सोन्याचे नेकलेस, १५ ग्रॅम वजनाचा लक्ष्मी हार, ५ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी, ४ ग्रॅम वजनाचे कानातील टॉप्स, सोन्याचा गळ्यातील बदाम, मोबाईल असा ३ लाख ९५ हजार रुपयांचा ऐवज चोरला आहे.

# सोलापुरात दोन ठिकाणी मोठी आग



## तुळजापूर रोडवरील कचरा डेपोस आग

**५४ पैकी २० एकर परिसर पेटला**

**पालिका अग्निशमन दलाचे शर्थीचे प्रयत्न सुरू**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ मे-**

तुळजापूर रोडवरील महापालिकेच्या कचरा डेपोस अचानक आग लागली आहे. काल मोठा वारा असल्याने रात्रीपासून ही आग मोठ्या प्रमाणात पसरली. येथील एकूण ५४ एकरांपैकी सुमारे २० एकर परिसर या आगीने पेटला आहे.आग विझवण्यासाठी महापालिका अग्निशमन दलाचे शर्तीचे प्रयत्न सुरू आहेत. आतापर्यंत सुमारे ६० गाड्या पाणी फवारणी केली आहे.

तुळजापूर रोडवर महापालिकेचा कचरा डेपो आहे. या ठिकाणी सोलापूर शहरातील सर्व कचरा या डेपोमध्ये संकलित करण्यात येतो. या डेपोला काल सायंकाळी आग लागल्याची घटना घडली. आगीचे नेमके कारण समजले नसले तरी वाढत्या तापमानामुळे ही आग लागली असण्याची शक्यता आहे. रात्री मोठ्या प्रमाणात वारे असल्याने ही आग पसरत गेली, अशी माहिती महापालिका अग्निशामक दलाचे प्रमुख केदारनाथ आवटे यांनी दिली. दिवसभरात सुमारे ३० ते ४० गाड्या पाण्याचा मारा करण्यात आला. दरम्यान, घटनास्थळी महापालिकेचे उपायुक्त मच्छिंद्र घोलप, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांनी भेट देऊन पाहणी केली. आग विझवण्यासाठी आवश्यक त्या सूचना दिल्या.

### अधिक तापमानामुळे कचऱ्यातील मिथेन वायू पेट घेतो

तुळजापूर रोडवरील कचरा डेपोस अचानक आग लागली. बघता बघता आग धुमसत आहे. या कचरा ढिगामध्ये मिथेन हा वायू असतो. हा मिथेन वायू साधारण ४० ते ४३ अंश सेल्सिअस तापमानामध्ये पेट घेतो. सोलापूर शहरातील तापमान वाढत आहे. सोलापुरातील तापमान काल ४३.२ अंश सेल्सिअस इतके होते. अधिक तापमानामुळे कचऱ्यातील मिथेन वायू पेट घेतो. यामुळेच ही आग लागली. ती आग धुमसतच आहे, हे शास्त्रीय कारण आहे. एखादा पाऊस झाल्यास ही आग लवकर आटोक्यात येऊ शकते.

### बायोमायनिंगचे काम संथ गतीने सुरू

बायोमायनिंगचे काम संथ गतीने सुरू असल्याचे दिसून येते. आत्तापर्यंत केवळ ३० टक्के काम पूर्ण झाले आहे. मुदतीत हे काम करून घेणे आवश्यक आहे अन्यथा अशा घटना घडतच राहणार आहेत. प्रदूषण आणि दुर्गंधीचा त्रास परिसरातील नागरिकांना सहन करावा लागत आहे.



## स्मार्ट सिटी योजनेतील केबल डक्टला भीषण आग

**सहा तासानंतर आग आटोक्यात**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ मे-**

सोलापूर शहरातील बाळे येथील कारंबा रोडवरील जैव वैद्यकीय कचरा प्रकल्पालगत स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत कामांसाठी एकाच ठिकाणी ठेवण्यात आलेल्या केबल डक्टला आज दुपारच्या सुमारास भीषण आग लागल्याने खळबळ उडाली. यामुळे धूराचे लोट शहरात पसरल्याचे दिसून आले. सहा तासाच्या परिश्रमानंतर अग्निशामक दलाला अखेर ही आग विझवण्यात यश आले.

एकीकडे तुळजापूर रोडवरील कचरा डेपोस काल आग लागली आणि दुसऱ्या दिवशी येथील केबल डक्टलाही आग लागल्याने अग्निशामक दलाची चांगलीच धावपळ उडाली. कचरा डेपो बरोबरच दुसरीकडे डक्टच्या आगीमुळे शेजारील जैव वैद्यकीय कचराही पेटल्याची घटना घडली. यामुळे उलट सुलट चर्चा होत आहे. सोलापुरात स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत कामांसाठी लागणारे केबल डक्ट मोठ्या प्रमाणात ठेवण्यात आले होते. त्यास अचानक आग लागली. या आगीमध्ये लाखो रुपये किमतीचे केबल डक्ट जळून खाक झाले आहेत. घटनेची माहिती मिळताच अग्निशामक दलाचे प्रमुख केदारनाथ आवटे हे घटनास्थळी दाखल झाले. आग विझवण्यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न केले. या डक्टच्या आगीमुळे शेजारीच असलेल्या जैव वैद्यकीय कचऱ्यास आग लागली. ती तातडीने अग्निशामक दलाने पाणी मारून विझवली.

विशेष म्हणजे स्मार्ट सिटी योजनेंतर्गत ठेवण्यात आलेल्या केबल डॉक्टरला यापूर्वी होम मैदान परिसरात देखील आग लागली होती. मात्र, काही दिवसांपूर्वी हे केबल डॉक्टर कारंबा रोडवरील जैव वैद्यकीय कचरा डेपो लगत परिसरात ठेवण्यात आले. पण, तिथेही आज पुन्हा त्याला आग लागल्याने अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. यापूर्वी मरीआई चौक येथेही अशा केबल डक्टला आग लागल्याची घटना घडली होती. दरम्यान, या आगीचे कारण अद्याप अस्पष्ट आहे.




# दवाखान्याचे बिल कमी करतो असे सांगून फसवणूक


**सोलापूर, दि. ४ मे-**

दवाखान्याचे बिल कमी करून देतो असे सांगून बोरोटीच्या शेतकऱ्याची १५ हजार रुपयांची फसवणुक करणाऱ्याविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना ५ जुलै २०२३ रोजी शहरातील जोडबसवण्णा चौकातील बालाजी मंदीराजवळ घडली असून याबाबत विठ्ठल काशिनाथ मोरे (वय ४९, रा. बोरोटी खुर्द, ता. अक्कलकोट) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन करणसिंग बनसिलाल रजपूत (वय ५६, रा. समरा नगर, दासमया नगर, आशा नगर रोड, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे, विठ्ठल मोरे हे ५ जुलै २०२३ रोजी जोडबसवण्णा चौकातील बालाजी मंदीरजवळ असताना करणसिंग रजपूत हा मोरे यांच्याजवळ आला. त्याने मोरे यांचा विश्वास संपादन करून दवाखान्याचे बिल कमी करून ५० हजार रुपये परत मिळवून देतो असे सांगून मोरे यांच्याकडून १५ हजार रुपये घेतले. रजपूत याने बिल कमी करून दिले नाही की ५० हजार रुपये परत मिळवून दिले नाहीत. म्हणून फसवणूक झाल्याची तक्रार मोरे यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात दाखल केली आहे. हवालदार गंगावणे पुढील तपास करीत आहेत.



















हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे. ● निवासी संपादक : प्रशांत वसंतराव माने (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company Solapur Tarun Bharat Media Limited., and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● Mr. Vivek Krishnaji Ghalsasi - Dissertation Editor / ● Mr. Dilip Yeshwant Pethe - Chief Editor ● Mr. Prashant Vasantrao Mane - Resident Editor (The Editors are responsible as per PRB Act). Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) Email ID starunbharat@gmail.com and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: https://dainiktarunbharat.com/, ● Epaper: https://epaper.dainiktarunbharat.com/. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue.